सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य

# शिक्षणवेध : २०४७

डिसेंबर २०२५ | वर्ष १ | अंक तिसरा

*वेध विकसित शिक्षणाचा...*



# आवाहन

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या  या नव्या त्रैमासिकासाठी तुमच्या सारख्या प्रेरणादायी शिक्षक, अभ्यासू विद्यार्थ्यांनी आणि नवकल्पनांनी समृद्ध महाविद्यालयांनी आपापल्या कहाण्या आमच्यापर्यंत पोहोचवाव्यात, अशी आमची मनापासून विनंती आहे.

तुमच्या संस्थेत एखादा वेगळा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असेल, एखाद्या विद्यार्थ्याने नावीन्यपूर्ण प्रकल्प साकारला असेल, पेटंट मिळवले असेल, संशोधनात काही वेगळे घडवले असेल, एखादा कार्यक्रम खूप लोकाभिमुख आणि परिणामकारक ठरला असेल - तर तो अनुभव आम्हाला आणि सर्वांना वाचायला नक्की आवडेल.

हे त्रैमासिक म्हणजे आपल्या कामाची ओळख करून देण्यासाठी निर्मिलेले  एक व्यासपीठ आहे. संस्था, विभाग किंवा वैयक्तिक पातळीवरील आपल्या यशोगाथा, कल्पक उपक्रम, सर्जनशील प्रकल्प, आणि समजूतदार मार्गक्रमण - हे सगळं आम्ही ऐकायला आणि छापायला उत्सुक आहोत. या प्रवासात आमचे सहप्रवासी होण्यासाठी आपल्याला हे आग्रहाचे आमंत्रण!

तुमचे लेख (मराठीत किंवा इंग्रजीत), ६०० ते १००० शब्दांत shikshanwedh@gmail.com या ईमेलवर पाठवा. चांगली रंगीत छायाचित्रे देखील पाठवा; मात्र छायाचित्रांचे resolution चांगले असले पाहिजे. निवडक लेख त्रैमासिकात प्रसिद्ध केले जातील.

चला, एकत्र येऊ या — शिक्षणातले आशावाद, प्रयोगशीलता आणि प्रेरणा सगळ्यांपर्यंत पोहोचवू या!

**लेख या ईमेल वर पाठवा : shikshanwedh@gmail.com**



**संपादक :** डॉ. मृदुला बेळे
**त्रैमासिक संयोजक :** तुषार दामगुडे
**संपादन सहाय्य :** वंदना अत्रे
**प्रकाशक :** संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन मुंबई इमारत, ४९ खेरवाडी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०००५१
**कलासंपादन :** सारद मजकूर

# [illegible]

## वेध विकसित शिक्षणाचा

# अनुक्रमणिका


- संपादकीय / **डॉ. मृदुला बेळे** ........ ०६

## कार्यपूर्तीची तीन वर्षे

- देशाला ज्ञानातून समृद्ध करणारे उच्च व तंत्रशिक्षण / मा. चंद्रकांत (दादा) पाटील ........ ०८
- उद्दिष्टाकडे निघालेली परिवर्तन यात्रा / प्रा. शैलेंद्र देवळाणकर ........ १०
- परिवर्तनाच्या वाटेवरील आव्हाने / प्रा. विनोद मोहितकर ........ १२
- तंत्रनिकेतने पुन्हा गजबजली / प्रा. प्रमोद नाईक ........ १५
- वाचन संस्कृतीस बळ / श्री. अशोक गाडेकर ........ १९
- कला संचालनालय : कलेचा वारसा अधिक समृद्ध करण्याचे प्रयत्न / प्रा. किशोर इंगळे ........ २२
- संकटातून संकल्पाकडे / प्रा. निवेदिता एकबोटे ........ २५
- माणुसकी सक्रिय होते तेव्हा / प्रा. वैजयंती जाधव ........ २८
- जेव्हा युवक जागा होतो / राहुल गिरी, मधुकर लेंगरे ........ ३०
- मानसिक आरोग्याचे रक्षण करणारे धोरण / डॉ. हेमलता बागला, डॉ. अल्पना वैद्य ........ ३४
- समावेशक तंत्रशिक्षणाची नांदी / प्रा. विनोद मोहितकर ........ ३६

## संकीर्ण

- मुलाखत : अजय प्रताप सिंह / श्री. अशोक गाडेकर ........ ३९
- विभागस्तरीय ज्ञानकेंद्रे / श्री. अशोक गाडेकर ........ ४२
- नागपूर पुस्तक महोत्सव २०२५ / डॉ. किशोर इंगळे ........ ४६

## ज्ञानवृक्षाच्या मुळाशी

- आचार्य वराहमिहीर / प्रा. संजय जगदाळे ........ ५१

# अनुक्रमणिका

## शिक्षणातून महिला सक्षमीकरण :


- स्कॉलरशिप लाभार्थी विद्यार्थिनींशी हितगुज ........ ४९


## चित्तपोषण


- डायरेक्टर स्पीक्स / प्रा. शैलेन्द्र देवळाणकर, मुलाखत डॉ. मृदुला बेळे ........ ५४
- दीपस्तंभ / पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, मुलाखत डॉ. मृदुला बेळे........ ५८
- गाथा गडकोटांची / प्रसाद पवार ........ ७६


## कलादालन


- कला रसास्वाद कशासाठी? / अदिती जोगळेकर-हर्डीकर........ ६२
- भव्यतेचा उपासक : महाराष्ट्र भूषण राम सुतार / श्री. राजेंद्र महाजन ........ ६६
- अक्षरांचा जादूगार – अच्युत पालव / प्रा. गणेश तरतरे ........ ७१


## नव्या वाटा-नवे उद्यम


- नव्या उद्योजक पिढीला घडवणारे नवोन्मेष केंद्र / मंदार जोशी ........ ८०


## बुक्स अँड रील्स


- वाचाल तर वाचाल : अनुभव आणि प्रयत्नांचे ठिपके जोडताना / नीता कुलकर्णी ........ ८२
- रूपे रूपेरी : द डीसायपल : कणसुराची सुरेल मैफल / श्रीपाद ब्रह्मे........ ८४


## मनाचिये गुंती


- गोड सूड/ डॉ. आनंद नाडकर्णी ........ ८७
- तरुणांच्या मानसिक आरोग्याच्या अडचणी / सागर खोकले ........ ८९

# संपादकीय



'जगातील सर्वोत्तम विद्यापीठात प्रवेश मिळवणं म्हणजे यशाची हमी' हा समज आजही मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. मात्र वास्तव अधिक गुंतागुंतीचं आहे. हार्वर्डसारख्या जागतिक दर्जाच्या विद्यापीठांत शिकणारे विद्यार्थीही मानसिक तणाव, अपयशाची भीती आणि आत्मविश्वासाच्या अभावाशी झुंज देताना दिसतात. काही वर्षांपूर्वी हार्वर्डमधील एका अभ्यासक्रमातून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी माघार घेतली. ही माघार केवळ अभ्यासक्रम कठीण असल्यामुळे नव्हती, तर मानसिकदृष्ट्या खचलेल्या विद्यार्थ्यांची ती प्रतिक्रिया होती.

महाविद्यालयीन आयुष्याच्या टप्प्यावर विद्यार्थी प्रथमच मोठ्या अपेक्षा, तीव्र स्पर्धा आणि 'यश म्हणजे काय?' या मूलभूत प्रश्नाला सामोरे जातात. गुण, रँकिंग, प्लेसमेंट, संशोधनाची शर्यत, आणि सोशल मीडियावर सातत्याने दिसणारे तथाकथित 'परफेक्ट आयुष्य' या सगळ्या दडपणांखाली विद्यार्थी हळूहळू आतून थकू लागतो. बाहेरून आत्मविश्वासाने वावरणारा विद्यार्थी आत मात्र अस्वस्थ, गोंधळलेला आणि अपयशाच्या भीतीने ग्रासलेला असतो.

या मानसिक थकव्याला अनेक घटक कारणीभूत आहेत. बदलती जीवनशैली व कुटुंबव्यवस्था, स्पर्धात्मक शैक्षणिक प्रणाली, सामाजिक वातावरणातील अपेक्षा, डिजिटल माध्यमांचे आक्रमण, आर्थिक अडचणी आणि समवयस्कांचा दबाव या साऱ्यांचा एकत्रित परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होताना दिसतो. परिणामी, नैराश्य, चिंता, भावनिक एकाकीपणा आणि अस्थिरता वाढत चालली आहे. त्यामुळे केवळ वैयक्तिक समुपदेशन नव्हे, तर संरचनात्मक आणि धोरणात्मक हस्तक्षेपाची गरज पुढे आली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विद्यार्थी संरक्षण व मानसिक स्वास्थ्य धोरण २०२५ हे राज्यभरात सुरक्षित, संवेदनशील आणि भावनिकदृष्ट्या सहायक शिक्षणपरिसर उभारण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरते. मानसिक आरोग्य हा दुय्यम विषय न मानता तो शिक्षणव्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे, ही ठाम भूमिका या धोरणातून अधोरेखित होते. या अंकात या धोरणावर आधारित लेख सादर करून, त्यातील संधी आणि आव्हानांचा सखोल विचार मांडण्यात आला आहे.

मानसिक तणावाच्या जोडीला व्यसनांचा विळखा हेही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोरील एक गंभीर वास्तव आहे. तणाव, एकटेपणा किंवा दबावातून सुटका मिळवण्यासाठी सुरू झालेली व्यसने हळूहळू व्यक्तिमत्त्व, शैक्षणिक वाटचाल आणि कौटुंबिक नातेबंध उद्ध्वस्त करू शकतात. या गुंतागुंतीच्या प्रश्नाकडे मानवी, संवेदनशील आणि अनुभवाधारित दृष्टिकोनातून पाहणारे लेखन 'मनचिये गुंती' या नव्या सदरामधून प्रसिद्ध मनोविकास तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी केले आहे. हा लेख व्यसनमुक्ती ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून, एक मानवी प्रवास असल्याची जाणीव करून देतो.

मानसिक स्वास्थ्याविषयीची ही चर्चा करतानाच शिक्षण हे केवळ वर्तमानापुरते मर्यादित नसून, ते ऐतिहासिक आणि सांस्कृतिक जाणीवेशीही जोडलेले असते, याचे भान ठेवणे तितकेच गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा गडकोटांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणे ही केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सांस्कृतिक अस्मितेसाठी ही अभिमानास्पद घटना आहे. गडकोट म्हणजे स्वराज्याची शिस्त, दूरदृष्टी आणि संवेदनशील नेतृत्व यांची साक्ष. या वारशाचा वेध घेणारे 'गाथा गडकोटांची' हे नवे सदर या अंकाचे विशेष आकर्षण ठरते.

शेवटी, उज्ज्वल करिअर घडवण्याइतकंच सुदृढ मन, समतोल व्यक्तिमत्त्व आणि सांस्कृतिक जाणीव घडवणं हेही शिक्षणाचं मूलभूत उद्दिष्ट असलं पाहिजे. कारण थकलेल्या आणि अस्वस्थ मनातून ना नवोन्मेष जन्माला येतो, ना समाज सशक्त बनतो. महाविद्यालयीन शिक्षण खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल तेव्हाच, जेव्हा विद्यार्थी केवळ पात्र नव्हे, तर समर्थ, संवेदनशील आणि जाणीवसंपन्न नागरिक म्हणून घडतील- आणि शिक्षणवेधचा हाच प्रयत्न आहे.

**डॉ. मृदुला बेळे**
संपादक, शिक्षणवेध : २०४७




मा. चंद्रकांत (दादा) पाटील, यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्याची नुकतीच वर्षपूर्ती झाली. त्याचबरोबर या विभागाचे मंत्री म्हणून त्यांचा एकूण कार्यकाळ आता तीन वर्षांचा झाला आहे. या काळातील कामगिरीचा आढावा घेणारा हा लेख.



**चंद्रकांतदादा पाटील**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

# देशाला ज्ञानातून समृद्ध करणारे उच्च व तंत्र शिक्षण

भारताच्या शिक्षण क्षेत्रात नवा इतिहास लिहिणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे आगामी पिढ्यांना सक्षम, कौशल्यसमृद्ध आणि जागतिक स्पर्धेत उतरण्यास समर्थ बनविणारे धोरण मानले जाते. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्रात करण्यात यावी यासाठी राज्य सरकारने गेल्या तीन वर्षांत अनेक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेतले आहेत. शिक्षणात गुणवत्ता वाढवणे, तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे, ग्रामीण भागापर्यंत संधी पोहोचवणे आणि विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवणे-या सर्व बाबींमध्ये राज्याने पुढाकार घेतला आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांची सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी एकात्मिक डॅशबोर्ड तयार केला आहे. प्रवेश, निकाल, शिष्यवृत्ती, संलग्नता, वसतिगृहे, ग्रंथालये इत्यादी सर्व तपशील आता या डिजिटल माध्यमातून सहज उपलब्ध होत आहेत. यामुळे व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांना दोघांनाही मोठी सोय झाली आहे.

ज्ञान सर्वांसाठी उपलब्ध व्हावे, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार ऑनलाईन शिक्षण पोहोचावे, या उद्देशाने महाज्ञानदीप हे डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्राने सुरू केले आहे.. जवळजवळ एक हजार MOOC तज्ज्ञ प्राध्यापक तयार करण्याचा संकल्प, IKS (Indian Knowledge System) सारखे अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार करणे आणि ते एका क्लिकवर विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, हा महाराष्ट्राचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे.

महाराष्ट्राने नॅक मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकनात उल्लेखनीय कामगिरी केली असून, २७४१ संस्थांचे मूल्यांकन पूर्ण करून राज्य देशात पहिल्या क्रमांकावर पोहोचले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची ही सर्वांत ठोस पावले मानली जातात.

विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, तक्रार निवारण आणि आत्महत्या प्रतिबंध यांसारख्या संवेदनशील विषयांवर प्रभावी धोरण तयार करण्यासाठी राज्य सरकारने तज्ज्ञांची समिती स्थापन केली आहे. सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि समर्थनात्मक वातावरण निर्माण करणे हा या समितीचा उद्देश आहे.

भारतीय संत परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याकरिता पैठण येथील संतपीठाला आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. शैक्षणिक व्यवस्थापनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला मुदतवाढ आणि अध्यापक कर्मचारी व्ययासाठी निधी देण्याचा निर्णयही राज्याने घेतला आहे.

उच्च व तंत्र विभाग अंतर्गत मंत्रालय, विविध संचालनालये, विभागीय सहसंचालक कार्यालये आदी कार्यालयातील विविध प्रकरणांचा त्वरित निपटारा व्हावा यासाठी 'झिरो पेंडन्सी अँड डेली डिस्पोजल ड्राइव्ह' राबविण्यात आली. अनेक प्रकरणे वेगाने निकाली काढून प्रशासन अधिक गतिमान आणि सुलभ करण्यात आले आहे.

विद्यार्थी-केंद्रित आणि गुणवत्तापूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांना देण्यात येणाऱ्या राज्य शिक्षक पुरस्काराला यंदापासून डॉ. जे. पी. नाईक यांचे नाव देण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या जागतिक मान्यतेस योग्य सन्मान लाभण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरला आहे.

अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे स्थापन झालेल्या पहिल्या मराठी विद्यापीठाला प्रारंभीच्या सुविधा उभारण्यासाठी राज्य सरकारने २ कोटी २९ लाखांहून अधिक निधी मंजूर केला आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये राज्यातील सहा हजारांहून अधिक महाविद्यालयांत संविधान गौरव महोत्सव साजरा करण्यात आला. संविधानाने दिलेल्या लोकशाही मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये जाण वाढविण्याचा हा उपक्रम विशेष ठरला.



NEP-२०२० अंतर्गत विविध योजना, शिष्यवृत्ती, कोर्सेस याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी स्कूल कनेक्ट २.० उपक्रम राबविण्यात आला. पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये या उपक्रमामुळे झालेली प्रवेशवाढ लक्षवेधी ठरली असून, आता हे मॉडेल बारावीच्या विद्यार्थ्यांसाठीही राबवले जात आहे.

Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) अंतर्गत विद्यार्थी प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव घेतात आणि त्याच वेळी शैक्षणिक अभ्यासक्रमही पूर्ण करतात. उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दरी कमी करणारा हा कार्यक्रम महाराष्ट्रात वेगाने राबवला जात आहे.

विद्यापीठातील विभागांना NIRF आणि QS मानदंडांच्या आधारे अंतर्गत रँकिंग देण्यासाठी University Department Ranking Framework लागू करण्यात आले आहे. यामुळे संशोधन, गुणवत्ता आणि पारदर्शकता वाढण्यास मदत होत आहे.

New College Permission System (NCPS) द्वारे नवीन महाविद्यालयांना मान्यता देण्याची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली आहे. ई-गव्हर्नन्सद्वारे पारदर्शकता, वेग आणि अचूकता वाढली आहे.

पीसीएम, पीसीबी आणि एमबीए कोर्सेससाठी सीईटी परीक्षा आता दोन वेळा घेण्याचा निर्णय राज्याने घेतला आहे. विद्यार्थ्यांना अधिक वेळा संधी मिळावी या दृष्टीने केलेला हा बदल महत्त्वाचा समजला जातो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिकत असतानाच प्रत्यक्ष उद्योग प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाव्या म्हणून 'शिका व कमवा' योजना यशस्वीपणे राबवली जात आहे.

सीईटी परीक्षेची तयारी अधिक सक्षम व्हावी यासाठी 'CET-ATAL' हे सायकोमेट्रिक आणि मॉक टेस्ट मॉड्यूल सुरू करण्यात आले आहे. बालचित्रकला स्पर्धा आणि शासकीय रेखाकला परीक्षांमध्ये बक्षीस रकमेतील मोठी वाढ करून कला विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. सार्वजनिक ग्रंथालयांना आता अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. नवीन Library Grant Management System मुळे प्रक्रिया पारदर्शक आणि वेगवान झाली आहे. तसेच ग्रंथालय अधिनियमात बदल करून डिजिटल संसाधनांनाही 'पुस्तक' या व्याख्येत समाविष्ट केले आहे.

शिक्षण क्षेत्रातील ही सर्व उपक्रमांची मालिका केवळ सुधारणा नसून, एक दीर्घकालीन परिवर्तन आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वज्ञानावर आधारित भारताचे ज्ञानाधिष्ठित भविष्य घडविण्यात महाराष्ट्राची भूमिका अधिक निर्णायक ठरत आहे. NEP २०२० ही भावी पिढ्यांना जागतिक दर्जाचे, समतोल आणि सर्वसमावेशक शिक्षण देणारी क्रांती आहे, आणि महाराष्ट्र या क्रांतीचा मार्गदर्शक बनत आहे.



उच्च शिक्षण केवळ पदवीपुरते न उरता ते उद्योगाभिमुख आणि विद्यार्थीकेंद्री व्हावे यासाठी गेल्या तीन वर्षांत विविध पातळ्यांवर प्रयत्न केले जात आहेत. त्यातील अनेक यशस्वी झाले आहेत. या वाटचालीचा हा मागोवा.



**डॉ. शैलेन्द्र देवळाणकर**
संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे

# उद्दिष्टाकडे निघालेली परिवर्तनयात्रा

गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्राने बदलाच्या वाटेवर पुष्कळ पुढचे टप्पे गाठले आहेत. त्यात अनेक गोष्टींचे उल्लेख करता येतील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 ची अंमलबजावणी, राबवल्या गेलेल्या विद्यार्थी कल्याणकारी योजना आणि पर्यावरणपूरक उपक्रम, डिजिटल परिवर्तन, गुणवत्तावृद्धी अशा अनेक गोष्टी त्यात समाविष्ट आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयाचे योजनाबद्ध आणि दूरदर्शी धोरण राज्यातील उच्च शिक्षणाला निश्चित नवे परिमाण देते आहे. शिवाय शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता कौशल्याधिष्ठित, उद्योगाभिमुख, संशोधनाधारित आणि विद्यार्थी-केंद्रित बनविण्याचा प्रयत्न यामागे आहे.

शिक्षण क्षेत्राच्या परिवर्तनाचा विचार ज्यात केलेला आहे त्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP ) याच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अग्रणी भूमिका निभावली आहे. प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेला कार्यबलगट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेली सुकाणू समिती यांच्या मार्गदर्शनाखाली पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये National Cred-it Framework आधारित नव्या अभ्यासक्रम पद्धतीची अंमलबजावणी २०२३–२४ पासून सुरू झाली. या

बदलांमुळे विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्ठिता मिळालीच; पण अनेक विषय निवडण्याची लवचिकता मिळाली आहे. याखेरीज प्रत्यक्ष अनुभव, OJT, VSC/SEC आणि AEC सारख्या घटकांमुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय राज्यातील विद्यार्थिनींसाठी निश्चितपणे ऐतिहासिक ठरला आहे. ८ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार आठ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल, OBC, SEBC व इतर सामाजिकदृष्ट्या मागास गटांतील मुलींना १००% शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्यात आले. या निर्णयाने उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढविण्यास मोठी गती मिळणार आहे. २०२५–२६ पासून राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये ही योजना पूर्णपणे लागू करण्याची आखणी केली गेली आहे.

विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि वसतिगृह सुविधा या नेहमीच महत्त्वाच्या असतात हे लक्षात घेऊन संचालनालयाने या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. उच्च शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून १४ शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात . २०२४–२५ मध्ये लाखो विद्यार्थ्यांना DBT मार्फत निधी वितरीत करण्यात आला; तसेच राज्यातील ७२ शासकीय वसतिगृहे, प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह आणि आर्थिक दुर्बल घटकांसाठी EBC वसतिगृहे या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि अध्ययनासाठी योग्य वातावरण उपलब्ध झाले आहे.

शिक्षकेतर कर्मचारी भरतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. ८७९८ रिक्त पदांपैकी २९५५ पदांच्या भरतीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून अकृषी विद्यापीठांतील १०४१ पदांच्या भरतीसाठीही आवश्यक कार्यवाही पुढे नेण्यात आली. यामुळे महाविद्यालयांमधील प्रशासकीय कार्याला वेग येईल; तसेच प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी व्हावे यासाठी 'शून्य प्रलंबितता' ही मोहीम राबविण्यात आली. याअंतर्गत संचालनालय व विभागीय सहसंचालक कार्यालयांतील ४१८६ प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेंतर्गत संकेतस्थळ अद्ययावत करणे, कार्यालयीन सुविधा सुधारणे, तक्रार निवारण, स्वच्छता, कर्मचारी प्रशिक्षण, AI चा वापर, नावीन्यपूर्ण उपक्रम अशा अनेक क्षेत्रांमध्ये काम सुरू आहे. शेकडो महाविद्यालयांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

NEP विषयी जनजागृतीसाठी 'स्कूल कनेक्ट २.०' या उपक्रमाद्वारे ४८०० हून अधिक शाळांना भेटी देण्यात आल्या. एक लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांपर्यंत नवीन अभ्यासक्रम, संधी आणि करिअर मार्गदर्शनाची माहिती नेण्यात आली. यात शिक्षक व पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला. विद्यार्थ्यांनी उद्योगाभिमुख व्हावे यासाठी Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. राज्यातील १५ विद्यापीठांतील १६५ महाविद्यालयांमध्ये २०२५–२६ पासून ५००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना उद्योग-अभ्यासक्रमाचा प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे. BOAT सोबतचा सामंजस्य करारही या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे.

डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने Maharashtra Higher Education Atlas चा भाग म्हणून HTED डॅशबोर्ड विकसित करण्यात आला आहे. याद्वारे राज्यातील सर्व विद्यापीठांचा डेटा API द्वारे जोडला गेला आहे. विद्यार्थ्यांसाठी आणि संस्थांसाठी आवश्यक माहिती एका क्लिकवर उपलब्ध होण्याचा हा पहिला प्रयत्न आहे.

महाज्ञानदीप पोर्टल हे आज महाराष्ट्राच्या गरजांनुसार ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारे राज्य-केंद्रित व्यासपीठ बनले आहे. IKS आधारित अभ्यासक्रम विकसित करण्याचे काम झपाट्याने सुरू आहे.

NAAC मूल्यांकनात महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्यातील ४१ विद्यापीठे आणि २७०० महाविद्यालये, असे एकूण २७४१ संस्थांचे मूल्यांकन पूर्ण झाले आहे. राज्याच्या गुणवत्तावृद्धीचा हा एक मोठा टप्पा मानायला हवा. अर्थात सातत्यपूर्ण बैठकांमधून झालेल्या चर्चा आणि ठोस धोरणात्मक अंमलबजावणी यामुळे हा दर्जा मिळवता आला.

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढविण्यात मोठे योगदान दिले आहे. या उपक्रमात ६००० हून अधिक महाविद्यालयांचा सहभाग, ४५ लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेली पुस्तके आणि लाखो विद्यार्थ्यांनी केलेला वाचन संकल्प या कार्यक्रमाचे व्यापक यश अधोरेखित करतो.

पर्यावरण संवर्धन क्षेत्राशी तरुणांना जोडण्यासाठी UNICEF–HTED सामंजस्य करारांतर्गत YEWS अभियान सुरू आहे. १३ जिल्ह्यांत कार्यरत असलेले १४३३ ग्रीन क्लब, WhyWaste–YEWS ॲपवरील ८ लाख नोंदणीकृत विद्यार्थी आणि ३ कोटी घनमीटरपेक्षा अधिक पाणी बचतीचा ऐतिहासिक टप्पा गाठता आला. आज ऊर्जा बचत, जलसंधारण, पुनर्वापर आणि जैवविविधता संवर्धनासाठी विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाले आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये प्रशासनिक सेवा, नेतृत्व आणि स्पर्धा परीक्षांबाबत उत्साह निर्माण करण्यासाठी राज्यस्तरीय करिअर मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरण; तसेच सह्याद्री शिक्षण संवाद आणि 'प्रश्न तुमचे–उत्तर आमचे'सारखे




उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. संबंधित मंत्री यासाठी महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद करत आहेत.

विद्यापीठांचे आंतरराष्ट्रीयीकरण वाढावे म्हणून राज्य सरकार परदेशी विद्यापीठांशी सहयोग वाढविण्यासाठी दिशेने काम करत आहे. Joint, Dual आणि Twinning Degree या संकल्पना तसेच भारतात परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस स्थापन करण्याच्या दिशेने केंद्र सरकारच्या धोरणांना महराष्ट्र साथ आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठे जागतिक शिक्षणाशी जोडण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Joint/Dual/Twinning Degree च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र सरकार परदेशी विद्यापीठांसोबत अभ्यासक्रम, विद्यार्थी-अदानप्रदान, संशोधन सहकार्य वाढविण्याच्या दिशेने प्रयत्न करीत आहे. भारतात परदेशी विद्यापीठांचे कॅम्पसेस स्थापन करण्यासाठीही मार्गदर्शक धोरणे तयार करण्यात आली आहेत.

याखेरीज संविधान गौरव महोत्सव, रक्तदान अमृतमहोत्सव, Clean-Green उपक्रम, स्वच्छता ही सेवा, शहीद भगतसिंग जयंती, विश्व पर्यटन दिवस, जागतिक हृदय दिन अशा अनेक उपक्रमांमध्ये होणारा विद्यार्थी सहभाग त्यांचे सामाजिक भान धारदार करते आहे.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये संशोधन-विकासाला प्रोत्साहन मिळावे यासाठी University Department Ranking Framework (UDRF) लागू करण्यात आले आहे. अकृषी विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन देऊन संशोधन, संसाधनांचा कार्यक्षम वापर, पारदर्शकता आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याचा महत्त्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण अधिक सक्षम, सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्ण, तंत्रज्ञानाभिमुख आणि विद्यार्थीकेंद्रित व्हावे यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात १६,२६१.५६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यात मुलींना मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती, NEP अंमलबजावणी, AEDP, डिजिटल स्टॅक आणि गुणवत्तावृद्धी अशा विविध गोष्टींना प्राधान्य दिले आहे.

थोडक्यात, मागील तीन वर्षांत राबविण्यात आलेली विविध उपक्रमांची ही साखळी शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून महाराष्ट्राला ‘विकसित भारत २०४७’ च्या दिशेने पुढे न्यायला मदत करते आहे. राज्यातील विद्यार्थ्यांसाठी नवीन संधी आणि अनुभव याची वाट मोकळी करत आहे.

गेल्या तीन वर्षांत उच्च शिक्षण संचालनालयाने राबविलेल्या उपक्रमांमुळे महाराष्ट्राचे उच्च शिक्षण अधिक सक्षम, सर्वसमावेशक, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि विद्यार्थी-केंद्रित झाले आहे. हे प्रयत्न भविष्यात महाराष्ट्राला शिक्षण समृद्ध, स्पर्धासक्षम आणि नवोपक्रमशील राज्य अशी ओळख नक्की प्राप्त करून देईल.




तंत्रज्ञानातील क्रांती जे वैश्विक बदल घडवते आहे, त्याच्याशी जमवून घेण्यासाठी शिक्षणात अधिक लवचिकता आणि मानवकेंद्री दृष्टिकोन आणणे ही काळाची गरज आहे.




**प्रा. डॉ. विनोद मोहितकर**
संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे


# परिवर्तनाच्या वाटेवरील आव्हाने

महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण क्षेत्र आज परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभे आहे. जागतिक स्तरावर तंत्रज्ञानाने घेतलेली झेप, उद्योगजगताच्या बदलत्या गरजा आणि विद्यार्थ्यांच्या वाढत्या आकांक्षा यांचा विचार करता, शिक्षणात सुधारणा राज्याच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वपूर्ण टप्पा आहे हे लक्षात घेऊन उच्च व तंत्रशिक्षण विभाग नावीन्यपूर्ण धोरणे, योजना आणि कार्यक्रम राबवून 'विकसित महाराष्ट्र २०४७' या ध्येयाच्या दिशेने ठोस पावले टाकत आहे.

आज, जग तांत्रिक प्रगतीसह वैश्विक बदलाच्या उंबरठ्यावर उभे आहेत. उद्योग ४.० ने आपल्याला स्वयंचलन (Automation) आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब (Digitalization) शिकवले; परंतु उद्योग ५.० यापुढे जाऊन मानवी बुद्धिमत्ता, सर्जनशीलता आणि निर्णयक्षमता यांना मशिन आणि तंत्रज्ञानासह जोडण्यावर भर देत आहे. हा बदल केवळ उत्पादन प्रक्रियेत नाही, तर शिक्षण, प्रशासन आणि आपल्या जीवनशैलीतही होत आहे.

### उद्योग ५.० ची त्रिसूत्री:

उद्योग ५.० हे तीन प्रमुख स्तंभांवर आधारित आहे :

**१. मानवकेंद्रितता (Human-Centricity):** मानवी गरजांची पूर्ती आणि कामाच्या ठिकाणी मानवी अस्तित्वाला अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर.




**२. शाश्वतता (Sustainability):** पर्यावरणपूरक, कार्बन-न्युट्रल आणि चक्रीय अर्थव्यवस्थेला (Circular Economy) प्रोत्साहन देणारे तंत्रज्ञान.

**३. लवचिकता (Resilience):** अप्रत्याशित जागतिक संकटांना आणि बदलांना तोंड देण्यासाठी मजबूत, त्वरित जुळवून घेणाऱ्या प्रणालीचा विकास.

देशाचे विकास इंजिन म्हणून महाराष्ट्राला आघाडीवर ठेवण्यासाठी तंत्रशिक्षणामध्ये या त्रिसूत्रीचा अंगीकार करणे अनिवार्य आहे. केवळ काय शिकवायचे यावर लक्ष केंद्रित न करता, 'कसे' आणि 'कशासाठी' शिकवायचे यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

## नवीन कौशल्य दरी आणि आव्हान :

पूर्वीची कौशल्य दरी (Skill Gap) केवळ विशिष्ट तंत्रज्ञानाच्या ज्ञानाशी संबंधित होती. आताची मात्र अधिक सखोल आहे. विद्यार्थ्यांना केवळ कोड (Code) लिहिता यायलाच हवा; पण त्या कोडमागील नैतिक विचार (Ethical Considerations), त्याचे सामाजिक परिणाम आणि डिझाइन थिंकिंगही (Design Thinking) माहीत असणे गरजेचे आहे.

आपल्याला यंत्रांवर नियंत्रण ठेवणारे, शाश्वत उपाययोजनांची जाणीव असलेले आणि भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) असलेले तंत्रज्ञ हवे आहेत. इथे कौशल्य दरी असून, तंत्रशिक्षण संचालनालय (DTE) आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागातील (H&TE) अभ्यासक्रम आणि उपक्रमांद्वारे ती भरून काढणे शक्य आहे. तसा आमचा संकल्प आहे.

## तंत्रशिक्षण संचालनालयाचे उत्तरदायित्व आणि कार्यवाही :

**१. अभ्यासक्रमात शाश्वतता आणि लवचिकतेचा समावेश :** उद्योग ५.० च्या मागणीनुसार, हरित कौशल्ये (Green Skills) आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांचे तंत्रज्ञान (Renewable Energy Technologies) अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यावर संचलनालय जोर देत आहे. विद्यार्थ्यांमध्ये जलसंधारण, प्रदूषण नियंत्रण आणि चक्रीय अर्थव्यवस्थेचे ज्ञान रुजवण्यासाठी प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण पद्धती (Project-Based Learning) वापरणे गरजेचे आहे.

**२. मानवकेंद्रित शिक्षणाला प्राधान्य (NEP २०२० चा आधार):** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP २०२०) च्या अनुषंगाने, तंत्रशिक्षणामध्ये आंतरविद्याशाखीय (Inter-disciplinary) दृष्टिकोन स्वीकारला जात आहे. विद्यार्थ्यांना मानव्यविद्या, कला आणि व्यवस्थापन या विषयांचे मूलभूत ज्ञान देऊन त्यांना अधिक सर्वसमावेशक (Holistic) तंत्रज्ञ बनवण्याचे आमचे ध्येय आहे.

**३. उद्योग-शिक्षण क्षेत्र समन्वय (Industry-Academia Collaboration):** संशोधन आणि विकास (R&D) यांचा उद्योगांशी थेट समन्वय हा या बदलाचा कणा आहे. उद्योग ५.० साठी आवश्यक असलेल्या AI, IoT, Robotics अशा उदयोन्मुख तंत्रज्ञानासाठी उत्कृष्टतेचा ध्यास असलेल्या केंद्रांनी (Centers of Excellence - CoE) उद्योगांच्या सहकार्याने काम करणे आवश्यक आहे. उद्योगांनी इंटर्नशिप, ॲप्रेंटिसशिप (शिकाऊ उमेदवार योजना) आणि गेस्ट लेक्चर्सद्वारे विद्यार्थ्यांशी जोडून घ्यावे, असे आवाहन त्यांना केले जात आहे.

**४. शिक्षकांचे क्षमतावर्धन (Faculty Upgradation):** उद्योग ५.० च्या त्रिसूत्रीनुसार, शिक्षकांना केवळ सायबर सुरक्षा (Cyber Security), क्लाउड कंप्युटिंग आणि मानवी-मशीन संवाद (Human-Machine Interaction) यांसारख्या क्षेत्रातीलच नाही, तर क्वांटम कंप्युटिंग (Quantum Computing) आणि ॲडिटीव्ह मॅन्युफॅक्चरिंग, ड्रोन तंत्रज्ञान इ. सारख्या भविष्यातील तंत्रज्ञानाचेही सखोल ज्ञान देणे आवश्यक आहे.

अभ्यासक्रमात शाश्वतता (Sustainability) आणि लवचिकता (Resilience) आणण्यासाठी, शिक्षकांना हरित तंत्रज्ञान (Green Technology) आणि संकरित अध्यापन पद्धती (Hybrid Learning Models) वापरण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. बदल घडवून भविष्याच्या निर्मितीत शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे.

उद्योग ५.० ही महाराष्ट्रासाठी एक मोठी संधी आहे. तंत्रज्ञान आणि मानवी कल्पनाशक्ती यांच्या समन्वयातूनच अधिक कार्यक्षम, नैतिक आणि शाश्वत भविष्य निर्माण करू शकतो.



राज्यातील तंत्रनिकेतने गेल्या दोन वर्षांपासून पुन्हा विद्यार्थ्यांनी गजबजली आहेत. याचे कारण या शिक्षणाकडे विद्यार्थ्यांनी वळावे यासाठी संचालानायातर्फे केले गेलेले प्रयत्न. त्यात तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे हेही महत्त्वाचे.



**प्रा. प्रमोद नाईक**

संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

# तंत्र निकेतने पुन्हा गजबजली!

काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील पदविका तंत्रशिक्षणाबद्दल एक प्रामाणिक चिंता व्यक्त होत होती. राज्यात सुरू असलेली तंत्रनिकेतने, त्यातील विविध प्रयोगशाळा, शिक्षकवर्ग, उद्योग जगतातील मागणी, असे सर्व काही उपलब्ध असूनही प्रवेश संख्येत मात्र समाधानकारक वाढ दिसत नव्हती. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात पदविका अभ्यासक्रमांसाठी सुमारे ४१ टक्केच प्रवेश होत होते. विद्यार्थ्यांचा कल इतर पर्यायांकडे वळत असल्याची जाणीव शासनाला, तंत्रशिक्षण संचालनालयाला आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाला प्रकर्षाने होत होती.

आज मात्र चित्र वेगळे आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेशाची टक्केवारी ९० पर्यंत पोहोचली आणि २०२५-२६ मध्ये तर ती जवळजवळ ९५ टक्क्यांच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली. ही केवळ आकड्यांची उडी नाही, तर समाजाच्या, पालकांच्या आणि उद्योगजगताच्या नजरेत महाराष्ट्रातील पदविका तंत्रशिक्षणाने पुन्हा एकदा आपला दर्जा सिद्ध केल्याचे ठळक प्रतीक आहे. हे परिवर्तन म्हणजे राष्ट्रीय शिक्षण धोरणाद्वारे (NEP–२०२०) अनुरूप अभ्यासक्रम सुधारणा, उद्योगाभिमुख कौशल्य-केंद्रे उभारणी, डेटा-आधारित ई-गव्हर्नन्स, डिजिटल परीक्षा प्रणाली आणि 'स्कूल कनेक्ट प्रोग्राम' या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम आहे.

### विद्यार्थीकेंद्रित अभ्यासक्रमाची नवी पायरी

NEP–२०२० या धोरणाने भारतातील शिक्षणव्यवस्थेसमोर एक स्पष्ट, आधुनिक आणि लवचिक चौकट ठेवली. हे धोरण परावर्तीत करण्याची आणण्याची जबाबदारी MSBTE ने आपल्या खांद्यावर घेतली. याच ध्येयातून के योजना (K-Scheme) हा नवीन पदविका

अभ्यासक्रम निर्माण झाला. या योजनेच्या अंतर्गत ५१ पदविका अभ्यासक्रमांची पुनर्रचना करून सहा सत्रांमध्ये एकूण १२० क्रेडिट्सची नीट मोजून मापून बांधणी करण्यात आली आहे. संपूर्ण अभ्यासक्रम Outcome-Based Education (OBE) तत्त्वावर आधारित असून, PEO, PO आणि PSO यांचे स्पष्ट मॅपिंग केले गेले आहे. विद्यार्थ्याने तीन वर्षांच्या शेवटी कोणत्या कौशल्यांसह बाहेर पडावे, त्याची उद्योगक्षेत्रात व समाजात काय भूमिका असावी, याचे नियोजन अभ्यासक्रमाच्या प्रत्येक टप्प्यात करण्यात आलेले आहे.

या नव्या अभ्यासक्रमाची एक महत्त्वाची जमेची बाजू म्हणजे दोन भाषांमध्ये शिकण्याची सुविधा. यात इंग्रजीबरोबर मराठी माध्यमातूनही शिकण्याची आणि परीक्षेमध्ये मराठीमध्ये लिहिण्याची मुभा असल्याने भाषेची अडचण मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांना आता मातृभाषेतून तंत्रशिक्षण घेण्याचा आत्मविश्वास लाभला आहे.

NEP–२०२० मधील Multiple Entry–Exit या संकल्पनेला प्रत्यक्ष आकार देत, या योजनेत विद्यार्थ्यांना तीन वेगवेगळ्या टप्प्यांवर प्रमाणपत्रे देण्याची रचना केली आहे.

- एका वर्षानंतर Certificate of Vocation
- दोन वर्षांनंतर Diploma in Vocation
- आणि तीन वर्षांनंतर Diploma in Engineering

एखाद्या कारणामुळे शिक्षणात खंड पडला, तरी प्रमाणपत्रापासून विद्यार्थी पूर्णपणे वंचित राहत नाही; काही वर्षांनी परत येऊन त्याच क्रेडिट्सचा उपयोग करून पुढील शिक्षण सुरू ठेवू शकतो. ही लवचिकता हा विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा आहे. अभ्यासक्रमात केवळ तांत्रिक विषयांवर भर न ठेवता Soft Skills, Social & Life Skills, Yoga, Entrepreneurship, भारतीय ज्ञान परंपरा, भारतीय राज्यघटना, पर्यावरण आणि व्यवस्थापन यांसारख्या विषयांचा समावेश करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेतूपुर्वक साधला जात आहे. विद्यार्थी केवळ कुशल तंत्रज्ञ नव्हे, तर जबाबदार नागरिक, एखाद्या संघाचा भाग/सहकारी आणि उद्योजक म्हणून तयार व्हावा, हा दृष्टिकोन प्रत्येक सत्रातील विषय निवडीतून जाणवतो.

उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा समावेश हे या योजनेचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य आहे. IoT, Robotics, Drone Technology, Python Programming, 5G, Cloud Computing, Data Analytics, Electric Vehicle Technology, Machine Learning, Artificial Intelligence, Green Building, Energy Conservation, UI/UX Design अशा विषयांमुळे अभ्यासक्रमाचा चेहरा पूर्णपणे अद्ययावत झाला आहे.

याबरोबरच प्रत्येक सत्रात Micro Projects आणि अंतिम सत्रात Capstone Project अनिवार्य असल्याने 'करून शिकणे' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. स्थानिक उद्योग, ग्रामपंचायत, नगर परिषद, शाळा किंवा स्टार्टअप यांच्यासोबत लहान-मोठे प्रकल्प करताना विद्यार्थ्याला समाजाशी व उद्योगाशी थेट संवाद साधण्याची संधी मिळते. त्यातून त्याची समस्या-ओळख, समाधानाची रचना आणि टीमवर्क ही तिन्ही कौशल्ये विकसित होतात.

Academic Bank of Credits (ABC) व National Credit Framework (NCrF) याच्याशी हा अभ्यासक्रम संलग्न केल्याने विद्यार्थ्यांना दीर्घकालीन शिकण्याचा मार्ग मोकळा करून देते. एकदा मिळवलेले क्रेडिट्स भविष्यातील शिक्षणासाठी उपयोगात आणता येतात; त्यामुळे 'आज शिकलेले उद्या वाया जाणार नाही,' हा विश्वास विद्यार्थ्यांच्या मनात दृढ होतो.

## कॉलेज ते करिअरचा पूल


अभ्यासक्रम कितीही आधुनिक असला, तरी प्रयोगशाळा, कार्यशाळा आणि उद्योगाशी थेट संबंध नसेल, तर विद्यार्थी प्रत्यक्ष कामासाठी पूर्णपणे तयार होत नाही. ही जाणीव लक्षात घेऊन मंडळाने राज्यामध्ये काही शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये उत्कृष्टता केंद्रे (CoE: Centres of Excellence) आणि कौशल्य-केंद्रे उभारली.

रोबोटिक्स, IoT, 3D Printing, Embedded Systems यांसारख्या क्षेत्रांसाठी स्थापन केलेली ९ उत्कृष्टता केंद्र केंद्रे (CoE: Centres of Excellence) ही उत्तम शिक्षण देणारी केंद्रे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक, हाताळणीवर आधारित प्रशिक्षण देतात. शासकीय तंत्रनिकेतनांत तयार करण्यात आलेल्या ४१ बहुउद्देशी संगणक केंद्रांमुळे (Multipurpose Computer Centres) डिजिटल शिक्षण, सॉफ्टवेअर प्रशिक्षण आणि ऑनलाइन संसाधनांचा वापर सहज शक्य झाला आहे. मुंबई आयआयटीच्या सहकार्याने उभारलेल्या E-Yantra Labs मध्ये विद्यार्थ्यांना Robotics आणि Embedded Systems मधील उद्योगोपयोगी प्रकल्पांचा अनुभव मिळतो. NIELIT बरोबरचा सामंजस्य करार (MoU) आणि NSDC International सह Skill-Based Courses यांमुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळेल अशी प्रमाणपत्रे आणि कौशल्ये लाभत आहेत.

उद्योजकतेला चालना देण्यासाठी Bhau Institute, Pune यांच्याबरोबर सामंजस्य करार करून काही निवडक तंत्रनिकेतनांमध्ये Incubation व Start-up याबाबतचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. येथे विद्यार्थी स्वतःच्या कल्पना स्टार्टअपमध्ये रूपांतरित करण्याचा प्रवास मार्गदर्शकांच्या मदतीने करतात. नोकरी शोधणाऱ्यापासून (Job Seeker) नोकरी निर्माण करणाऱ्यापर्यंतचा (Job Creator) हा प्रवास, NEP–२०२० च्या उद्योजकतेवर आधारित तत्त्वज्ञानाशी सुसंगत आहे.

कागदी फाइल्सवर अवलंबून असलेली, वेळखाऊ आणि अपारदर्शक प्रक्रिया आता हळूहळू इतिहासजमा होत आहे. MSBTE ने मागील काही वर्षांत Affiliation, Enrolment, Exam, Result, Scholarship, Training या सर्व क्षेत्रांसाठी एक Common Data Model तयार करून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल केली आहे.

I-Scheme आणि K-Scheme अभ्यासक्रमांसाठी तयार केलेल्या




NEP-Compliant Curriculum Governance Platform वर अभ्यासक्रमाशी संबंधित सर्व माहिती, जसे की PEO/PO/PSO, विषयांची यादी, क्रेडिट्स, प्रॅक्टिकल्स, माइक्रो-प्रोजेक्ट्स, इंटर्नशिप, प्रश्नपत्रिका रचना, लॅब-मॅन्युअल्स, प्रशिक्षण, स्पर्धा, स्कूल कनेक्ट उपक्रम एका एकात्मिक डिजिटल चौकटीत उपलब्ध आहे. सुरक्षित लॉगिन, Role-Based Access, Encryption आणि Audit Trails यांमुळे ही माहिती एकाच वेळी सुरक्षित, पारदर्शक आणि ऑडिटसाठी सहज उपलब्ध राहते.

परीक्षा प्रक्रियेत झालेला डिजिटल बदल तर कुणाही परीक्षार्थ्याला जवळून जाणवणारा आहे. Online Question Paper Development System, VPN आधारित सुरक्षित प्रश्नपत्रिका वितरण आणि Digital Evaluation याद्वारे उभी केलेली नवीन परीक्षा प्रणाली हळूहळू स्थिरावत आहे. प्रश्नपत्रिका तयार होणे, त्यांचे Moderation, Encryption, निवडलेल्या केंद्रांपर्यंत वेळेत आणि सुरक्षित पद्धतीने पोहोचणे, उत्तरपत्रिकांची स्कॅनिंग, डिजिटल मूल्यांकन, Moderation Tools, निकालांची स्वयंचलित टॅब्युलेशन – या सर्व टप्प्यांवर ई-गव्हर्नन्सची प्रभावी अंमलबजावणी दिसून येते.

याबरोबरच मंडळाने विकसित केलेल्या Live Dashboards मुळे प्रवेश, परीक्षा, मूल्यांकन, निकाल, शिष्यवृत्ती, तक्रारी, प्रशिक्षण कार्यक्रम अशा अनेक बाबींची स्थिती Senior Management, प्रभागीय अधिकारी आणि संबंधित विभागांना रिअल-टाइममध्ये दिसते. कोणत्या जिल्ह्यात प्रवेश कमी आहे, कुठे परीक्षा केंद्रातील संपर्काचा प्रश्न आहे, कोणत्या संस्थांमध्ये निकाल अपेक्षेपेक्षा कमी आहे, कोणत्या कोर्सेसमध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे – असे अनेक प्रश्न आता अंदाजाने नव्हे, तर ठोस डेटा पाहून हाताळले जात आहेत.

## तंत्रशिक्षण शाळांच्या दारी

पदविका अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश वाढवणे हे केवळ जाहिरातींचे काम नाही; विद्यार्थ्यांशी, पालकांशी आणि शाळेतील शिक्षकांशी थेट संवाद साधणे, त्यांच्या शंका जाणून घेणे आणि तंत्रशिक्षणाच्या संधी त्यांच्यापर्यंत समजेल अशा भाषेत पोहोचवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ही गरज ओळखून DTE व MSBTE कडून 'स्कूल कनेक्ट प्रोग्राम' सुरू करण्यात आला.

जिल्हा, तालुका आणि संस्था स्तरावर नोडल अधिकारी निश्चित करून त्यांनी स्थानिक शिक्षण अधिकाऱ्यांशी समन्वय साधत विविध शाळांमध्ये मार्गदर्शन सत्रे घेतली. पदविका तंत्रनिकेतनांचे प्राचार्य, उद्योगतज्ञ, यशस्वी माजी विद्यार्थी या सर्वांनी कार्यक्रमात सहभागी होऊन शाळकरी मुलांशी संवाद साधला.

या मार्गदर्शन सत्रांमध्ये पदविका अभ्यासक्रमांची रचना, पुढील उच्च शिक्षणाच्या संधी, रोजगारक्षेत्रातील मागणी, शिष्यवृत्ती, मुलींसाठी असलेल्या विशेष योजना, स्टार्टअप आणि उद्योजकता यांबद्दल सविस्तर माहिती दिली जाते. तंत्रनिकेतनांत तयार झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प शाळांमध्ये नेऊन दाखवले जातात, जेणेकरून मुलांना 'हाताने काम करणारे' तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहता येते.

या कार्यक्रमाला मजबुती देण्यासाठी मराठी वृत्तपत्रे, टीव्ही माध्यम, FM, सोशल मीडिया, अल्पचित्रफिती (टेलिफिल्म्स) आणि रेडिओ जिंगल्स यांचा एकत्रित वापर करण्यात आला. शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनांना दर वर्षी आर्थिक साह्य देऊन अधिकाधिक संस्था या कार्यक्रमात सहभागी होतील अशी व्यवस्था करण्यात आली. परिणामी, काही वर्षांतच प्रवेशाचे आकडे हळूहळू वर येऊ लागले आणि आज ९०-९५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहेत.

डिजिटल इंडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगात तरुणांना अपेक्षा आहे ती म्हणजे त्वरित, अचूक आणि मोबाइलवर मिळणाऱ्या सेवांची. हाच विचार डोळ्यासमोर ठेवून MSBTE ने 'डिप्लोमा साथी' हा WhatsApp-आधारित AI चॅटबॉट विकसित करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध असणारा हा चॅटबॉट विद्यार्थ्यांना, पालकांना आणि शिक्षकांना सदैव, म्हणजे २४x७ मार्गदर्शन देण्याची क्षमता बाळगतो. तीन-पायरी मेनू आणि मुक्त प्रश्न विचारण्याची सुविधा यामुळे तांत्रिक ज्ञान नसलेल्या व्यक्तीलाही सहज वापरता येईल अशी त्याची रचना आहे.

Gradually, हा चॅटबॉट MSBTE च्या विविध सेवांशी जोडला जाईल. Transcript, Migration Certificate, Result, Revaluation, Curriculum Search, RTS अंतर्गत अर्ज यांसारख्या सेवांची स्थिती विद्यार्थ्यांना थेट WhatsApp वर पाहता येईल. ग्रामीण भागातील विद्यार्थी, काम करणारे पालक,

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

N·S·D·C
National
Skill Development
Corporation
Transforming the skill landscape

ज्येष्ठ नागरिक या सर्वांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सुरक्षित Authentication, Logs, Audit Trails आणि Admin Dashboard यामुळे या सेवेमध्येही पारदर्शकता आणि उत्तरदायित्व टिकून राहते.

### पुढचा प्रवास

अर्थात, या सर्व परिवर्तन प्रवासात आव्हानेही होतीच. ग्रामीण भागांतील इंटरनेटची मर्यादा, काही ठिकाणी हार्डवेअरची कमतरता, दीर्घ काळ कागदावर काम केलेल्या कर्मचाऱ्यांना डिजिटल प्रणाली आत्मसात करण्यासाठी लागणारा वेळ, जुन्या डेटामधील विसंगती अशा सर्व समस्यांशी सामोरे जाताना संयम, पुनःपुन्हा प्रशिक्षण आणि संवाद यांची मोठी गरज भासली.

या अनुभवातून काही महत्त्वाचे धडे मिळाले. तंत्रज्ञान बदलणे तुलनेने सोपे; पण वर्तन बदलणे अधिक कठीण आहे. ई-गव्हर्नन्सची साधने प्रभावीपणे वापरली जावीत, यासाठी नेतृत्व स्तरावरून सतत प्रोत्साहन, आदर्श वापर आणि 'डेटा-आधारित निर्णय' ही संस्कृती रुजवणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले. डॅशबोर्डवरील आकडे फक्त बघायचे नाहीत, तर त्यावर चर्चा करून प्रत्यक्ष कृती ठरवायची ही सवय हळूहळू विकसित होत आहे.

आज MSBTE पुढील टप्प्याकडे वाटचाल करत आहे. काही निवडक शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये Future Labs, Industry ५.०-सुसंगत प्रयोगशाळा, Outcome Analytics, Question-Level Analysis, Dropout Prediction यांसारख्या प्रगत डेटा-ॲनालिटिक्स साधनांचा वापर, Academic Bank of Credits चे अधिक सखोल एकत्रीकरण, आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक समावेशक, मोबाइल-मैत्रीपूर्ण सेवा या बाबींसाठी MSBTE प्रयत्नशील आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ हे केवळ परीक्षा घेणारे आणि गुणपत्रिका




देणारे मंडळ नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत सार्वजनिक संस्था आहे. NEP–२०२० ला अनुरूप के योजना अभ्यासक्रम, उत्कृष्टता केंद्रे, प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण, डेटा-आधारित ई-गव्हर्नन्स, डिजिटल परीक्षा प्रणाली, 'स्कूल कनेक्ट प्रोग्राम' आणि AI-आधारित 'डिप्लोमा साथी' या सर्व उपक्रमांचा एकच केंद्रबिंदू आहे – कौशल्यसंपन्न, नैतिक, उद्योगोन्मुख आणि सामाजिक भान असलेला युवक तयार करणे आणि पर्यायाने सक्षम, स्पर्धाक्षम आणि समतोल असा महाराष्ट्र घडवणे.

शासन, उद्योगजगत, तंत्रनिकेतने, शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी हे सगळे या परिवर्तनयात्रेतील भागीदार आहेत. 'शिक्षण वेध'सारख्या व्यासपीठामार्फत हा प्रवास वाचकांपर्यंत पोहोचावा आणि पुढील टप्प्यांसाठी ऊर्जा मिळावी ही अपेक्षा आहे.




# वाचन संस्कृतीस बळ

ग्रंथालये समृद्ध होऊन वाचक संस्कृतीला अधिकाधिक बळ मिळावे यासाठी ग्रंथालय संचालनालयातर्फे अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम हाती घेतले जात आहेतच, शिवाय शासनातर्फे ग्रंथालयांच्या प्रश्नांची दखल घेऊन त्याच्या निराकरणासाठी सर्वतोपरी मदत केली जात आहे.



**श्री. अशोक गाडेकर**
प्रभारी संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य हे देशातील पुरोगामी, प्रबल व प्रदीर्घ सांस्कृतिक वारसा लाभलेले राज्य आहे. ग्रंथालयांशी संबंधित अनेक संस्था, संघटना व व्यक्तींच्या प्रयत्नांमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९६७ साली 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम' मंजूर करणारे महाराष्ट्र हे देशातील चौथे राज्य ठरले. ग्रंथालय कायद्याचे विधेयक विधिमंडळात सादर करताना, 'जनतेचे नेतृत्व, कार्यकर्त्यांचे कर्तृत्व, दात्यांचे दातृत्व व शासनाचे पितृत्व' यावर राज्यातील ग्रंथालय चळवळीच्या सर्वांगीण विकासाची सारी भिस्त रहाणार आहे, अशी भूमिका तत्कालीन शिक्षणमंत्री यांनी शासनातर्फे स्पष्ट केलेली होती.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ ची अंमलबजावणी करण्याकरिता या अधिनियमातील तरतुदीनुसार ग्रंथालय संचालनालय या स्वतंत्र विभागाची दि. २ मे १९६८ रोजी स्थापना करण्यात आली आहे. त्यातील तरतुदीनुसार सार्वजनिक ग्रंथालय पद्धती प्रस्थापित करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, परिरक्षण, संघटन, नियोजन आणि विकास यांची जबाबदारी ग्रंथालय संचालनालयाकडे सोपविण्यात आली आहे. राज्य शासनाची देखरेख, निर्देशन आणि नियंत्रण आणि अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी ग्रंथालय संचालक यांना विभागप्रमुख म्हणून नेमण्यात आले आहे. या अधिनियमांमध्ये कालानुरूप आवश्यक सुधारणा करण्यासाठी ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेतला आणि २०२४ साली हिवाळी अधिवेशनात विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात या सुधारणांना मान्यता मिळाली. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) अधिनियम, २०२४ जानेवारी हे २०२५ च्या राजपत्रात प्रसिद्ध झाले आहेत . सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासात याचा भविष्यात



नक्कीच मोठ्या प्रमाणात लाभ होईल.

• ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेच्या अभ्यासक्रमात कालानुरूप सुधारणा

ग्रंथालय संचालनालयामार्फत घेतल्या जाणाऱ्या, १९९६ सालच्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेच्या (Certificate Course in Librarianship) अभ्यासक्रमात कालानुरूप सुधारणा करण्यासाठी ग्रंथालय संचालकांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. समितीने २४ साली शासनास सादर केलेल्या अहवालात सुचवलेल्या सुधारणा व शिफारशी स्वीकारून सुधारित अभ्यासक्रम व परीक्षेच्या सर्वसाधारण कार्यपद्धतीस लगेच त्याच वर्षी मान्यता देण्यात आली आहे. प्रदीर्घ काळानंतर सुधारणा झालेला हा अभ्यासक्रम २०२५ पासून लागू करण्यात आला असून, त्यामध्ये संगणक विषयाचा समावेश करून प्रत्यक्ष काम करण्यावर भर देऊन स्वतंत्र गुणांकनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक ग्रंथालय धोरण

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आणि शासकीय ग्रंथालयांचे बळकटीकरण, डिजिटायझेशन व आधुनिकीकरण करण्याच्या अनुषंगाने 'महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक ग्रंथालय धोरण' तयार करण्यासाठी 'ग्रंथालय धोरण समिती' गठीत करण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला असून, त्यानुसार अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

## राज्य ग्रंथालय परिषदेची प्रस्थापना

राज्य ग्रंथालय परिषदेची प्रस्थापना नुकतीच करण्यात आली आहे. ही विभागाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. याबाबत लवकरच बैठक घेऊन महत्त्वाच्या बाबीसंदर्भात शासनास सल्ला देण्याबाबत कार्यवाही होईल.

## शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना (Library Grant Management System-LGMS

या माध्यमातून परिरक्षण अनुदान देणे - महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७' मंजूर केला आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० तयार करण्यात आले आहेत. राज्यातील शासनमान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना सध्या ग्रंथालय संचालनालयाच्या कार्यकक्षेत असलेल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत सहायक अनुदान देण्यात येते. कालानुरूप ही अनुदान वितरण पद्धत अधिक सुलभ, प्रभावी, पारदर्शक व गतिमान व्हावी यासाठी सहायक अनुदानाची कार्यवाही ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणालीच्या (Library Grant Management System) माध्यमातून करण्यात येणार आहे. ग्रंथालयांचे अनुदान थेट ग्रंथालय संचालनालयाकडून ग्रंथालयांच्या बँक खात्यात ईसीएसद्वारे (ECS) जमा करण्याची कार्यवाही प्रस्तावित होते.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर वर्षी परिरक्षण अनुदान पारंपरिक पद्धतीने दिले जात असे. सदर अनुदान शासनाकडून ग्रंथालय संचालक व ग्रंथालय संचालकांकडून जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्याकडे वितरीत केले जाते. संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडून जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान वितरीत करण्याची कार्यपद्धती अस्तित्वात होती. २०२३-२४ या वर्षापासून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणालीमार्फत (Library Grant Management System-LGMS) अनुदान वितरीत करण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. श्री. चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत LGMS प्रणालीद्वारे शासनस्तरावरून संबंधित लाभार्थी ग्रंथालयाच्या खात्यात अनुदान

यशस्वीपणे जमा करण्यात आले. ई-प्रशासनाच्या दिशेने संचालनालयाने एक पाऊल पुढे टाकले आहे.

### राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई (कलिना सांताक्रुझ)

उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. १५ सप्टेंबर, २०२२ अन्वये रु. ७१,६९,६८,५४३ या रकमेस प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून उच्च व तंत्र शिक्षण विभाग ज्ञापन दि. ०९ जून, २०२५ अन्वये ₹११,१४.३३,०००/ - इतका निधी वितरीत करण्यात आला; तसेच सन २०२५-२६ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन ज्ञापन दि. २५ सप्टेंबर, २०२५ नुसार ₹ ९३.३३,४४,०००/ इतक्या रकमेची सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची कलिना विद्यापीठ क्षेत्र, सांताक्रुज (पूर्व), मुंबई येथील इमारतीचे अंतर्गत ७० टक्के काम पूर्ण झालेले आहे. लवकरच या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल. येथे डिजिटल सेवा देण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत.

### इमारत बांधकाम/नूतनीकरण

ग्रंथालय संचालनालयाच्या अधिनस्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, दापोली, भंडारा इमारतीच्या नूतनीकरणास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे इमारती अद्ययावत होतील; तसेच अमरावती जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय इमारत बांधकाम पूर्ण झाले आहे, अहिल्यानगर, हिंगोली व बीड या जिल्ह्यांतील इमारत बांधकाम प्रगतीपथावर असून, लवकर ते पूर्ण होणार आहेत.

### एशियाटिक सोसायटी, मुंबई ग्रंथालयास अर्थसाह्य

एशियाटिक सोसायटीला पाच कोटी रुपये विशेष अनुदान देण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आजपर्यंत रु. ३ कोटी ९९ लाख देण्यात आले असून, या व्यतिरिक्त प्रतिवर्षी १ कोटी निधीपैकी साठ लाख देण्यात आले. एशियाटिक सोसायटीने या निधीच्या साह्याने ग्रंथसंजीवनी पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलचा लाभ राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना दिला जाईल. त्यामुळे दुर्मीळ ग्रंथ व इतर साहित्य वाचकांना सहज उपलब्ध होणार आहे.

• ग्रंथालय संचालनालय व त्याच्या अखत्यारीत असलेल्या कार्यालयांत गट- ड संवर्गातील ५५ पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यास संबंधित खात्याने मान्यता दिली आहे. त्यामुळे कर्मचारी वर्गाची उपलब्धता होणार आहे. शासनाच्या १५० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत सेवाविषयक प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रंथालय संचालनालयाच्या अधीन असलेल्या कार्यालयांत पाच व्यक्तींना अनुकंपा नियुक्त्या देण्यात आल्या असून, संबंधित सेवेत रुजू झाले आहेत.

• २०२३ -२४ सालातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार व डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार वितरण ना. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मुंबईत एस.एन.डी.टी विद्यापीठात झाले. सात उत्कृष्ट ग्रंथालये, सहा कार्यकर्ते व सात सेवकांचा त्या वेळी यशोचित सन्मान करण्यात आला.

### ग्रंथोत्सव

वाचनसंस्कृती वाढावी आणि वाचकांना एकाच ठिकाणी हवे ते पुस्तक उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यात ३६ जिल्ह्यांमध्ये ग्रंथोत्सव उपक्रम घेण्यात आला. यात ग्रंथांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. सर्व जिल्ह्यांत संबंधित पालकमंत्री, आमदार, खासदार, जिल्हाधिकारी, इतर विविध अधिकारी; तसेच, लेखक आणि वाचकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावून हा उपक्रम यशस्वी केला. या वर्षीदेखील सर्व जिल्ह्यांत ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

### कार्यशाळा (Workshop)

सार्वजनिक ग्रंथालयांच्या सेवेत वाढ होण्यासाठी राजा रामामोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान व महाराष्ट्र शासन यांच्या समान निधी योजनेंतर्गत राज्यातील सहा विभागांत कार्यशाळा घेण्यात आल्या.

पुण्यातील कार्यशाळेचे उद्घाटन ना. श्री. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेत ई-ग्रंथालय आज्ञावली, सभासद वाढविण्यासाठी करावयाचे प्रयत्न; तसेच वाचकपूरक सेवा कशी देता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. राज्यातील ग्रंथालय कार्यकर्ते/सेवक यांना याचा लाभ झाला.

• राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानतर्फे (RRRLF) राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथ, फर्निचर, संगणक व इमारत बांधकामासाठी अर्थसाह्य देण्यात आले आहे. साठ कारागृह ग्रंथालयांना ग्रंथ, फर्निचर देण्यात आले. ५६ पूरग्रस्त ग्रंथालयांना ग्रंथ, फर्निचर व संगणक भेट देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

• शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सन २०२१,२०२२ व २०२३ या वर्षांची ग्रंथ निवड यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०२४ सालच्या निवड यादीबाबत समिती अध्यक्ष श्री. अभिराम भडकमकर यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व सदस्यांच्या उपस्थितीत बैठक झाली असून, ही यादी लवकरच ग्रंथालयांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### ई-ग्रंथालय

राज्यातील ४४ शासकीय ग्रंथालयांतील सुमारे ४१ लाख पुस्तकांची माहिती ई-ग्रंथालय आज्ञावली प्रणालीमार्फत उपलब्ध झाल्याने राज्यातील कोणत्या शासकीय ग्रंथालयात कोणते पुस्तक उपलब्ध आहे, याची माहिती आता सहज उपलब्ध होईल. ना. श्री. चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली व त्यांच्या निर्देशानुसार, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. बी. वेणूगोपाल रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय संचालनालय वाचन संस्कृती वाढवण्यासाठी निरंतर प्रयत्नशील आहे.



# कला संचालनालय : कलेचा वारसा अधिक समृद्ध करण्याचे प्रयत्न

महाराष्ट्राचे कला वैभव हे सर्व सामर्थ्यासह कलाप्रेमींच्या समोर यावे आणि त्याचा योग्य तो सन्मान व्हावा या दृष्टीने राज्याचे कला संचालनालय काम आणि प्रयत्न करीत आहे.




**डॉ. किशोर इंगळे**
संचालक, कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई


महाराष्ट्र हे दृश्यकला व कला शिक्षणामध्ये संपूर्ण देशात अग्रेसर असणारे राज्य आहे. राज्याला जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश असलेल्या अजिंठा-वेरूळ पासून सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये अभेद्य असलेल्या गडकिल्ल्यांपर्यंत चित्र, शिल्प आणि वास्तुकलेचा समृद्ध वारसा राज्याला लाभला आहे. विशेषतः गुंफा-लेण्यांपासून कातळ शिल्पांपर्यंत आणि वारली चित्रकलेपासून समकालीन चित्रकलेपर्यंत महाराष्ट्राची चित्र - शिल्प कला परंपरा सर्वदूर पोहोचली आहे.

देशात कला शिक्षणासाठी अग्रेसर असलेले आणि कलेच्या उत्कर्षासाठी स्वतंत्र कलासंचालनालय असलेले, महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. दृश्यकलेचा हा सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यासाठी आणि येथील कलेला जागतिक पातळीवर ओळख निर्माण करून देण्यासाठी विद्यमान उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील गेली तीन वर्षे नवनव्या संस्थात्मक उभारणीतून कार्यरत आहेत. राज्यातील कलाशिक्षण काळाबरोबर आणि काळाच्याही पुढे घेऊन जाण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. त्यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ' अधिनियम २०२३ निर्माण झाला असून, तो २३ फेब्रुवारी २०२४ पासून लागू करण्यात आला आहे. मंडळाच्या अखत्यारित राज्यातील सर्व शासनमान्य, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित कला महाविद्यालयातील अभ्यासक्रम आणि परीक्षा हे सर्व मंडळाच्या अखत्यारित आल्याने त्यात सुसूत्रता आली आहे. हा केवळ प्रशासकीय बदल नसून, कला संचालनालयाच्या अभ्यासक्रमांना राष्ट्रीय स्तरावरील समानतेच्या सूत्राला जोडण्याचा प्रयत्न आहे.

ब्रिटिशांनी २ मार्च १८५७ रोजी मुंबईत

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टची स्थापना केली. देशात अग्रेसर असलेल्या आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या या महाविद्यालयाचे रूपांतर सर ज. जी. कला, वास्तुकला आणि अभिकल्प विद्यालय, मुंबई या डि-नोवो अभिमत विद्यापीठात झाले. सर ज. जी. कला महाविद्यालय, सर ज. जी. वास्तुकला महाविद्यालय आणि सर ज. जी. अभिकल्प महाविद्यालय या तीन प्रतिष्ठित संस्थांचे एकत्रीकरण होऊन विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), दिल्ली यांच्या १९ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये या संस्थेला 'सर ज.जी. कला, वास्तुकला आणि अभिकल्प विद्यालय, मुंबई' या डी-नोवो अभिकत विद्यापीठास मान्यता प्राप्त झाली आहे.

या मान्यतेमुळे या अभिमत विद्यापीठांतर्गत पाच नव्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांनाही मंजुरी मिळाली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

## १) कलादालन

चंद्रकांत दादांच्या निर्देशानुसार या ऐतिहासिक संस्थेतील मौलिक ठेवा जतन करण्यासाठी विशेष पाऊल उचलले जात आहे. सर ज. जी. कला महाविद्यालयामध्ये ज्या दुर्मीळ आणि मौल्यवान कलाकृती संग्रहित आहेत, त्यांचे जतन, संवर्धन आणि दस्तावेजीकरण होणे अत्यंत महत्त्वाचे होते. यासाठी कलाशाळा आवारामध्ये भव्य कला दालन (Art Gallery) व संग्रहालय उभारण्याची घोषणा दादांनी केली आहे.

## २) वसतिगृह

सर ज. जी. कला महाविद्यालय, सर ज. जी. वास्तुकला महाविद्यालय आणि सर ज. जी. अभिकल्प महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी प्रत्येकी पाचशे विद्यार्थी व विद्यार्थिनी क्षमता असलेल्या वसतिगृहाच्या (G + १४) इमारतीचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली होती. तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण होत आहे.

## ३) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची स्थापना

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम, २०२३ याच्या अंतर्गत २०२४ पासून मंडळाची स्थापना झाली, तर २५ जुलै २०२४ रोजी नियामक परिषदेची स्थापना झाली. या नियामक संस्थांनी संलग्नता शुल्क, प्रवेश नियमावली, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आणि वित्तीय नियमावलींना त्वरित मान्यता देऊन, मंडळाच्या कारभारात पारदर्शकतेचा आणि गतीचा समावेश केला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० नुसार पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल करण्यासाठी NITTTR भोपाळ या संस्थेकडून मार्गदर्शन घेण्यात आले आणि शैक्षणिक गुणवत्तेचे नवे पर्व सुरू झाले. या माध्यमातून सर्व कला पदविका अभ्यासक्रमांना एक नवी दिशा मिळाली.

प्रथम सत्राचा सुधारित पाठ्यक्रम २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सत्र पद्धतीने लागू करण्यात आला असून, सुमारे दोनशे अध्यापकांना या बदलांच्या अंमलबजावणीसाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. द्वितीय सत्राचे प्रशिक्षण शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर आणि मुंबईत आयोजित करण्यात आले होते.

कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या कालावधीत व शैक्षणिक पात्रतेत बदल करण्यात आले; तसेच 'फाउंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट ॲण्ड डिझाइन' उत्तीर्ण विद्यार्थ्यांना थेट द्वितीय वर्षात प्रवेश देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या पुनर्रचित अभ्यासक्रमामुळे एकूणच कला शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल झाला असून, त्याची नोंद या क्षेत्रातील अनेक सुजाण जाणकारांनी, अभ्यासकांनी घेतली आहे.

## ४) बालचित्रकला स्पर्धेला नवसंजीवनी

बालचित्रकला स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त कलाकृतींच्या रकमेत मोठी वाढ करण्यात आली आहे. राज्यात प्रथम आलेल्या विजेत्याला रुपये १०,०००/- तर जिल्हास्तरीय विजेत्यांना रुपये २०००/-ची पारितोषिके जाहीर केली आहेत.

## ५) शासकीय रेखा कला परीक्षा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट)

१८८० मध्ये जुन्या मुंबई राज्यामार्फत सुरू झालेल्या या ड्रॉइंग ग्रेड परीक्षांना २०२५ मध्ये १४५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या परीक्षांच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी






दिली जाणारी पारितोषकांची रक्कम वाढवून एकूण ४ लाख २० हजार रुपये करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ग्रेड परीक्षांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या परीक्षेला महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गोवा अशा चार राज्यांत घेतल्या जातात.

### ६) विस्तार, संलग्नता आणि संपर्कसेतू

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाने संलग्नता प्रक्रिया ऑनलाइन प्रणालीद्वारे गतिमान केली आहे. या पारदर्शक प्रक्रियेतून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये १०६ कला परिसंस्थांना संलग्नता प्रदान करण्यात आली आहे.

### ७) स्कूल कनेक्ट प्रोग्राम : एक अभिनव संकल्पना

कला शिक्षणाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी आणि सर्वच पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढवण्यासाठी मंडळाने ‘स्कूल कनेक्ट प्रोग्राम’ आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. हा उपक्रम कला आणि सामान्य शिक्षणादरम्यानचा एक सुवर्णसेतू ठरू शकतो. या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसामान्य विद्यार्थी आणि पालकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाईल.

### ८) वार्षिक कला प्रदर्शनाच्या पारितोषिक रकमेत वाढ

शासकीय कला कला महाविद्यालयांच्या वार्षिक कला प्रदर्शनातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या बक्षीस रकमेत वाढ करून ती आता अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय अशी रक्कम दिली जात होती. यामध्ये वाढ करून अनुक्रमे प्रथम क्रमांकास १५०००, द्वितीय क्रमांकास १०००० आणि तृतीय क्रमांकाला ५०००/-अशी करण्यात आली आहे.

दृश्यकला क्षेत्र अधिकाधिक लोकाभिमुख आणि सार्वत्रिक व्हावे, यासाठी चंद्रकांत दादा पाटील या क्षेत्राला नवसंजीवनी देत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कला संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ नव्या उमेदीने दृश्यकलाक्षेत्रात काही नव्या योजना आणत आहेत. सर ज. जी. संस्थेला दिलेला डि - नोवो अभिमत विद्यापीठाचा दर्जा असो किंवा महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची स्थापना असो, दृश्यकला क्षेत्रात महाराष्ट्र नेहमीच अव्वल स्थानी ठेवण्याचा विचार यामागे आहे. कला विषयाचे वैभव अधिक झळझळीत आणि व्यवसायाभिमुख करण्याकडे या विभागाचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्राचे कला वैभव हे सर्व सामर्थ्यासह कलाप्रेमींच्या समोर यावे आणि त्याचा योग्य तो सन्मान व्हावा या दृष्टीने राज्याचे कला संचालनालय काम आणि प्रयत्न करीत आहे.



अवकाळी पावसाने महाराष्ट्राला वेठीला धरल्यावर राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांनी उभे केलेले मदतीचे पाठबळ हे संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी याचे दर्शन देणारे होते.



**डॉ.निवेदिता एकबोटे**
प्राचार्या, मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) शिवाजीनगर ,पुणे ५


# संकटातून संकल्पाकडे

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या विक्राळ आणि अभूतपूर्व अतिवृष्टीने मराठवाडा; तसेच पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांवर गंभीर संकट ओढवले. या पूरस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य वाहून गेले, महाविद्यालयीन वाहतूक व्यवस्था ठप्प झाली, अनेक कुटुंबांमधील आर्थिक अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या. काही ठिकाणी महाविद्यालये तात्पुरती बंद ठेवण्याची वेळ आली.

हे संकट फक्त भौतिक हानी करून थांबले नाही, तर विद्यार्थ्यांचे शिक्षण, सुरक्षितता, मानसिक स्वास्थ्य आणि भविष्याच्या संधींनाही त्याने आव्हान दिले. त्यामुळे पूरग्रस्त भागांसाठी विविध महाविद्यालयांमार्फत मदतकार्य उभे करण्याच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या पुढाकारास नक्की दाद द्यायला हवी. चंद्रकांत दादा पाटील सर आणि उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेन्द्र देवळाणकर सर यांच्या संवेदनशील आणि परिणामकारक नेतृत्वाने संपूर्ण शिक्षणविश्वाला एका सामाजिक ध्येयासाठी एकत्र आणले.

दादांनी ही संकल्पना पुढे आणली नसती, तर कदाचित राज्यभरातील शेकडो संस्था आणि हजारो शिक्षक-विद्यार्थी एवढ्या संवेदनशीलतेने, एवढ्या वेगाने आणि एवढ्या व्यापक प्रमाणात एकत्र कार्यरत झाले नसते. विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पुन्हा प्रज्वलित झालेली आशा, त्यांच्या कुटुंबांनी व्यक्त केलेले समाधान आणि महाविद्यालयांनी दाखविलेली सामाजिक बांधिलकी हे सर्व त्यामुळे अनुभवता, बघता आले.

डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, सहसंचालक अर्चना बोऱ्हाडे आणि संपूर्ण उच्चशिक्षण विभागाने दाखविलेला समन्वय, नियोजनबद्ध दृष्टिकोन आणि सातत्यपूर्ण




पाठपुरावा हा या उपक्रमाचा कणा होता. प्रत्येक जिल्ह्यातील संस्थांशी समन्वय साधून मदत परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यात त्यांचे योगदान आहे, हे आवर्जून नमूद केले पाहिजे.

**उत्स्फूर्त सहभाग**

राज्यातील शेकडो महाविद्यालयांनी या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक प्राध्यापकांनी एक दिवसाचे वेतन दिले, विद्यार्थ्यांनी साहित्य संकलन मोहिमा राबवल्या, माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात पाठबळ दिले आणि अनेक महाविद्यालयांनी पूरग्रस्त भागांना प्रत्यक्ष भेट देऊन गरजेनुसार मदत पोहोचवली. महाराष्ट्रातील या वीस महाविद्यालयांमध्ये पुण्यातील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य या स्वायत्त महाविद्यालयाचा सहभाग होता. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी पुस्तके, उपयुक्त शैक्षणिक साहित्य, धान्य अशी मदत केली. 'मानवतेचा हात' ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या मानसिक उभारीला सर्वाधिक उपयोगी ठरली. आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या एनएसएस स्वयंसेवकांनी घराघरांत जाऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी प्रकरण समजून घेऊन मदत केली. अभ्यासाची साधने थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली.

एस. एम. जोशी महाविद्यालयाने पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक शैक्षणिक साहित्य दिले. हडपसरचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय; तसेच सांगलीच्या बाबूरावजी महाविद्यालयातर्फे पुस्तके आणि इतर मदत पोहोचवण्यात आली. बाबूरावजी विद्यालय, घोलप महाविद्यालय, सांगवी यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत पोहोचवली. फर्ग्युसन महाविद्यालयाने घेतलेली कौशल्य प्रशिक्षण सत्रे विद्यार्थ्यांच्या भविष्यातील स्थैर्याचा पाया ठरली. सर परशुरामभाऊ महाविद्यालयाने इंटरनेट शुल्कापासून साहित्यापर्यंत प्रत्येक गरजेला प्राधान्य दिले. संगमनेर नगरपालिका महाविद्यालयाने दीर्घकालीन पुनर्वसनासाठी ग्रामीण शिक्षण मॉडेल आणि विद्यार्थी प्रशिक्षक नेमून संगठित कार्य केले. केटीएचएम कॉलेज, नाशिक यांनी मोफत कौशल्यविकास, करिअर टेस्टिंग आणि संगणक प्रशिक्षण उपक्रम राबवले.

एल. व्ही. एच. कॉलेज, पंचवटी यांनी राबवलेली 'एक विद्यार्थी – एक मदतकर्ता' ही योजनात्मक जबाबदारी प्रभावी ठरली. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, डीकेएएससी महाविद्यालय यांनी शैक्षणिक साहित्य मोठ्या प्रमाणात पुरविले. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा, एस. जी. एम. कॉलेज, कराड, नागीनदास खांडवाला कॉलेज, मुंबई, साठे कॉलेज, एसआयईएस महाविद्यालय (सायन-ईस्ट), तोलानी कॉलेज, अंधेरी (पूर्व) या महाविद्यालयांनीही मदतीचा हात पुढे केला.




संकटाच्या काळात 'विद्यार्थी प्रथम' या मूल्याला केंद्रस्थानी ठेवून केलेले काम महाराष्ट्राच्या शिक्षणविश्वाला एका नव्या सामाजिक उंचीवर नेणारे ठरले. ही मदत केवळ आर्थिक नव्हती, तर त्यात शैक्षणिक साहित्य, वाहतूक व निवास व्यवस्था याबरोबर समुपदेशन, मनोधैर्य वाढविण्यासाठी साह्य या सेवांचा समावेश होता. महाविद्यालयीन पातळीवरील विशेष उपक्रम केले गेले आणि संकटग्रस्त विद्यार्थ्यांना आधार दिला गेला.

या सर्व योगदानाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला 'संकटातून संकल्पाकडे' हा राज्यस्तरीय कार्यक्रम केवळ पुरस्कार वितरण सोहळा नव्हता. शिक्षणातील माणुसकी, सहवेदना आणि सामाजिक जबाबदारीचा तो उत्सव होता. त्यात महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांनी दाखविलेल्या सामाजिक कर्तव्यपरायणतेची अधिकृतपणे नोंद घेतली. पुढील पिढ्यांसाठी या उपक्रमाने एक आदर्श निर्माण केला आहे. संकटे अपरिहार्य असतात; पण त्यातून उभं राहण्याची ताकद शिक्षण देते. विद्यार्थी हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. सामाजिक आपत्तीच्या काळात शिक्षणसंस्था पुढे आल्या, तर समाज अधिक मजबूत होतो हा संदेश यातून दिला गेला.

**आदर्श मॉडेल**

या संपूर्ण उपक्रमात शिक्षकांनी निभावलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. विद्यार्थ्यांच्या परिस्थितीची पडताळणी, त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद, आवश्यक गरजांची माहिती प्रशासनाला पुरविणे आणि प्रत्यक्ष मदत पोहोचविण्याचे काम हे शिक्षणाचे खरे स्वरूप अधोरेखित करणारे होते. विद्यार्थी स्वयंसेवकांनी पूरग्रस्त भागात जाऊन सर्वेक्षण, वितरण आणि सामाजिक बांधिलकीचे मूल्य प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केले. उच्च शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महाविद्यालये यांच्यातील उत्तम समन्वय हा या मोहिमेचा सर्वांत मोठा आधारस्तंभ ठरला. भविष्यातील संकट व्यवस्थापनासाठी हे 'शिक्षण–प्रशासन सहकार्य मॉडेल' मार्गदर्शक ठरेल. महाराष्ट्रभर पूरग्रस्त भागांसाठी विविध शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांना मदतकार्यासाठी एकत्र करून सामाजिक संवेदनशीलतेची भक्कम चळवळ उभी केल्याबद्दल चंद्रकांत (दादा) पाटील यांचे खरे म्हणजे आभार मानायला हवेत.




विनाशकारी पुराने सर्वस्व वाहून नेल्यावर पुन्हा उभे राहण्यासाठी केवळ अन्नपाण्याची मदत पुरेशी नसते. मानसिक धीर, प्रेमाचा संवाद, आस्था हे सगळे घेऊन उभे राहावे लागते. या सगळ्याचा वस्तुपाठ राज्यातील वीस महाविद्यालयांनी घालून दिला आहे. त्याचा हा लेखाजोगा...



**डॉ. वैजयंतीमाला अप्पासाहेब जाधव**
सहायक प्राध्यापक (मराठी)
मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय(स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे

# माणुसकी सक्रिय होते तेव्हा...

यंदा म्हणजे, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना गंभीर पूरस्थितीचा सामना करावा लागला. अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले, हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, मार्गदर्शन व मानसिक आधार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली वैशिष्ट्यपूर्ण कृतीशील उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे प्रेरणास्थान होते उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील. त्यांच्या सूचनेवरून राज्यभरातील २० प्रमुख मेंटर (mentor) महाविद्यालयांनी पूरग्रस्त विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शैक्षणिक साह्य देण्यासाठी मानवतेचा हात पुढे केला. राज्याच्या विविध भागांतील २० महाविद्यालयांनी एकत्र येऊन फक्त शैक्षणिक मदतच नव्हे, तर सामाजिक उत्तरदायित्व, लोकजागृती आणि शिक्षणातील एकात्मतेचा आदर्श निर्माण केला. पडद्यामागे अथक परिश्रम घेणारे प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य, एनएसएस अधिकारी, प्राध्यापक वर्ग, प्रशिक्षण अधिकारी व स्वयंसेवक विद्यार्थी हे या चळवळीचे खरे आधारस्तंभ ठरले.

### १. मॉडर्न महाविद्यालय, पुणे

गोदावरी नदीच्या उपनद्यांमधून आलेल्या पुरामुळे जालना जिल्ह्यातील तीर्थपुरी परिसरातील २१ गावांतील शिक्षण, शेती आणि उपजीविका यावर विनाशकारी परिणाम झाला, अनेक

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्य आणि पुस्तके गमावली; काहींच्या पालकांचा रोजगार गेला. याची दखल घेऊन प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने आपली सामाजिक बांधिलकी जपत मत्स्योदरी महाविद्यालयाला मदतीचा हात पुढे केला. या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना दिवाळीच्या आधी सर्व उपयुक्त साहित्य कसे लवकर पोहोचवता येईल याकडे लक्ष केंद्रित केले. अंधारावर मात करणारा सण म्हणजे दिवाळी. प्रत्येकाच्या घरी ही दीपज्योत पेटावी या भावनेने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे आणि सर्व सहकाऱ्यांनी ही मदत पूरग्रस्त भागाकडे पाठवली.




### २. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे

म. ए. सो. चे आबासाहेब गरवारे कॉलेज ((स्वायत्त) यांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलता प्रेरणादायी आहे. त्यांच्या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि 'आम्ही एकटे नाही' ही भावना दृढ झाली. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सहभागातून जवळपास एक लाख वीस हजार रुपये मदत जमा करण्यात आली. ही मदत गोळा करण्यामध्ये महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचे प्रमुख प्रा. मधुकर वाळूंज; तसेच एनएसएस विभागातील सर्व विद्यार्थी यांचे मोलाचे योगदान लाभले. या आर्थिक मदतीतून पैठणच्या प्रतिष्ठान महाविद्यालयातील सुमारे शंभर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयाची सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि समाजाबद्दलची खरी तळमळ याचे दर्शन घडवणारा हा उपक्रम होता.




### ३. एस. एम. जोशी महाविद्यालय, हडपसर

आपत्तीच्या काळात समाजाची खरी ओळख होते, असे म्हटले जाते. संकटाच्या काळात जो समाज इतरांच्या वेदना जाणतो, तोच सुसंस्कृत असतो. हाच विचार कृतीरूपात उतरविण्याचे काम रयत शिक्षण संस्थेचे एस. एम. जोशी महाविद्यालय, हडपसर यांनी केला. इथल्या स्वयंसेवकांनी पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी मदत एकत्रित केली. या संकलनामुळे माढा महाविद्यालयाच्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी पुरेशी मदत एकत्र करण्यात यश आले.

### ४. अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर

या महाविद्यालयाने पुस्तक बँक, गणवेश मदत, इंटरनेट सुविधा व मोफत कोचिंगद्वारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढले. प्राध्यापकांनी वैयक्तिक नोट्सही उपलब्ध केल्या. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाने महाराष्ट्र शासनाने केलेल्या आवाहनानुसार राज्यातील पूरग्रस्त भागातील आर. बी. अटल महाविद्यालय, गेवराई, ता. बीड येथील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी स्वेच्छेने व स्वयंस्फूर्तीने पैसे देऊन सढळ हाताने मदत केली. हा मदत निधी संकलनासाठी महाविद्यालयात दानपेटी फिरवण्यात आली. या उपक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या दान पेटीत ५४,७८४/- एवढा निधी संकलन; तसेच १०० सॅक जमा करण्यात आल्या आहेत. या निधीतून आर. बी. अटल महाविद्यालय, गेवराई, ता. बीड येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, महाविद्यालयीन विकास मंडळ आणि करियर कट्टा याचे १६५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

### ५. बाबूरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी

शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशाप्रमाणे पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बाबूरावजी घोलप महाविद्यालयाला बीड जिल्ह्यातील आष्टी येथील बी. डी. हंबार्डे महाविद्यालयाला मदत करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. महाविद्यालयाकडे जमा झालेल्या ५०० वह्या, ५०० पेन, १० पेपर रीम, १२ कॉलेज बॅग व ११८८०/रुपये ही रोख रक्कम संबंधित महाविद्यालयाकडे सुपूर्द केली गेली.



# जेव्हा युवक जागा होतो

ग्रीन क्लबच्या माध्यमातून आकाराला आलेली पर्यावरण रक्षण आणि पाणी बचतीची चळवळ ही उद्याची आशा बनली आहे. प्रेरित झालेली युवाशक्ती काय करू शकते याचे प्रत्यय म्हणजे हे अभियान.

**राहुल गिरी, मधुकर लेंगरे**

आधुनिक मानव अभूतपूर्व हवामान बदलाच्या टप्प्यातून प्रवास करत आहे. हवामानातील अनिश्चितता, अनियमित पर्जन्यमान, तापमानात झपाट्याने होणारी वाढ, नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या वाढत्या प्रमाणामुळे संपूर्ण विश्वच चिंतेच्या छायेत उभे आहे. पूर, चक्रीवादळे, दुष्काळ, भूकंप, उष्णतेच्या प्रखर लाटा, भूक्षरण, वणवा अशा विविध संकटांनी मानवी जीवन आणि पर्यावरण या दोहोंना मोठे आव्हान दिले आहे. या पार्श्वभूमीवर, पर्यावरण संवर्धन आणि जलसुरक्षेबाबत आज प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची आणि उत्तरदायित्वाची जाणीव ठेवणे काळाची गरज बनली आहे.

महात्मा गांधी यांनी सांगितलेला एक खोल तत्त्वज्ञानात्मक विचार फार महत्त्वाचा आहे, 'निसर्ग आणि नैसर्गिक साधनसंपत्ती आपण आपल्या पुढील पिढीकडून उसनी घेतली आहे; त्यामुळे तिचा समतोल वापर करणे हे आपले कर्तव्य आहे.' हे तत्त्व आजच्या परिस्थितीत अत्यंत महत्त्वाचे आणि मार्गदर्शक ठरते. पाणी, हवा, माती, वनस्पती, जैवविविधता यांसारखी साधनसंपत्ती फार मौलिक असून, त्यांचा विवेकपूर्ण आणि जबाबदारीपूर्ण वापर अत्यंत आवश्यक आहे.

याच संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग, युनिसेफ आणि त्यांच्या सहकारी संस्था-ACWADAM, CEE, Why Waste यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, जालना, लातूर, नागपूर, मुंबई, पालघर, ठाणे, कोल्हापूर, सातारा, पुणे या १३

जिल्ह्यांमध्ये एक अत्यंत महत्त्वाकांक्षी, दूरदृष्टीपूर्ण आणि व्यापक अभियान राबविण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत संपूर्ण राज्यातील महाविद्यालयांमध्ये जवळपास १५०० पेक्षा जास्त ग्रीन क्लब स्थापन करण्यात आले. ही केवळ ग्रीन क्लबची गणना नाही; तर महाराष्ट्रातील युवकांनी स्वीकारलेली पर्यावरणदृष्टी, कर्तव्यभावना आणि सामूहिक सहभागाचे प्रतीक आहे. या ग्रीन क्लबमधून जलसंधारण, प्लास्टिक-मुक्ती, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत, जैवविविधता संरक्षण, परिसंस्था संवर्धन अशा विविध विषयांवर सातत्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत.

या अभियानामध्ये ८ लाख ६३ हजार ९१३ युवक, १७०० हून अधिक प्राध्यापक आणि प्राचार्य; तसेच जिल्हा समन्वयक, स्वयंसेवक, तज्ज्ञ प्रशिक्षक यांनी सहभाग नोंदवून एक भक्कम, सजग आणि पर्यावरणाभिमुख युवा-संघटनाच उभारली आहे. यामध्ये युवकांनी केलेल्या पाणी बचतीचे प्रमाण तर विलक्षण आहे. २ कोटी ८० लाख ८४ हजार ११६ घनमीटर पाणी बचत ही केवळ आकडेवारी नसून, समाजाने मिळून केलेल्या छोट्या-छोट्या सवयींच्या बदलाचे असामान्य फलित आहे. महाराष्ट्रातील जलपरिस्थितीच्या आव्हानांची आणि उपाययोजनांची जाणीव हा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू या अभियानामध्ये आढळतो. महाराष्ट्राच्या भौगोलिक घडणीतील ८५ टक्क्यांपेक्षा अधिक भाग कठीण आणि जलधारण क्षमता कमी असलेल्या खडकांनी व्यापलेला आहे त्यात पर्जन्यमानाचे प्रादेशिक असमान स्वरूप पाहायला मिळते (६०० ते ३००० मिमी) आणि वेगाने वाहून जाणारे पावसाळी पाणी यांमुळे राज्यात दर वर्षी जानेवारी ते जून या कालावधीत मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण होते.

अशा परिस्थितीत या अभियानाद्वारे युवकांनी अवलंबलेल्या सोप्या उपायांमुळे मोठ्या प्रमाणात जलसुरक्षा निर्माण होत आहे. हे सोपे उपाय कोणते त्याची काही उदाहरणे बघा...

- नळगळती दुरुस्ती
- शॉवरऐवजी बादलीचा वापर
- दात घासताना / दाढी करताना नळ सुरू ठेवण्याऐवजी मगचा वापर
- ग्रामीण भागात शोषखड्डे, पाझरखड्डे तयार करणे
- वॉशिंग मशिन, RO मशिनमधील पाण्याचा पुनर्वापर
- पाण्याचा प्रवाह नियंत्रित करणाऱ्या नळांचा वापर

अशा छोट्या; परंतु अत्यंत प्रभावी कृतींनी लाखो लिटर पाणी वाचवणे शक्य झाले आहे. या सवयी कायमस्वरूपी समाजात रुजत जात आहेत, ही या अभियानाची सर्वांत मोठी जमेची बाजू म्हणावी लागेल.

या अभियानामधील युवकांचे नेतृत्व ही परिवर्तनाचा वेग वाढवणारी खरी शक्ती ठरत आहे. कोणत्याही चळवळीला युवकांचे नेतृत्व लाभले, तर तिचा प्रभाव शेकडो पटींनी अधिक वाढतो. आजच्या काळात तापमानवाढ, पाण्याची टंचाई, पाण्याची गुणवत्ता, प्रदूषण, नष्ट होत चाललेली जैवविविधता या सर्व गंभीर संकटांवर उपाय शोधताना त्या प्रक्रियेत युवकांना सहभागी करून घेणे अत्यावश्यक आहे . युवकांकडे ऊर्जा, संवेदनशीलता, तांत्रिक कौशल्य, सृजनशीलता आणि बदल स्वीकारण्याची वृत्ती असते. त्यामुळे ते पर्यावरण संवर्धनाच्या नव्या पिढीचे कर्णधार होऊ शकतात. पाणी बचत, पाण्याचे पुनर्चक्रण, पुनर्वापर, शाश्वत जीवनशैली, कार्बन फुटप्रिंट कमी करणे यांसारख्या संकल्पना युवकांमार्फत सहज पसरताना या अभियानात दिसले.

या विचारांच्या प्रसारासाठी YEWS अभियान म्हणजे भविष्यातील पर्यावरणसुरक्षेचा एक भक्कम पाया आहे. युनिसेफ आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्यात नोव्हेंबर २०२२ मध्ये झालेल्या सामंजस्य कराराचा प्रत्यक्ष अविष्कार म्हणजे हे अभियान आहे. हा केवळ सामुदायिक किंवा शैक्षणिक उपक्रम नसून, महाराष्ट्र शासनाच्या सक्रिय सहकार्याने राबवलेले एक महत्त्वपूर्ण सार्वजनिक अभियान आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने या उपक्रमाच्या नियोजन, अंमलबजावणी आणि सततच्या देखरेखीत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विभागातील अधिकारी, प्रादेशिक कार्यालये; तसेच जिल्हास्तरीय शैक्षणिक संरचना यांनी दाखवलेले संघटित आणि समन्वयित कामकाज हे या अभियानाच्या प्रगतीमागील मूलभूत कारण ठरले आहे.

राज्यातील महाविद्यालयांमध्ये ग्रीन क्लब स्थापन करण्यापासून युवकांचे प्रशिक्षण, उपक्रमांवर देखरेख (मॉनिटरिंग), जागतिक जल दिनानिमित्त आयोजित स्पर्धा, राज्यस्तरीय पारितोषिक वितरण कार्यक्रम ते जागरूकता अभियानांपर्यंत—प्रत्येक टप्प्यावर शासनाची उपस्थिती आणि पाठबळ भक्कमपणे जाणवते. या सर्वांमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला नाही, तर ग्रीन क्लब हे एक शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह शैक्षणिक व्यासपीठ म्हणून उभे राहिले.

महत्त्वाचे म्हणजे, YEWS हा १३ लक्षित जिल्ह्यांपुरता मर्यादित न राहता इतरही अनेक जिल्ह्यांतील महाविद्यालये, शिक्षण संस्था आणि स्थानिक प्रशासन स्वतःहून या अभियानात सहभागी होण्यास पुढाकार घेत आहेत. स्थानिक शासकीय अधिकाऱ्यांकडून मिळणारा प्रतिसाद, सहभागाची विनंती आणि उपक्रम राबवण्याची इच्छा—या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे YEWS अभियानाची राज्यभर वाढणारी प्रतिष्ठा आणि प्रभाव.

महाराष्ट्र शासनाच्या प्राधान्यक्रमांमध्ये

- जलसंधारण,
- कचरा व्यवस्थापन,
- ऊर्जा बचत,
- स्वच्छता,
- जैवविविधता संरक्षण

हे विषय अग्रस्थानी आहेत. या सर्व क्षेत्रांना थेट हातभार लावणारे अभियान म्हणून YEWS हे शासनाच्या शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे.

UNICEF, ACWADAM, CEE यांनी विकसित केलेली प्रशिक्षण पद्धती आणि महाविद्यालयीन शिक्षकांचा सहभाग



यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाचे ज्ञान, समज आणि कौशल्य दृढ झाले. Why Waste–YEWS ॲप आणि Self-Paced Course यांच्या माध्यमातून वर्तनबदलाची प्रक्रिया तंत्रज्ञानासह अधिक मजबूत झाली आहे. शासनाने उभारलेली ही सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) राज्यातील युवकांना सक्रिय नागरिकत्व, शाश्वतता आणि जलसंपत्ती संरक्षणाच्या दिशेने प्रवृत्त करणारे एक आदर्श मॉडेल ठरले आहे.

YEWS च्या विस्तारासाठी सतत येणाऱ्या मागण्या, जिल्हा प्रशासनाचा उत्स्फूर्त सहभाग, आणि प्राचार्य-प्राध्यापकांची बांधिलकी या विविध घटकांमुळे या अभियानाचे रूपांतर एका प्रेरक लोकचळवळीत झाले आहे. हा असा जगन्नाथाचा रथ आहे, ज्याला महाराष्ट्रातील प्रत्येक युवकाने हातभार लावला, तर समाजात पर्यावरण-जागृतीची क्रांती घडून येईल. युनिसेफ, ACWADAM आणि पर्यावरण शिक्षण केंद्र (CEE) यांनी विकसित केलेली प्रशिक्षण पद्धती; तसेच महाविद्यालयीन शिक्षकांचा सक्रिय सहभाग यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी पर्यावरणाची जाण, ज्ञान आणि कौशल्य रुजत आहे. यातून तयार झालेला प्रशिक्षित वर्ग आगामी अनेक वर्षे—

- जागरूकता,
- अभ्यास,
- संशोधन,
- अंमलबजावणी

या मार्गाने पर्यावरण रक्षणाला दिशा देईल असे वाटते.

या अभियानातून विद्यार्थ्यांची प्रतिभा, नेतृत्वगुण, संवादकौशल्य, सामाजिक जबाबदारी आणि नवोन्मेषी विचारसरणी प्रकट होत आहे. आणि हे ग्रीन क्लब – पर्यावरणपूरक राष्ट्रीय चरित्र निर्माण करणारी प्रयोगशाळा बनू पाहत आहेत..

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांना दिलेल्या आज्ञापत्रांमध्ये पाणी, जंगल, नैसर्गिक साधनसंपत्ती यांच्या संरक्षणाबाबत अत्यंत सूक्ष्म सूचना केल्या आहेत. स्वराज्यातील प्रत्येक किल्ला, जलव्यवस्थापन, तटबंदी, धान्यसाठा आणि पाण्याचे स्रोत यामागे त्यांनी ठेवलेले वैज्ञानिक आणि पर्यावरणस्नेही दृष्टिकोन आजही अभ्यासण्यासारखे आहेत. याच शिवबांच्या महाराष्ट्रात आजचे युवक पुन्हा त्या परंपरेला योग्य न्याय देत आहेत—हीच या अभियानाची खरी सार्थकता म्हणावी लागेल. YEWS अभियानातून पर्यावरणाची जाणीव असलेले उद्याचे सुजाण नागरिक घडत आहेत. त्यांच्यात पर्यावरण जाणीव आहे. पाणी वापराच्या सवयी बदलत आहेत. त्यांच्यात वर्तन बदल होत आहे आणि पर्यावरणाबद्दलची कृतिशीलता वाढत आहे. त्यामुळे हे अभियान आगामी दशकांना दिशा देऊ शकेल.

YEWS अभियानामध्ये UNICEF आणि त्यांच्या सर्व सहकारी संस्था यांना अगदी सुरुवातीपासून ते आजतागायत महाराष्ट्र शासन व शासनाच्या उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने केलेले सर्व स्तरांवरचे सहकार्य अत्यंत मौलिक आहे. विशेषतः उच्च आणि तंत्र शिक्षण विभागातील अनेक अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागाशिवाय या अभियानाची अंमलबजावणी ही अशय्क्यप्राय बाब होती असे म्हणावे लागेल.




या अभियानाद्वारे महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांमध्ये जागतिक जल दिनाच्या औचित्याने जिल्हा व राज्यस्तरावर विविध स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. यामध्ये अनेक महाविद्यालयांच्या ग्रीन क्लब्सने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. प्रत्येक संवर्गासाठी जिल्हा स्तरावर तीन पुरस्कार व राज्य स्तरावर पाच पुरस्कार देण्यात आले. पुरस्कारांचे वितरण श्री. चंद्रकांत दादा पाटील, यांच्या शुभहस्ते २९ सप्टेंबरला पुण्यात सीओइपी (COEP- Technological University) तंत्रज्ञान विद्यापीठ येथे केले गेले. या १३ जिल्ह्यांच्या व्यतिरिक्त इतरही अनेक जिल्हे व तेथील शिक्षण समूह किंवा महाविद्यालये स्वतः सहभाग नोंदवण्यासाठी आग्रही आहेत.

महाराष्ट्रातील युवकांनी मिळून उभारलेली ही पाणी आणि पर्यावरण चळवळ पुढील पिढ्यांच्या सुख, सुरक्षितता आणि शाश्वत भविष्याची पायाभरणी करत आहे; हे नक्कीच अभिमानास्पद आहे. हे अभियान आपली जबाबदारी बनवून प्रत्येकाने आपल्या खांद्यावर घेतले, तर ही लोकचळवळ आपले भविष्य नक्कीच सुरक्षित करेल.

आजच्या घडीला YEWS हे फक्त एक कार्यक्रम किंवा प्रकल्प नाही; तर युवकांच्या संवेदनशीलतेतून आणि शासनाच्या सहकार्याने आकार घेत असलेली एक व्यापक, शाश्वत आणि भविष्योन्मुख पर्यावरणीय चळवळ बनत आहे. पाण्याची बचत, जलस्रोतांचे जतन, कचरा व्यवस्थापन, जैवविविधता संवर्धन, ऊर्जा बचत, वर्तन बदल—या सर्व दिशा युवकांच्या नेतृत्वातून दृढपणे पुढे जात आहेत.

या अभियानाची खरी शक्ती ही युवकांचा सामूहिक सहभाग, त्यांच्या मनातील सकारात्मकता आणि बदल घडवण्याची तयारी आहे. आज महाविद्यालयातील एक लहानसा ग्रीन क्लब ज्या सेवा भावनेतून काम करतोय, तोच उद्या एका संपूर्ण समुदायाला प्रेरित करेल आणि तेथून संपूर्ण राज्यभर एक मोठी पर्यावरणपूरक चळवळ उभी राहू शकेल. पुढील काही वर्षांत महाराष्ट्रातील प्रत्येक महाविद्यालय, प्रत्येक गाव, प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक नागरिक या चळवळीचा एक भाग बनला, तर पाण्यासह इतर नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण हे केवळ 'अभियानाचे उद्दिष्ट' राहणार नाही. ते महाराष्ट्राची लोकचळवळ बनेल. युवकांनी घेतलेली ही कृतिशील भूमिका म्हणजे उद्याचे सुरक्षित, हिरवे आणि जलसमृद्ध भविष्य.

शेवटी एवढेच- एकेकाने एक पाऊल टाकले, तर परिवर्तन छोट्या वर्तुळात राहते; पण लाखो युवकांनी एकत्र पावले टाकली, तर बदल थेट इतिहास घडवतो.

YEWS ही त्या इतिहासाची सुरुवात आहे आणि महाराष्ट्रातील युवक – त्या हिरव्या भविष्यातील खरे शिल्पकार

(या लेखाचे लेखक राहुल गिरी, मराठवाडा विभागाचे समन्वयक आणि मधुकर लेंगरे, अभियानचे राज्य संपर्क अधिकारी हे UNICEF ची सहकारी संस्था ACWADAM च्या वतीने कार्यरत आहेत.)



वाढत्या विद्यार्थी आत्महत्या आणि या वर्गातील नैराश्य टाळण्यासाठी शासनाने एक प्रभावी पाऊल उचलले आहे. त्याचा सकारात्मक परिणाम शिक्षण क्षेत्रावर नक्की दिसू लागेल.






**डॉ. हेमलता बागला**

कुलगुरू, HSNC विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अल्पना वैद्य**

प्रोफेसर आणि मानसशास्त्र विभाग प्रमुख
सिंबायोसिस कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, पुणे


# मानसिक आरोग्याचे रक्षण करणारे धोरण

महाराष्ट्र विद्यार्थी संरक्षण व मानसिक स्वास्थ्य धोरण २०२५ हे राज्यभरात सुरक्षित, संवेदनशील आणि भावनिकदृष्ट्या सहायक शिक्षणपरिसर उभारण्याच्या दृष्टीने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. बदलती जीवनशैली आणि कुटुंब व्यवस्था, आधुनिक शैक्षणिक प्रणाली, सामाजिक वातावरणातील ताण आणि अपेक्षा, डिजिटल आक्रमणाचे परिणाम, आर्थिक अडचणी, समवयस्कांचा दबाव ताण अशा विविध घटकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता, भावनिक एकाकीपणा यात फार वाढ झाली आहे. या सगळ्या ओझ्याचा थेट परिणाम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होत असल्याने त्यात हस्तक्षेपाची गरज निर्माण झाली आहे.

विद्यार्थी आत्महत्यांची वाढती संख्या आणि मानसिक आरोग्याच्या गुंतागुंतीच्या समस्या लक्षात घेऊन भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व शैक्षणिक संस्थांसाठी व्यापक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेने सक्षम मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन सेवा उपलब्ध करणे अनिवार्य केले आहे; तसेच शिक्षणास सुरक्षित व अनुरूप वातावरण निर्माण करणे बंधनकारक झाले आहे. कोचिंग क्लासेससाठीही हे नियम लागू केले असून, न्याय्य व्यवहार, भेदभावविरहित कार्यप्रणाली आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा अनिवार्य केल्या आहेत.

औपचारिक कायदे किंवा नियम येईपर्यंत सर्वोच्च न्यायालयाने १५ सक्तीच्या मार्गदर्शक तत्त्वांसह सर्व शैक्षणिक संस्थांना एकसमान विद्यार्थी मानसिक आरोग्य धोरण स्वीकारण्याचे व अंमलात आणण्याचे निर्देश दिले आहेत. UMMEED मार्गदर्शक तत्त्वे (२०२३), राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक धोरण आणि UGC मानसिक आरोग्य मार्गदर्शक तत्त्वे ही न्यायालयाने महत्त्वाची संदर्भ सामग्री म्हणून अधोरेखित केली आहेत. संस्थांनी

या धोरणाचे दर वर्षी पुनरावलोकन करून ते संकेतस्थळावर व सूचना फलकांवर प्रसिद्ध करणे आवश्यक असल्याचेही निर्देश दिले आहेत.

या राष्ट्रीय निर्देशांच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तांत्रिक शिक्षण विभागाने राज्यासाठी विशेष विद्यार्थी संरक्षण आणि मानसिक कल्याण धोरण विकसित करण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना केली. या समितीचे अध्यक्षपद मुंबईच्या HSNC विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता के. बागला यांनी भूषविले. समितीत मानसशास्त्रज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, दिव्यांग अभ्यासातील तज्ज्ञ, विद्यार्थी कल्याण अधिकारी, शारीरिक शिक्षण संचालक, कायदेशीर तज्ज्ञ आणि NSS प्रतिनिधी यांचा समावेश होता.

### धोरण तयार करताना समितीने विद्यार्थ्यांना भेडसावणारे अनेक मुद्दे अभ्यासले—

- प्रगत अध्यापन पद्धतींमुळे निर्माण होणारा शैक्षणिक ताण
- स्पर्धात्मक व परीक्षा-केंद्रित संस्कृतीचा परिणाम
- विविध सामाजिक–सांस्कृतिक पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांच्या अडचणी
- दिव्यांगता व दीर्घकालीन आजार
- मानसिक आरोग्याबद्दलची असुरक्षितता
- सामाजिक–आर्थिक विषमता
- लिंग ओळखीसंबंधीच्या समस्या
- जातीय भेदभाव
- पहिल्या पिढीतील शिकणारे विद्यार्थी
- ग्रामीण–शहरी दरी

या समस्यांच्या आधारे, उच्च शिक्षण संस्थांनी (HEIs) भावनिक सुरक्षितता आणि शैक्षणिक प्रगती यांच्यात समतोल राखणारी प्रणाली निर्माण करण्याची सूचना समितीने केली आहे. ती संस्थात्मक संवेदनशीलता वाढवणारी आणि विद्यार्थ्यांना आधार देणारी हवे असेही समितीने नमूद केले.

या धोरणात सुरक्षित, सर्वसमावेशक, लिंग-संवेदनशील, समताधिष्ठित आणि दिव्यांगांना प्रतिसाद देणारे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक मानके आहेत. विद्यार्थी संरक्षण यंत्रणा आणि तक्रार निवारण व्यवस्था समाविष्ट आहेत.

### या धोरणात शैक्षणिक संस्थांवर असलेल्या जबाबदाऱ्या स्पष्टपणे नमूद केल्या आहेत.

- शारीरिक सुरक्षितता व संरक्षण प्रोटोकॉल
- मानसिक आरोग्य समुपदेशन व कल्याण प्रणालींची अंमलबजावणी
- आत्महत्या प्रतिबंध उपाययोजना
- जोखीम ओळख व संकटकालीन परिस्थितीला प्रतिसाद देणारी ( क्रायसिस रिस्पॉन्स) प्रणाली

ग्रामीण व आदिवासी युवक, LGBTQ+ विद्यार्थी, स्थलांतरित विद्यार्थी, पहिल्या पिढीतील शिकणारे, महिला विद्यार्थी आणि दिव्यांग विद्यार्थी यांच्या असुरक्षिततेला विशेषत्वाने ओळखून त्यांच्यासाठी आवश्यक साह्य सुचविले आहे.

हे धोरण प्रत्येक विद्यार्थ्याची सुरक्षितता, सन्मान, समानता, भावनिक सुरक्षा आणि न्याय्य प्रक्रियेच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी संस्थांना मार्गदर्शन करणारे आहे. समुपदेशनात गोपनीयता आणि नैतिकता अनिवार्य करण्यावर भर देण्यात आला आहे. संस्थात्मक प्रणालींमध्ये भेदभाव नसावा आणि समानता, करुणा आणि न्याय या संविधानिक मूल्यांवर आधारित असाव्या, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

डिजिटल युगातील आव्हाने लक्षात घेता, संस्थांनी सुरक्षित इलेक्ट्रॉनिक तक्रार निवारण पोर्टल विकसित करणे आणि डिजिटल–सायबर समस्यांना प्रतिसाद देणारी मानसशास्त्रीय मदत उपलब्ध करणे आवश्यक झाले आहे. युवकांमधील अमली पदार्थांच्या वाढत्या वापराबाबत, राज्याने प्रतिबंध, प्रारंभिक हस्तक्षेप व पुनर्वसन साह्य यावर आधारित शून्य-सहनशीलता अमली पदार्थ धोरण HEIs मध्ये लागू केले आहे.

NEP २०२० च्या धोरणानुसार योग, भारतीय ज्ञान परंपरा (IKS) आणि माइंडफुलनेस यावर आधारित कल्याण उपक्रम सर्व कॅम्पसवर राबविणे बंधनकारक करण्यात आले आहे. NSS, NCC, विद्यार्थी परिषदा, समान संधी कक्ष आणि मानसशास्त्र विभाग यांना सर्व प्रतिबंधक, जागरुकता व प्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या उपक्रमांमध्ये औपचारिकरीत्या एकत्रित काम करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

धोरण तयार करताना समितीने SLP क्र. ३१७७/२०२५ (सुखदेव साहा विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य व इतर), शिक्षण मंत्रालय परिपत्रक दिनांक ०८.०८.२०२५, मानसिक आरोग्य कायदा (२०१७), दिव्यांग हक्क कायदा (२०१६), राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम (२०१४), राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०), राष्ट्रीय युवक धोरण (२०१४) तसेच आंतरराष्ट्रीय मॉडेल्स—ऑस्ट्रेलियाचे पीअर लीडरशिप मॉडेल आणि जपानचे क्रायसिस फ्लो मॉडेल—यांचा अभ्यास केला.

यामुळे तयार झालेले महाराष्ट्र विद्यार्थी संरक्षण व मानसिक कल्याण धोरण २०२५ हे विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक आणि सामाजिक गरजा लक्षात घेणारे सर्वंकष मार्गदर्शक दस्तावेज झाले आहेत. विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, संवेदनशील, समावेशक, विद्यार्थी-अधिकार केंद्री आणि दीर्घकालीन कल्याणाभिमुख वातावरण निर्माण करण्याचे दिशादर्शन हे धोरण करते.

शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षितता, सन्मान, समानता, भावनिक शांतता आणि न्याय्य प्रणालींचा प्रवेश देण्याची हमी मिळणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन या धोरणात काही गोष्टींवर भर देण्यात आला आहे. त्यात समुपदेशनातील गोपनीयता, नैतिक दृष्टिकोन, सुरक्षितता, भेदभावविरहित वागणूक आणि प्रभावी तक्रार निवारण या विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण याचा समावेश आहे.

उच्च शिक्षण देणाऱ्या सर्व शिक्षण संस्थांना सर्वोच्च न्यायालयाने मानसिक आरोग्य देणारी भक्कम रचना आणि आत्महत्या प्रतिबंध व्यवस्था उभारण्याचे निर्देश दिल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने तज्ज्ञ समितीच्या मार्गदर्शनाखाली हे धोरण विकसित केले आहे. हे विद्यार्थी-केंद्रित धोरण विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक कल्याणावर भर देतेच शिवाय संस्थात्मक उत्तरदायित्व स्पष्ट करते.



मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत शासनाने टाकलेले पाऊल ऐतिहासिक आहेच, शिवाय ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलींच्या आयुष्यात परिवर्तन आणणारे आहे; पण तरीही अजून मोठा पल्ला गाठायचा आहे, हेही लक्षात घ्यायला हवे.

# समावेशक तंत्रशिक्षणाची नांदी




**प्रा. विनोद मोहितकर**

संचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.


महाराष्ट्र शासनाने दि. ८ जुलै २०२४ रोजी मुलींच्या उच्च शिक्षणाच्या संदर्भात एक ऐतिहासिक निर्णय शासन घेतला. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यास २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता देण्यात आली आहे. यामुळे अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर, BBA, BCA, MCA यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम शिकायची इच्छा असलेल्या; पण आर्थिक कारणांमुळे मागे राहणाऱ्या मुलींना आता १०० टक्के शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क माफी मिळणार आहे. अभियांत्रिकी किंवा इतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आणि ज्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ₹८ लाखांपर्यंत आहे अशा सर्व पात्र मुलींना हा लाभ मिळणार आहे. विविध व्यावसायिक शाखांमध्ये शिकण्यासाठी जाणाऱ्या मुलींसाठी हा निर्णय समावेशक, संधी-समानतेवर आधारित आणि परिवर्तनशील मानला जात आहे.

याआधी या अभ्यासक्रमांसाठी मुलींना फक्त ५० टक्के शुल्कमाफी मिळत होती; पण मुलींचा व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशदर फक्त ३६ टक्के असल्याचे आढळल्यावर या वर्गाला

| अभ्यासक्रम | २०२३-२४ | २०२४-२५ | | | २०२५-२६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुलींचे एकून प्रवेश | मुलींचे एकून प्रवेश | वाढ | टक्के वाढ | मुलींचे एकून प्रवेश | वाढ | टक्के वाढ |
| पदविका अभियांत्रिकी | ३०४४८ | ३६९९३ | ६५४५ | २१.५० | ४३६५८ | १३२१० | ४३.३९ |
| पदवी अभियांत्रिकी | ४४१०७ | ६६२२० | २२११३ | ५०.१३ | ७९१२९ | ३५०२२ | ७९.४० |
| पदवी औषधनिर्माण शास्त्र | १३२५२ | १८३९६ | ५१४४ | ३८.८२ | प्रवेश प्रकिया सुरु | | |
| पदविका औषधनिर्माण शास्त्र | १३५४७ | १६२३८ | २६९१ | १९.८६ | १७३६५ | ३८१८ | २८.१८ |
| एमबीए /एमएमएस | १३८३८ | १९३५३ | ५५१५ | ३९.८५ | २१९८८ | ८१५० | ५८.९० |
| पदवी वास्तुशास्त्र (Architecture) | १२५७ | १६७८ | ४२१ | ३३.४९ | १७८७ | ५३० | ४२.१६ |
| **एकूण** | **१२९०४४** | **१९७२६९** | **६८२२५** | **५२.८६** | **१९३५७५** | **६०७३०** | **४७.०६** |

आर्थिक मदतीची गरज अधिक असल्याचे स्पष्ट झाले. मुलींना शिक्षणात समान संधी मिळावी, ग्रामीण भागातील विद्यार्थिनी पुढे याव्यात, त्यांना चांगल्या नोकरीच्या व उद्योजकतेच्या संधी मिळाव्यात आणि कुटुंबावर आर्थिक ओझे पडू नये हे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. शासनाची ही गुंतवणूक मुलींच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. 'एक मुलगी शिकली, तर संपूर्ण कुटुंब आणि संपूर्ण समाज प्रगत होतो.' यावर शासनाचा विश्वास असल्याने या निर्णयामुळे महाराष्ट्रभरातील असंख्य विद्यार्थिनी व्यावसायिक शिक्षण घेण्यास पुढे येत आहेत. भविष्यात त्या राज्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकतील.

व्यावसायिक शिक्षण हे दीर्घ काळापासून मुलींसाठी, विशेषतः ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलींना असलेल्या आर्थिक अडथळ्यांमुळे अशक्य असे स्वप्न ठरत होते. अभियांत्रिकी किंवा फार्मसीसारख्या अभ्यासक्रमांची फी, शिक्षणाच्या ठिकाणी निवास आणि तिथे येण्यासाठी होणारा प्रवास खर्च, कौटुंबिक आर्थिक जबाबदाऱ्या या सर्वांमुळे अनेक मुली या क्षेत्रांपासून दूर होत्या. शासनाच्या या पुरोगामी निर्णयामुळे व्यावसायिक शिक्षणातील 'स्त्री-पुरुष समानता' प्रस्थापित करण्याच्या दिशेने महाराष्ट्राने दमदार पाऊल टाकले आहे. त्यामुळे या मदतीकडे केवळ आर्थिक मदत या दृष्टीने बघून चालणार नाही.

मुलींच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सशक्तीकरणाचा व्यापक सामाजिक उपक्रम म्हणायला हवा. या धोरणामुळे राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये मुलींच्या प्रवेशाचे प्रमाण लक्षणीय वाढले असून, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थिनींमध्ये उच्च तांत्रिक शिक्षण घेण्याचा उत्साह त्याचबरोबर आत्मविश्वास वाढताना दिसत आहे. शिक्षण हा खर्च नसून, गुंतवणूक आहे, याची जाणीव आता कुटुंबांना नव्याने होत आहे.

या योजनेमुळे राज्यातील अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक आणि डी फार्मसी मुलींच्या प्रवेशातील दिसून आलेली वाढ पुढीलप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५):

या सर्व अभ्यासक्रमांमध्ये, विशेषतः अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक आणि फार्मसी या मोठ्या व्यावसायिक शाखांमध्ये लक्षणीय आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये अभियांत्रिकी पदवी आणि पदविकामध्ये साधारणतः २८,००० तर २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात साधारणतः ४८००० अधिक मुलींनी प्रवेश घेतल्याचे निदर्शनास येते, ही एक ऐतिहासिक बाब आहे.

### ग्रामीण भागावर विशेष प्रभाव

महाराष्ट्र शासनाच्या १०० टक्के शुल्कमाफी योजनेचा ग्रामीण भागावर अत्यंत सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. आतापर्यंत तंत्रशिक्षण हे ग्रामीण मुलींकरिता आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक क्षेत्र मानले जात होते; परंतु शुल्कमाफीमुळे अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर, BBA, BCA, MCA यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे ग्रामीण विद्यार्थिनींचा कल मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

मागील दोन वर्षांच्या मुलींच्या प्रवेश संख्येची तुलना केल्यास २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ या वर्षात शहरी विभागात १५,४६८ म्हणजे ३१.४७ टक्के वाढ झाली. ग्रामीण विभागात हा वाढीचा दर ४०.९० आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शहरी विभागात प्रवेशात १८,१९३ म्हणजे ३७ टक्के वाढ, तर ग्रामीण विभागात हा वाढीचा आकडा ३०,५३९ म्हणजे ४५.६५ टक्के एवढा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना या योजनेचा जास्त फायदा झालेला आहे, हेच या आकडेवारीवरून दिसते.

पूर्वी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, उत्पन्नाची मर्यादा किंवा महाविद्यालयांचा खर्च न झेपणे अशा कारणांमुळे गावातील मुली उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांचा विचारही करत नसत. शुल्कमाफी योजनेमुळे ही आर्थिक अडथळ्यांची भिंत दूर झाली आणि अनेक ग्रामीण मुली प्रथमच व्यावसायिक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्या. हे ग्रामीण सामाजिक बदलाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

ग्रामीण भागातील अनेक महाविद्यालये आणि पॉलिटेक्निक संस्थांत मुलींच्या प्रवेशात लक्षणीय वाढ झाल्याने शैक्षणिक वातावरण बदलले, शिवाय स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बहुआयामी चालना मिळाली आहे. विद्यार्थिनींची संख्या वाढल्यामुळे स्थानिक पातळीवर वसतिगृहे, भोजनालये, किराणा दुकाने, स्टेशनरी, परिवहन सेवा, अशा विविध क्षेत्रांत आर्थिक व्यवहार वाढू लागले आहेत. विशेषतः मुलींसाठी असलेल्या सुरक्षित निवास व्यवस्थेची मागणी वाढल्यामुळे अनेक ठिकाणी महिला वसतिगृह, पीजी व्यवस्था, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. स्थानिक उद्योग, छोटे उद्योजक, वाहतूकदार, आणि सेवा पुरवठादार यांना स्थिर उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होत आहेत. महिला प्रवेशात वाढ झाल्यामुळे संस्थांची शैक्षणिक आणि आर्थिक स्थैर्य सुधारले आहे. ग्रामीण भागातच गुणवत्तापूर्ण तंत्रशिक्षण उपलब्ध झाल्याने मोठ्या शहरांकडे स्थलांतराची गरज कमी होत आहे. हे ग्रामीण विकासाला गती देणारे महत्त्वाचे पाऊल ठरते.

**आव्हाने आणि मर्यादा**

या बदलाचे स्वागत करताना त्यातील आव्हानांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. काही आव्हाने व मर्यादा अद्यापही आहेत. शुल्कमाफीमुळे शैक्षणिक शुल्क भरण्याची अडचण दूर झाली असली, तरी लॅपटॉप/टॅब, पाठ्यपुस्तके, प्रॅक्टिकल किट्स, हॉस्टेल फी, दैनंदिन प्रवास, इंटरनेट सुविधा असे पूरक खर्च करण्यासाठी पैसे उभे करणे अनेक ग्रामीण विद्यार्थिनींसाठी अजूनही



अवघड आहे. विशेषतः अभियांत्रिकी, फार्मसी आणि संगणकशास्त्र शाखांमध्ये प्रकल्प, सॉफ्टवेअर, किट्स यासाठी अतिरिक्त आर्थिक तरतूद आवश्यक असते, जी सर्व कुटुंबांना परवडेल असे नाही.

या योजनेचा प्रभाव अधिक व्यापक व दीर्घकालीन करण्यासाठी राज्य शासन आणि संस्थांनी काही निर्णायक पावले उचलणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, ग्रामीण व निम्न-उत्पन्न गटातील विद्यार्थिनींसाठी हार्डवेअर सपोर्ट स्कीम, डिजिटल साधनांवर सवलत, इंटरनेट पॅकेजेस, आणि प्रॅक्टिकल किट्स यांसारख्या पूरक साह्य योजनांची रचना करणे आवश्यक ठरेल, ज्यामुळे शिक्षणातील ताण कमी होईल. या अतिरिक्त खर्चाला हातभार लावण्यासाठी उद्योग क्षेत्रांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या (CSR) माध्यमातून पुढाकार घेऊन मदत करायला हवी. त्यासाठी सर्व संस्थांनीसुद्धा पुढाकार घेतला पाहिजे.

महिलांसाठी विशेष वसतिगृह प्रकल्प, सुरक्षित वाहतूक सुविधा, महिला सुरक्षा आणि हेल्पडेस्क, काउन्सेलिंग सेवा; तसेच जिल्हानिहाय 'मुलींसाठी शैक्षणिक मदत कक्ष' स्थापन करणे गरजेचे आहे. तंत्रशिक्षण क्षेत्रात महिलांची रोजगारक्षमता वाढवण्यासाठी ऑन-द-जॉब ट्रेनिंग (OJT), इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप, उद्योग भेटी, प्रोजेक्ट-आधारित शिक्षण आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी प्रमाणित प्रशिक्षण कार्यक्रम (AI, EV-Tech, Drones, Cybersecurity, Data Science) उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.




# वाचन संस्कृतीत महाराष्ट्र देशात अग्रणी : प्रा. अजय प्रताप सिंह

भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय आणि राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान (RRRLF) या दोन अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय संस्थांचे नेतृत्व सध्या प्रा. अजय प्रताप सिंह करत आहेत. त्यांच्या विचारांतून महाराष्ट्रातील वाचनालय धोरणांना, विकासाला आणि डिजिटल परिवर्तनाला नवी दिशा मिळते आहे. त्यांच्याशी झालेला हा संवाद .



**(मुलाखत : श्री. अशोक गाडेकर)**
प्रभारी संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**प्रश्न : भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय आणि राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान — या दोन्ही संस्थांची मूलतत्त्वे काय?**

**प्रा. सिंह :** भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय हे देशाच्या ज्ञानसंस्कृतीचे सर्वोच्च केंद्र आहे—जतन, संशोधन आणि संकलनाचा मुख्य आधार आहे.

दुसरीकडे, राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ही संस्था म्हणजे ते ज्ञान प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्याची राष्ट्रीय व्यवस्था आहे.

एक संस्था ज्ञानाचे संकलन जपते आणि दुसरी त्या ज्ञानाचे सर्वांसाठी समान वितरण करण्याचे काम करते. या दोन्ही संस्थांची ध्येयरेषा एकच—Knowledge for All, Books for all, Libraries for All.

**प्रश्न : भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय देशासाठी किती महत्त्वाचे आहे?**

**प्रा. सिंह :** लाखो ग्रंथ, पांडुलिपी, नकाशे, दुर्मीळ सामग्री—भारताचा इतिहास, संस्कृती, विचारपरंपरा येथे सुरक्षित आहेत.

राष्ट्रीय बिब्लिओग्राफीपासून डिजिटल कॅटलॉगपर्यंत—हे ग्रंथालय देशाच्या बौद्धिक अस्तित्वाचा कणा आहे.

**प्रश्न : RRRLF ची नेमकी भूमिका काय आहे?**

**प्रा. सिंह :** RRRLF ही भारतातील सार्वजनिक वाचनालय चळवळीच्या विकासासाठीची राष्ट्रीय अग्रणी संस्था आहे.प्रतिष्ठानच्या मेमोरँडममध्ये प्रतिपादन केलेल्या प्रमुख जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत —

१. भारतातील सार्वजनिक वाचनालय चळवळीला चालना आणि प्रोत्साहन देणे.
२. राष्ट्रीय ग्रंथालय धोरण जाहीर करून ते सर्व राज्यांमध्ये लागू होण्यासाठी प्रयत्न करणे.
३. ग्रामीण पातळी ते राष्ट्रीय स्तरापर्यंत उत्कृष्ट वाचनालयांची साखळी उभी करण्यासाठी मार्गदर्शन व सेवा देणे.
४. सर्व राज्यांनी सार्वजनिक वाचनालय कायदा करावा यासाठी पाठपुरावा करणे.
५. वाचनालये, संस्था आणि घटकांना आर्थिक सहायता देणे.
६. भारतात आणि भारताबाहेर वाचनालय विकासासाठी Clearing House म्हणून काम करणे.
७. वाचनालय क्षेत्रातील संशोधन, अभ्यास आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणे.
८. भारत सरकारला वाचनालय विकासावरील सर्व बाबतीत मार्गदर्शन देणे.

राजाराम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची रचना पुढीलप्रमाणे आहे...

RRRLF चे पदसिद्ध अध्यक्ष हे भारत सरकारचे सांस्कृतिक मंत्री असतात. आता सध्या, सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री श्री. गजेंद्र सिंग शेखावत हे अध्यक्ष आहेत.

या व्यवस्थेमुळे RRRLF ला थेट राष्ट्रीय धोरणनिर्मितीमध्ये स्थान मिळते.

**प्रश्न : नुकत्याच, म्हणजे २४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय नियोजन समितीच्या बैठकीत तुम्ही उपस्थित होतात . त्या बैठकीतील प्रमुख निर्णय कोणते?**

**प्रा. सिंह :** या बैठकीत झालेल्या अनेक




निर्णयांमुळे ती महाराष्ट्राच्या वाचनालय क्षेत्रात ऐतिहासिक ठरली, असे नक्की म्हणता येईल. त्यात झालेले निर्णय कोणते तर, १) १६ वाचनालय इमारत प्रस्तावांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली २) ग्रामीण आणि शहरी भागात पायाभूत सुविधा मजबूत करण्याचा निर्णय झाला ३) वाचनालय सेवा थेट नागरिकांच्या दारात नेणारा Library on Wheels उपक्रम महाराष्ट्रात राबविण्याचा निर्णय झाला ४) पूरग्रस्त वाचनालयांना साहित्य, फर्निचर, उपकरणे पुनर्संचयित करण्यासाठी तातडीची विशेष मदत देण्याचे ठरले ५) A व B वर्ग ग्रंथालयांना संगणक भेट देण्यात येणार असून, त्यामुळे डिजिटल सेवा, ई-कॅटलॉगिंग आणि ICT सक्षमीकरण होऊ शकेल ५) एकूण ६ कोटी रुपयांच्या योजनांना मंजुरी देण्यात आली. इमारती, उपकरणे, पुस्तके, डिजिटल सेवा यासाठी ही मदत उपयोगी पडू शकेल. या निर्णयांमुळे महाराष्ट्राच्या वाचनालय विकासाला नवी गती मिळेल.

**प्रश्न : महाराष्ट्राची वाचनालय व्यवस्था देशभरात आदर्श का मानली जाते?**


**प्रा. सिंह :** स्वतंत्र संचालनालय, १९६७ चा सार्वजनिक वाचनालय अधिनियम, जिल्हा यंत्रणा आणि ११,००० पेक्षा जास्त ग्रंथालये असलेला महाराष्ट्र हे वाचनसंस्कृतीत निश्चित अग्रणी राज्य आहे. येथील लोकसहभाग आणि संस्थांची निष्ठा ही अद्वितीय आहे.

**प्रश्न : राज्याची भूमिका आणि योगदान याबाबत आपण काय सांगाल?**

**प्रा. सिंह :** ना. चंद्रकांतदादा पाटील यांची व्यापक दूरदृष्टी आणि ग्रंथप्रेम, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, यांची धोरणात्मक गती आणि संचालक, ग्रंथालय संचालनालयाचे संचालक अशोक गाडेकर यांचे सशक्त प्रशासन—ही त्रिसूत्री महाराष्ट्रासाठी अतिशय परिणामकारक ठरते आहे.

**प्रश्न : RRRLF च्या योजना कोणकोणत्या?**

**प्रा. सिंह :** १) समान निधी योजना (Matching Scheme) केंद्र–राज्य संयुक्त निधी : ५०:५० / ६०:४० / ९०:१ यात १)



पुस्तक खरेदी २) फर्निचर व उपकरणे ३) संगणक व IT ४) इमारत विस्तार ५) दिव्यांग सुविधा ६) सेमिनार, कार्यशाळा, प्रशिक्षण ७) मोबाइल लायब्ररी / ग्रामीण सेवा याचा समावेश आहे. दुसरी आहे २) असमान निधी योजना (Non-Matching Scheme). यात पूर्ण निधी केंद्र सरकारकडून मिळतो जो –१) Knowledge Corner २) स्वयंसंचालित संस्था ३) राष्ट्रीय कार्यशाळा ४) सांख्यिकी व सर्वेक्षण ५)RRRLF Children Corner ६) दुर्मीळ दस्तावेज डिजिटायझेशन यांच्या उपयोगी पडू शकतो.

### प्रश्न : Library on Wheels या उपक्रमाबद्दल आपले मत?

**प्रा. सिंह :** हा प्रकल्प ज्ञानाला पाय देणारा आहे. दुर्गम, आदिवासी, वंचित भागांपर्यंत वाचनसेवा पोहोचवणारे हे चालते वाचनालय आहे. GPS, प्रशिक्षित कर्मचारी, नियमित नोंदवही याच्या आधारे ही सेवा अत्यंत शिस्तबद्धरीत्या चालते. महाराष्ट्र हा या मॉडेलचा राष्ट्रीय आदर्श बनू शकतो.

### प्रश्न : National Mission on Libraries (NML) बद्दल आपली भूमिका?

**प्रा. सिंह :** या मिशन अंतर्गत प्रत्येक राज्यातील एक राज्य मध्यवर्ती ग्रंथालय आणि एक जिल्हा ग्रंथालय आधुनिक सोयींनी विकसित करण्यात आले आहे. शिवाय National Virtual Library, Model Libraries, ICT प्रशिक्षण— यामुळे वाचनालयांचे आधुनिकीकरण वेगाने झाले आहे.

### प्रश्न १० : RRRLF चे नवीन ऑनलाइन पोर्टल कसे बदल घडवेल?

**प्रा. सिंह :** RRRLF ने अत्यंत महत्त्वाचा डिजिटल उपक्रम सुरू केला आहे—Online RRRLF Portal. या पोर्टलद्वारे National Register of Public Libraries मध्ये देशातील सर्व सार्वजनिक वाचनालयांची नोंदणी होईल; तसेच सर्व Matching व Non-Matching योजनांसाठी अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करता येतील. प्रक्रिया अधिक पारदर्शक, जलद आणि एकसंध होईल. हे लक्षात घेता हा उपक्रम RRRLF चा सर्वात परिवर्तनकारी टप्पा म्हणावा लागेल.

### प्रश्न : विद्यार्थ्यांसाठी व तरुणांसाठी तुमचा संदेश?

**प्रा. सिंह :** वाचन हे व्यक्तिमत्त्व घडवते. वाचनालयाचा उपयोग करा कारण हे ज्ञानाचे हे सर्वांत मोठे केंद्र आहे. स्पर्धा परीक्षा, संशोधन, कौशल्यविकास या सर्वांसाठी वाचनालय हीच गुरुकिल्ली आहे.

डिजिटल साधने शिका, पुस्तके वाचा, आणि स्वतःला दररोज समृद्ध करा.”

महाराष्ट्राची वाचनालय चळवळ नवे अध्याय लिहित आहे. राज्य नेतृत्व, RRRLF चे राष्ट्रीय मार्गदर्शन आणि डिजिटल भविष्य—या तिन्हींच्या एकत्रित प्रयत्नांनी महाराष्ट्र भारतातील सर्वांत सक्षम वाचनालय राज्य ठरेल.



शासकीय विभागीय ग्रंथालयांमधून केवळ वाचनसेवा दिली जात नसून, वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. या ग्रंथालयाचा लाभ घेऊन अनेक वाचक, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी व संशोधक विविध पदांवर कार्यरत झालेले आहेत. एका अर्थाने ही सगळी ग्रंथालये त्या त्या विभागातील ज्ञान केंद्रे झाली आहेत हे नक्की.



**अशोक गाडेकर,**
प्रमुख ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# विभागस्तरीय ज्ञानकेंद्रे

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सार्वजनिक ग्रंथालयाची गरज आहे. सार्वजनिक ग्रंथालय ही लोकशिक्षणाची आणि सामुदायिक शिक्षणाची प्रमुख केंद्रे असून, मानवाच्या अनौपचारिक शिक्षणाचे ते विद्यापीठ आहे. एका अर्थाने ही लोक विद्यापीठे म्हणायला हवीत. ज्ञान व माहितीने परिपूर्ण असा आधुनिक, कालानुरूप समाज निर्माण करून त्याद्वारे राष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ज्ञानाच्या प्रवेशद्वाराची म्हणजेच ग्रंथालयांची सहज उपलब्धता ही अत्यंत आवश्यक आहे.

राज्यातील ग्रामीण आणि शहरी विभागातील जनतेला शैक्षणिक, सामाजिक यासह सर्व क्षेत्रांतील विविध बाबी व विषयांची परिपूर्ण माहिती ग्रंथालयाच्या माध्यमातून मिळावी यासाठी शासनाने जे स्तुत्य असे निर्णय घेतले आहेत, त्यापैकी एक म्हणजे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७ याची निर्मिती. या अधिनियमाच्या प्रकरण ४ कलम ११ पोट कलम १ नुसार महाराष्ट्र राज्य शासनाने एकूण सहा महसूल प्रशासकीय विभागाप्रमाणे प्रत्येक महसुली विभागात एक शासकीय विभागीय ग्रंथालय स्थापन केले आहे.

मुंबई सरकारने १९३८ साली श्री. ए. ए. ए. फैजी यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती व प्रादेशिक ग्रंथालय स्थापनेच्या शक्यतेचा विचार करण्यासाठी ग्रंथालय विकास समिती नेमली होती. या समितीने शासनावर




आर्थिक बोजा न टाकता अल्प खर्चात ग्रंथालय सुविधा निर्माण करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या प्रस्थापित ग्रंथालयांचा उपयोग करून घेऊन मध्यवर्ती आणि प्रादेशिक ग्रंथालय स्थापनेची शिफारस केली होती. प्रादेशिक ग्रंथालयाने त्या प्रदेशातील (भाषिक संदर्भाने) ग्रंथालयाचे नेतृत्व मान्य करावे व ग्रंथालय चळवळीला चालना द्यावी, अशी शिफारस फैजी समितीच्या अहवालात करण्यात आली होती. मुंबई सरकारने १९४७ मध्ये फैजी समितीच्या शिफारशीवर कार्यवाही सुरू करून अहमदाबादला गुजराती, धारवाडला कानडी व पुणे येथे मराठी अशी तीन प्रादेशिक ग्रंथालये स्थापन केली.

प्रादेशिक ग्रंथालयांच्या भाषिक संदर्भातील कल्पनेत १९५६ च्या भाषावार प्रांतरचनेनंतर बदल झाला आणि भौगोलिक संदर्भाने या प्रादेशिक ग्रंथालयांचा विचार होऊ लागला. प्रादेशिक या शब्दाऐवजी विभागीय शब्दप्रयोग रूढ होऊन विभागीय ग्रंथालयांची कल्पना अस्तित्वात आली.

सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम असलेल्या राज्यांपैकी आंध्र प्रदेश व महाराष्ट्र या दोनच राज्यांनी 'विभागीय ग्रंथालयां'ची वैधानिक तरतूद अधिनियमात स्पष्टपणे नमूद केली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९६७ च्या प्रकरणातील चौथे कलम ११ पोटकलम १ प्रमाणे राज्य शासनाला राज्याकरिता एक मध्यवर्ती आणि प्रत्येक महसूल विभागाकरिता एक विभागीय ग्रंथालय स्थापन करता येईल, अशी स्पष्ट तरतूद आहे. या तरतुदीनुसार आज महाराष्ट्रातील सहा महसूल विभागांकरिता एक विभागीय ग्रंथालय स्थापन झालेले आहे. पुढील सहा शासकीय विभागीय ग्रंथालये सध्या महाराष्ट्रात कार्यरत आहेत.

१) शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर
२) शासकीय विभागीय ग्रंथालय, छत्रपती संभाजीनगर
३) शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे
४) शासकीय विभागीय ग्रंथालय, नाशिक
५) शासकीय विभागीय ग्रंथालय, रत्नागिरी
६) शासकीय विभागीय ग्रंथालय, अमरावती

ग्रंथाद्वारे अभिरुची वृद्धिंगत करून वाचनसंस्कृती जोपासली जावी आणि ग्रंथालय चळवळ वृद्धिंगत व्हावी, या हेतूने प्रत्येक विभागात ही विभागीय ग्रंथालये स्थापन झाली आहेत. प्रत्येक शासकीय विभागीय ग्रंथालय स्थापनेमागे वेगळी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

## शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर :-

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी विदर्भ म्हणून ओळखला जाणारा हा भाग मध्य प्रदेशात समाविष्ट होता. तत्कालीन विदर्भात नागपूर व अमरावती हे विभाग होते. १९५५ मध्ये मध्य प्रदेश सरकारने ग्रंथालय सेवा विकासाची एक महत्त्वाकांक्षी योजना राबवली. त्या योजनेमध्ये ४ क योजना कलमाखाली वाचन विकास ही संकल्पना मांडली व या कामासाठी नागपूर येथे एक केंद्रीय ग्रंथालय व तत्कालीन जिल्ह्यात एक याप्रमाणे आठ शासकीय जिल्हा ग्रंथालये मुख्यालयाच्या ठिकाणी प्रस्थापित केली. राज्य पुनर्रचनेनंतर ही ९ शासकीय ग्रंथालये महाराष्ट्र शासनाच्या व्यवस्थेखाली आली. सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम मंजूर झाल्यानंतर या केंद्रीय ग्रंथालयाचे नामकरण 'शासकीय विभागीय ग्रंथालय' नागपूर असे झाले.

वाढत्या ग्रंथ संग्रहामुळे प्रशस्त इमारतीची गरज भासू लागल्यामुळे विभागीय आयुक्त कार्यालय परिसरातील १२००.०० चौ. मीटरच्या जागेमध्ये ७८०.६३ चौरस मीटरच्या क्षेत्रफळामध्ये ग्रंथालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. ग्रंथालयाची स्वतःची तीन मजली अशी भव्यदिव्य इमारत आहे.

## मुद्रण आणि पुस्तक - नोंदणी अधिनियम :-

शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर या ग्रंथालयास मुद्रण आणि पुस्तक - नोंदणी अधिनियम १८६७ या कायद्याप्रमाणे प्रत्येक मुद्रकाने मराठी भाषेत मुद्रित केलेले ग्रंथ विनामूल्य या कार्यालयास पाठविणे बंधनकारक आहे. त्यांचे जतन व संरक्षणाचे काम प्रामुख्याने राज्य प्रादेशिक स्तरावर असलेल्या शासकीय ग्रंथालयांकडे सोपविलेले आहे. त्या प्राप्त पुस्तकांच्या/ग्रंथाच्या पोचपावत्या प्रकाशक/मुद्रकांना पाठविण्यात येतात आणि आलेल्या ग्रंथांच्या स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंदी करण्यात येतात, त्यावर सोपस्कार करून त्यांची ग्रंथसूची तयार करून ती ग्रंथालय संचालनालय, मुंबई, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई व शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे येथे पाठविण्यात येते.

या ग्रंथालयांमध्ये २,६७,८२३ ग्रंथ असून, ६९८ नोंदणीकृत वैयक्तिक वाचक सभासद व १४ संस्था सभासद आहेत. ई-ग्रंथालय आज्ञावलीचा या ग्रंथालयामध्ये वापर करण्यात येत असून याद्वारेच ऑनलाइन पद्धतीने ग्रंथ देव-देव केली जाते.

## शासकीय विभागीय ग्रंथालय, छत्रपती संभाजीनगर :-

छत्रपती संभाजीनगरमध्ये २९ सप्टेंबर १९६८ रोजी राज्यातील पहिले शासकीय विभागीय ग्रंथालय स्थापन झाले.




मराठवाड्यातील सर्व साहित्यिकांच्या साहित्याचे स्वतंत्र दालन हे या ग्रंथालयाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. मराठवाडा विभागाचा इतिहास व संस्कृतीविषयक सर्व ग्रंथ व वाचनीय साहित्य इत्यादी संपादित करून त्याचे परिरक्षण, जतन व संवर्धन करण्याचे ग्रंथालयाचे उद्दिष्ट आहे. या ग्रंथालयाची इमारत वैशिष्ट्यपूर्ण असून, ती भारताच्या पूर्वीच्या संसदेप्रमाणे गोलाकार आकाराची आहे. त्यात ग्रंथ देव-घेव विभाग, नियतकालिक विभाग, बाल विभाग, संदर्भ व स्पर्धा परीक्षा विभाग, दुर्मीळ वृत्तपत्र व कात्रण विभाग इत्यादी विभाग आहेत. इमारतीच्या बांधकामाचे क्षेत्रफळ ९४६५.९८ चौ. मीटर इतके आहे. इमारतीचे उद्घाटन २००० साली महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. श्री. विलासराव देशमुख यांच्या शुभहस्ते झाले आहे. नॅशनल मिशन ऑन लायब्ररीज अंतर्गत मॉडेल लायब्ररी म्हणून निवडण्यात आलेले महाराष्ट्रातील हे एकमेव शासकीय विभागीय ग्रंथालय आहे.

या ग्रंथालयामध्ये १,९८,०५० इतके ग्रंथ असून, नोंदणीकृत वैयक्तिक वाचक सभासद संख्या ९३२८, तर ९९ संस्था सभासद आहेत. ई-ग्रंथालय आज्ञावलीचा या ग्रंथालयामध्ये वापर करण्यात येत असून, याद्वारेच ऑनलाइन पद्धतीने ग्रंथ देव-घेव केली जाते.

## शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे :-

पुण्यात १९४८ मध्ये या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आलेली असून, त्या वेळी ते महाराष्ट्र प्रादेशिक ग्रंथालय म्हणून ओळखले जात असे.

१९४८ ते १९५१ या कालावधीत ग्रंथालयाचे कामकाज स्वतंत्र समितीमार्फत चालविले जात असे. ही समिती बरखास्त झाल्यानंतर या ग्रंथालयाचे कामकाज १९५६ पर्यंत पुणे नगर वाचन मंदिर या संस्थेकडे होते. १९५६ ते १९६९ या कालावधीत या ग्रंथालयाचे व्यवस्थापन पुणे महानगरपालिकेकडे होते.

१९६७ साली शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम संमत केला. त्यातील विभागीय ग्रंथालय स्थापनेच्या तरतुदीनुसार शासनाने शासन १ ऑक्टोबर ६९ पासून हे ग्रंथालय महानगरपालिकेकडून हस्तांतरित केले आणि त्याचे ‘शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे’ असे नामकरण केले.

दि. १३ ऑक्टोबर १९७० रोजी तत्कालीन शिक्षणमंत्री ना. मधुकरराव चौधरी यांच्या शुभहस्ते आणि पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री. बा. पा. आपटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रा. ग. प्र. प्रधान व राज्याचे पहिले ग्रंथालय संचालक कै. कृ. द. पुराणिक यांच्या उपस्थितीत त्याचे रीतसर उद्घाटन करण्यात आले . ग्रंथालय स्थापनेपासून शहरातील एक सांस्कृतिक आणि ज्ञानार्जनाचे प्रमुख ठिकाण म्हणून आजपर्यंत हे ग्रंथालय अखंडपणे कार्य करीत आहे.

फैजी समितीच्या शिफारशीप्रमाणे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून प्रादेशिक ग्रंथालय व मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन करण्याचा प्रयत्नामुळे एका प्रादेशिक ग्रंथालयाच्या व्यवस्थापनातील स्थित्यंतराचा हा इतिहास आहे.

## मुद्रण आणि पुस्तक नोंदणी

मुद्रण आणि पुस्तक - नोंदणी अधिनियम, १८६७ या कायद्याप्रमाणे प्रत्येक मुद्रकाने मराठी भाषेत मुद्रीत केलेले ग्रंथ शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे या ग्रंथालयास विनामूल्य पाठविणे बंधनकारक आहे. त्यांचे जतन व संरक्षणाचे काम प्रामुख्याने राज्य प्रादेशिक स्तरावर असलेल्या शासकीय ग्रंथालयांकडे सोपवलेले आहे. त्या प्राप्त पुस्तकांच्या पोचपावत्या प्रकाशक/मुद्रकांना पाठविण्यात येतात. त्याच्या स्वतंत्र दाखल नोंदवहीमध्ये नोंदी करण्यात करून त्यांची ग्रंथसूची तयार करून ती ग्रंथालय संचालनालय, मुंबई, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविण्यात येते.

या ग्रंथालयांमध्ये ३,८४,१०८ इतके ग्रंथ असून, १३,६०३ नोंदणीकृत वाचक सभासद आहेत. ई-ग्रंथालय आज्ञावलीचा या ग्रंथालयामध्ये वापर करण्यात येत असून, याद्वारेच ऑनलाइन पद्धतीने ग्रंथ देव-घेव केली जाते. हे ग्रंथालय पुण्यामध्ये दोन ठिकाणी कार्यरत आहे. कार्यालयाचा मुख्य प्रशासन विभाग न. वि. गाडगीळ शाळा, शनिवार पेठ, पुणे येथे २०२१ पासून जुन्या महानगरपालिकेच्या शाळेमध्ये भाड्याच्या जागेमध्ये कार्यरत आहे. त्या वेळी हे ग्रंथालय विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तूमध्ये १९६८ पासून कार्यरत होते. या ग्रंथालयाचा दुसरा भाग गोखले हॉल, लक्ष्मी रोड, पुणे येथे कार्यरत आहे.

## शासकीय विभागीय ग्रंथालय, नाशिक :-

पूर्वीच्या मुंबई विभागासाठी नाशिक येथे दि. २९ जुलै १९७४ रोजी शासकीय विभागीय ग्रंथालय, नाशिक या कार्यालयाची

स्थापना करण्यात आली. पूर्वीच्या मुंबई विभागासाठी नाशिक विभागीय ग्रंथालयाचे उपकेंद्र रत्नागिरी येथे सुरू करण्यात आले. या विभागाच्या नाशिक, जळगाव, धुळे, ठाणे जिल्ह्यांसाठी आवश्यक ते संदर्भसाह्य, संस्था सभासदांना ग्रंथ संच वाटप व अन्य आंतर ग्रंथालयीन देव-घेवीचे काम नाशिक येथील ग्रंथालयाने करावे व रत्नागिरी येथील उपकेंद्राने रत्नागिरी व कुलाबा या दोन जिल्ह्यांसाठी उपरोक्त सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा होती.

नाशिक महसुली विभागाच्या निर्मितीनंतर या विभागाच्या कार्यक्षेत्रात अहिल्यानगर, जळगाव, नाशिक, धुळे व नंदुरबार या पाच जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. आता शासकीय विभागीय ग्रंथालय, नाशिक हे नाशिक विभागाच्या संदर्भ ग्रंथालयाचे कार्य करीत आहे. ग्रंथालयाकडून अभ्यागत, वाचक, संशोधक, साहित्यिक, आबालवृद्ध, महिला, दिव्यांग वाचक, परिसरातील नागरिकांना वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथालयातील संदर्भ व अन्य ग्रंथ ग्रंथालयाच्या वाचनकक्षात वाचनासाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले जातात. ग्रंथालयाचे सभासदत्व स्वीकारलेल्या व्यक्ती/संस्थांना ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ वगळून अन्य वाचनीय साहित्य नाममात्र शुल्क आकारून वाचनासाठी घरी दिले जातात. या ग्रंथालयामध्ये ९६४७० इतके ग्रंथ असून, ३३५ नोंदणीकृत वैयक्तिक वाचक सभासद व ४१ संस्था सभासद आहेत. ई-ग्रंथालय आज्ञावलीचा या ग्रंथालयामध्ये वापर करण्यात येत असून, याद्वारेच ऑनलाइन पद्धतीने ग्रंथ देव-घेव केली जाते.

### शासकीय विभागीय ग्रंथालय, रत्नागिरी :-

भारताचे सुपुत्र लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मरणार्थ दि. ०१ ऑगस्ट १९६३ रोजी रत्नागिरीचे रहिवासी आणि महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री मा. स्व. बाळासाहेब सावंत यांच्या शुभहस्ते या इमारतीच्या पायाभरणीचा समारंभ होऊन दि. ०१ मे १९७२ रोजी भारताचे अर्थमंत्री मा. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. याच ठिकाणी दि. २० ऑक्टोबर १९७६ रोजी कोकणवासीयांकरिता महाराष्ट्र शासनाद्वारे शासकीय विभागीय ग्रंथालय, रत्नागिरी सुरू करण्यात आले. शासकीय विभागीय ग्रंथालय रत्नागिरी कार्यालय, सध्या लोकमान्य टिळक स्मारक मंदिर, खारेघाट रोड येथे कार्यरत आहे. वाचकांना अधिकाधिक व आधुनिक सेवा देण्याकरिता ग्रंथालयाचे आधुनिकीकरण, संगणकीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे वाचक ग्रंथालयातील ग्रंथ आपल्या घरून ऑनलाइन पद्धतीने पाहू शकतात. ई-वाचन करण्यासाठी इथे २३ टॅब उपलब्ध आहेत. ग्रंथांचे व जुन्या वर्तमानपत्रांचे डिजिटायझेशन करणारे डिजिटायझेशन मशिन असून, ग्रंथालयाचे ऑटोमेशन करताना आर. एफ. आय. डी. तंत्रज्ञान बसवल्याने वाचकांना ग्रंथ देव-घेव स्वयंचलित पद्धतीने करता येते; तसेच ग्रंथालयात ग्रंथ व इतर वाचन साहित्य सुरक्षित राहण्यासाठी मदत होत आहे. या ग्रंथालयामध्ये १,१३,७९४ ग्रंथ आहेत. ई-ग्रंथालय आज्ञावलीचा या ग्रंथालयामध्ये वापर करण्यात येत असून, याद्वारेच ऑनलाइन पद्धतीने ग्रंथ देव-घेव केली जाते.

### शासकीय विभागीय ग्रंथालय, अमरावती :-

भारत सरकारच्या ग्रंथालय विकास योजनेंतर्गत १९५५ मध्ये तत्कालीन मध्य प्रांतातील विदर्भाच्या आठ जिल्ह्यांमध्ये शासकीय जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आली. राज्य पुनर्रचनेनंतर १९५६ मध्ये विदर्भ भाग तत्कालीन मुंबई राज्यात समाविष्ट झाल्यानंतर; तसेच मे १९६८ मध्ये ग्रंथालय संचालनालयाची स्थापना होईपर्यंत ती योजना तशीच सुरू ठेवण्यात आली. महाराष्ट्र शासनाने महसूल विभागाची पुनर्रचना केल्यावर अमरावती विभागाची निर्मिती झाली. या विभागासाठी विभागीय ग्रंथालय स्थापन करण्याची मागणी लक्षात घेऊन दि. ०१ नोव्हेंबर १९९६ रोजी तेथील शासकीय जिल्हा ग्रंथालयाला शासकीय विभागीय ग्रंथालयाचा दर्जा देऊन तसे घोषित करण्यात आले.

या ग्रंथालयामध्ये १२,०,८२१ इतके ग्रंथ असून, २६०८ नोंदणीकृत वैयक्तिक वाचक सभासद व १७२ संस्था सभासद आहेत. ई-ग्रंथालय आज्ञावलीचा या ग्रंथालयामध्ये वापर करण्यात येत असून, याद्वारेच ऑनलाइन पद्धतीने ग्रंथ देव-घेव केली जाते.

महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही नागरिकाला शासकीय विभागीय ग्रंथालयांचे सभासद होता येते. ५०० रुपये अनामत व १०० रुपये द्विवार्षिक शुल्क या नाममात्र रकमेवर सभासदत्व दिले जाते. व्यक्ती सभासदत्वाच्या सोयीमुळे स्थानिक नागरिकांना या ग्रंथालयाचा फायदा घेता येतो. विभागातील सर्व जनतेला या ग्रंथालयाचा फायदा घेता यावा, यासाठी संस्था सभासदत्व देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. नोंदणी झालेल्या संस्थेला २५००/ रुपये अनामत रक्कम व ७५०/ रुपये द्विवार्षिक शुल्क भरून संस्था सभासदत्व प्राप्त होते. प्रत्येक संस्थेला १५० ते २०० पुस्तकांचा संच दिला जाऊन ही पुस्तके वाचून झाल्यानंतर ती परत करून दुसरी पुस्तके वाचनासाठी दिली जातात. दोन्ही प्रकारांत घेण्यात येणारे प्रवेश शुल्क दोन वर्षांसाठी आहे. त्यानंतर पुन्हा प्रवेश शुल्क भरून सभासदत्वाचे नूतनीकरण करावे लागते.

शासकीय विभागीय ग्रंथालयांमधून केवळ वाचनसेवा दिली जात नसून, वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ग्रंथ यात्रा, ग्रंथ प्रदर्शन, लेखक आपल्या भेटीला, व्याख्याने, परिसंवाद, कवी संमेलन, राष्ट्रीय ग्रंथ सप्ताह, कार्यशाळा, चर्चासत्रे असे विविध कार्यक्रम नित्यनेमाने आयोजित केले जातात. या ग्रंथालयाचा लाभ घेऊन अनेक वाचक, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी व संशोधक विविध पदांवर कार्यरत झालेले आहेत.

महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीच्या विकासामध्ये शासकीय विभागीय ग्रंथालयांचे फार मोठे योगदान आहे. वाचक, संशोधक व अभ्यासक यांना सर्वांगीण वाचन सेवा पुरविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही ग्रंथालये करीत आहेत.




नागपूर पुस्तक महोत्सवातील अभिनव संकल्पना म्हणजे 'पोस्ट कार्ड पेंटिंग'चे भव्य प्रदर्शन. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या चित्रकला महाविद्यालयांतील आणि शाळांमधील कला विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी पोस्ट कार्डवर आपल्या आवडत्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे पेंटिंग केले किंवा पुस्तकातील कथा/प्रसंग रंगवून आपल्या भावना व्यक्त केल्या. अशी प्रतिमांकन केलेली जवळपास दोन हजार पोस्ट कार्ड या ठिकाणी होती.



**डॉ. किशोर इंगळे**
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र

# नागपूर पुस्तक महोत्सव २०२५

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय पुस्तक न्यास (NBT), भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि झिरो माइल युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रेशीमबाग मैदानात आयोजित करण्यात आलेले 'नागपूर पुस्तक महोत्सव २०२५' हे भव्य राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शन नुकतेच पार पडले. देशभरातील ३०० पेक्षा अधिक प्रसिद्ध प्रकाशकांच्या बुक स्टॉल्सवर सुमारे १५ लाख पुस्तके विशेष सवलतीच्या दरात खरेदी करण्यासाठी उपलब्ध होती.

पुस्तक महोत्सवात सर्व विषय; तसेच सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी या ठिकाणी शासकीय आणि खासगी प्रकाशकांची पुस्तके उपलब्ध होती. भारतीय संस्कृतीवर आधारित पुस्तके, हिंदी निदेशालनालयाच्या स्टॉल्समध्ये नेपाळी, अरबी, चायनीज भाषेतून हिंदीत भाषांतरित झालेली पुस्तके विशेष आकर्षण ठरली. सर्व धर्मांचे तत्त्वज्ञान, विविध धार्मिक विधी, योगशास्त्र या विषयांवरील पुस्तकांनी महोत्सवात विशेष रंग भरण्याचे काम केले आहे. मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, या अनुषंगाने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमधील पुस्तकांच्या गाळ्यांवर चिमुकल्या वाचकांची दिसणारी गर्दी आश्वस्त करणारी होती. त्यात प्रसिद्ध लेखक गुलजार यांची लहान मुलांकरिता लिहिलेली पुस्तके उपलब्ध होती. देश पातळीवरील उत्कृष्ट लेखकांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, आध्यात्मिक विषयांवरील पुस्तकांची उपलब्धता उल्लेखनीय होती. नागपूर पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या वतीने संपूर्ण विदर्भातील विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये; तसेच ग्रंथालयांमध्ये 'पुस्तक परिक्रमा' करण्यात आली.

वाचन संस्कृतीविषयी अधिक जागृती करण्याच्या दृष्टीने निवडक पुस्तकांचा संग्रह असलेल्या बसने संपूर्ण विदर्भाची केलेली परिक्रमा हा नागपूर पुस्तक महोत्सवाचा एक अनोखा उपक्रम ठरला.

या सोहळ्याचा भाग असलेल्या झिरो माइल लिटरेचर फेस्टिवलमध्ये देशभरातील नामांकित लेखक, दिग्दर्शक आणि कथालेखक यांनी साहित्य आणि समकालीन विषयांवर विचारमंथन केले. युवा लेखक संवाद, लेखक मंच, विविध कार्यशाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचाही महोत्सवात समावेश करण्यात आला असल्याने तरुण महाविद्यालयीन युवा आवर्जून उपस्थित राहिले. त्याचबरोबर महाराष्ट्राची संस्कृती, कला आणि साहित्यासोबतच देशभक्ती व राष्ट्रीय भावना प्रदर्शित करणारे कार्यक्रम विविध राज्यांतून सादर केले गेले.

सोशल मीडियाच्या प्रभावाखाली जगणाऱ्या युगात निस्सीम राष्ट्रभक्ती जागवणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन या साहित्यिक सोहळ्याच्या निमित्ताने केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करणे गरजेचे वाटते. महोत्सवातील अत्यंत महत्त्वाची आणि अभिनव संकल्पना म्हणजे 'पोस्ट कार्ड पेंटिंग'चे भव्य प्रदर्शन. हे प्रदर्शन पाहताना महाराष्ट्रातील शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात वाचन संस्कृतीला नक्कीच चालना मिळेल, असा दृढ विश्वास मला वाटतो. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या चित्रकला महाविद्यालयांतील आणि शाळांमधील कला विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी पोस्ट कार्डवर आपल्या आवडत्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे पेंटिंग केले किंवा पुस्तकातील कथा/प्रसंग रंगवून आपल्या भावना व्यक्त केलेल्या दिसून आल्या. अशी प्रतिमांकन केलेली जवळपास दोन हजार पोस्ट कार्ड या ठिकाणी होती.

सर जेजे स्कूल ऑफ आर्ट, नागपूरचे शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, श्री कला महाविद्यालय, नटराज कला महाविद्यालय आणि महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसह अनेक कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे पोस्ट कार्ड्स प्रदर्शन महोत्सवात फार लोकप्रिय ठरले. या उपक्रमामुळे विद्यार्थी थेट पुस्तक महोत्सवाशी जोडले गेले, त्यांनी पुस्तकांचा आस्वाद घेतला आणि लाखो लोकांपर्यंत त्यांची चित्रकला




पोहोचवण्याची संधी त्यांना मिळाली.

महाराष्ट्र राज्याच्या कला संचालनालयाचा कला संचालक या नात्याने मी या उपक्रमाकडे पाहताना साहित्य आणि दृश्यकला यातील परस्परसंबंध विषद करणे महत्त्वाचे वाटते. साहित्य हे दृश्यकलेसाठी महत्त्वाचे आहे, कारण ते प्रेरणा आणि संदर्भाचा एक मोठा स्रोत प्रदान करते. दृश्यकला आणि साहित्य यांच्यातील हे सहसंबंध दोन्ही कला प्रकारांना मानवी अनुभव अधिक सखोल आणि सूक्ष्म मार्गांनी व्यक्त करण्यासाठी मदत करतात. साहित्य कलेला प्रेरणा देते आणि कला साहित्याला प्रेरणा देत असते. त्यामधून एक गतिमान बंध निर्माण होतात व एकमेकांना पूरक कलारूपे निर्माण होत जातात. विविध प्रादेशिक भाषांतील साहित्य वाचल्याने दृश्य कलावंतास वैविध्यपूर्ण सांस्कृती, रूढी, परंपरा, लोकजीवन, सामाजिक प्रश्न यांचा बोध होतो. त्यातून कलाप्रक्रियेची वैचारिक बैठक अधिक बळकट आणि समृद्ध होण्यास मदत होते. दृश्यकला आणि साहित्य हे दोन्ही सांस्कृतिक अभिव्यक्तीचे शक्तिशाली रूप असल्याने त्यांचे एकत्रित परीक्षण केल्यास संस्कृतीचा इतिहास, मूल्ये आणि सर्जनशीलता यांची समृद्ध समज कलावंताच्या अंगी वाढीस लागते.


महाराष्ट्रामध्ये दृश्यकलेच्या क्षेत्रात मराठी आणि इंग्रजी भाषेत समीक्षात्मक, परीक्षण, मूलभूत संशोधनात्मक; तसेच वैचारिक तथा चिंतनात्मक आणि ललित आदी प्रकारचे लिखाण अनेक मान्यवरांनी केले आहे. अनेक नामवंत चित्रकारांनी भाषा आणि साहित्य यांच्यावरील प्रभुत्व सिद्ध करून



दृश्यकलेवरील लिखाणास वैचारिक बैठक दिली आहे.

महाराष्ट्रातील कला विद्यार्थी, तरुण कलावंत आणि समाज यांच्या अभिरुचीसंपन्नतेचे ध्येय नजरेसमोर ठेवून कला संचालनालयाच्या प्रकाशन विभागाच्या माध्यमातून या सर्व चित्र शिल्पकारांचे साहित्य विचार पुस्तक किंवा ग्रंथरूपाने ग्रंथित करण्याचे नियोजित आहे. एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर नव्या अभ्यासक्रमावर आधारित पुस्तके आज सहज उपलब्ध नाहीत. ते लक्षात घेता महाराष्ट्रातील तज्ज्ञ कलाध्यापकांद्वारे रेखांकन आणि रंगकाम यामधील कौशल्य विकास, संकल्पना व रचना इत्यादी बाबींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना सुगमरीत्या करणाऱ्या पुस्तिकेची निर्मिती विचाराधीन आहे. त्याचबरोबर दृश्यकलेमध्ये चिंतनशील व संशोधनात्मक लेखनकार्य करणारे ज्येष्ठ आणि तरुण कलावंत यांचे साहित्य प्रकाशित करण्याबाबतचे धोरण तयार करण्याचे कार्य संचालनालायाच्या स्तरावर प्राधान्याने सुरू आहे.

या प्रदर्शनासाठी राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री चंद्रकांत दादा पाटील यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन पदोपदी मिळाले. या सोहळ्याचे आयोजक राष्ट्रीय पुस्तक न्यास (NBT), भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि झिरो माइल युथ फाउंडेशन यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा.



# शिक्षणातून महिला सक्षमीकरण : लाभार्थी विद्यार्थिनींशी हितगुज

राज्य शासनाने मुलींसाठी राबविलेली ट्युशन व परीक्षाशुल्क माफी योजना ही खऱ्या अर्थाने महिलांच्या सक्षमीकरणाकडे टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. अनेकदा घरची आर्थिक परिस्थिती कठीण असल्याने हुशार व गुणी मुलींना उच्च शिक्षण घेता येत नाही. अशा वेळी संपूर्ण शुल्कमाफीमुळे त्यांच्यासाठी व्यावसायिक शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले आहेत. या योजनेमुळे पालकांनाही दिलासा मिळतो, कारण आपल्या मुलीला उच्च शिक्षण देण्यासाठी मोठ्या कर्जाचा किंवा आर्थिक ताणाचा भार उचलावा लागत नाही. ग्रामीण भागातील, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींनाही याचा विशेष फायदा होतो. महिला सक्षमीकरण, उच्च शिक्षणात समता आणि व्यावसायिक क्षेत्रात स्त्रियांचा वाढता सहभाग या व्यापक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ही योजना परिणामकारक ठरत आहे. शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नाही, तर आत्मविश्वास, स्वावलंबन आणि समाजात आपले स्थान निर्माण करण्याची ताकद देणारे साधन आहे. ही योजना त्या दृष्टीने परिवर्तनाची नवी दिशा दाखवते. योजनेच्या माध्यमातून लाभ घेतलेल्या काही विद्यार्थिनींची मनोगतेच या उपक्रमाच्या यशाची खरी साक्ष आहेत.

# शिष्यवृत्तीमुळे उघडलेलं शिक्षणाचं दार



**प्राची शिरसाट**
के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक

मी प्राची रणजित शिरसाट, के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात एआयडीएस (AI&DS) विभागाच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. माझं सामाजिक आरक्षण ओबीसी (OBC) प्रवर्गात आहे. माझे वडील वाहनचालक म्हणून काम करतात आणि आई गृहिणी आहे. आमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खूपच मर्यादित आहे.

मी एक सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी आहे. आमचं घरचं उत्पन्न कमी असल्यामुळे शिक्षण पुढे सुरू ठेवणं हेच एक मोठं स्वप्न होतं. शाळेतून कॉलेजमध्ये प्रवेश घेताना फी, पुस्तके, वह्या यांचा खर्च आई-बाबांसाठी मोठं ओझं होतं. बऱ्याचदा मला वाटायचं की माझं शिक्षण अर्धवट राहील का? स्वप्नं अपुरी राहतील का?

पण या सगळ्या काळजीतून मला दिलासा मिळवून दिला तो सरकारी शिष्यवृत्तीने. कमी उत्पन्नाच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणारी ही योजना माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांसाठी एक मोठं वरदान आहे. अर्ज करताना मला खूप आशा वाटत होती आणि निकाल लागल्यावर आनंदाश्रू डोळ्यांत आले.

आता मला पुस्तकं विकत घेता येतात, फी भरता येते, अभ्यासासाठी लागणारं साहित्य घेता येतं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे माझ्या आई-बाबांच्या चेहऱ्यावरचा ताण कमी झाला आहे. त्यांच्या डोळ्यांतला आनंद बघून मला आणखी जोमाने शिकावसं वाटतं.

शिष्यवृत्तीमुळे मला आत्मविश्वास मिळाला आहे. आज मी निर्धास्तपणे म्हणू शकते की माझं शिक्षण कधीही थांबणार नाही. माझ्या मेहनतीने आणि या आधाराने मी समाजात स्वतःचं स्थान निर्माण करीन. उद्या जेव्हा मी सक्षम होईन, तेव्हा माझ्यासारख्या गरजू विद्यार्थ्यांना नक्की मदत करीन.

मी महाडीबीटी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज केला होता आणि मला ही शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे, याबद्दल मी आपल्या शासनाचे मनःपूर्वक आभार मानते. ही शिष्यवृत्ती मला शिक्षण सुरू ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे. शैक्षणिक फी, आवश्यक शिक्षणसामग्री आणि अन्य गरजांसाठी लागणारा खर्च ही शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे सुसह्य झाला आहे.

ही शिष्यवृत्ती मिळाली नसती, तर माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थिनीला उच्च शिक्षण घेणे कठीण झाले असते. त्यामुळेच आपल्या या योजनेमुळे माझ्या शिक्षणाचा मार्ग सुलभ झाला आहे आणि मी माझं करिअर घडवण्याच्या दिशेने निश्चिंतपणे वाटचाल करू शकते.

मी याबाबत महाराष्ट्र शासन व मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील साहेब (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांचे प्रति मनापासून आभार व्यक्त करते; तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिकारी व तंत्रशिक्षण संचालनालय यांचे अधिकारी वर्ग यांचेसुद्धा आभार मानते.

शेवटी एवढंच सांगावंसं वाटतं, शिक्षण हीच खरी ताकद आहे. शिष्यवृत्ती ही केवळ आर्थिक मदत नसून, ती स्वप्नांना पंख देणारी संधी आहे.

# उज्ज्वल भविष्याचा मार्ग



**अनुष्का देवकर**
संजीवनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोपरगाव

मी अनुष्का बाबासाहेब देवकर, मागील वर्षी संजीवनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कोपरगाव येथे कॉम्पुटर इंजिनीअरिंग या शाखेत प्रवेश घेतलेला होता.

घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, वडील शेतकरी आहेत. आई गृहिणी आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न कमी असल्यामुळे व्यावसायिक शिक्षण घेणे कठीण झाले असते. शासनाने घेतलेल्या 'मुलींसाठी मोफत शिक्षणाच्या निर्णया'मुळे मला अभियांत्रिकीसारख्या उच्च शिक्षणाचा लाभ घेता आला आहे. मी दहावीमध्ये ८४% गुण प्राप्त केले असून, त्यानंतर डिप्लोमा परीक्षेत ९२% गुण मिळवले. ही योजना नसती, तर महाविद्यालयाची फी भरता आली नसती व मला व्यावसायिक शिक्षण घेता आले नसते. यामुळे माझे करिअर आणि भविष्यातील नोकरी किंवा व्यवसायाच्या संधी मर्यादित राहिल्या असत्या.

या योजनेमुळे मला उत्तम शिक्षणाची संधी मिळाली आहे. भविष्यात उत्तम अभियंता होऊन कुटुंबाचे व समाजाचे ऋण फेडण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. गरीब मुली, शेतकऱ्यांच्या मुली व कामगारांच्या मुलींसाठी हा निर्णय खरंच वरदान ठरला आहे. या उपक्रमामुळे आमच्यासारख्या विद्यार्थिनींना उज्ज्वल भविष्यासाठी मार्ग खुला झाला.

# स्वप्न सत्यात आणणारी योजना

**सायमा बानो शेख अफजल**
मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन,
छत्रपती संभाजीनगर

मी सायमा बानो शेख अफजल , राहणार पेंशनपुरा, जालना. मी मौलाना आझाद शिक्षण संस्थेच्या, मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, रोजा बाग, छत्रपती संभाजीनगर येथे बी.एड. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी आहे. मी या वर्षी बी.एड. CET दिली होती; पण माझे वडील हयात नसल्याने व माझ्या घरची संपूर्ण जबाबदारी माझ्या भावावर असल्याने मी बी.एड. ला प्रवेश घेण्याचा विचार सोडला होता.

पण मी मराठवाडा कॉलेजला भेट दिली असता, admission counselling मध्ये मला समजले, की महाराष्ट्र शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींसाठी मोफत शिक्षण योजना सुरू केल्यामुळे मला कोणतेही शुल्क न भरता प्रवेश मिळणार आहे. शासनाच्या या योजनेचा फायदा घेत कोणतेही शुल्क न भरता मला बी. एड. ला प्रवेश मिळालेला आहे.

आज मी महाराष्ट्र शासनाच्या मुलींसाठीच्या संपूर्ण मोफत शिक्षणाच्या या योजनेमुळे माझे उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न साकार करत आहे. त्यासाठी मी शासनाचे, महाविद्यालयाचे व ही योजना प्रभावीरीत्या आमलात आणणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे खूप खूप आभार व्यक्त करू इच्छिते.

---


# अडचणीवर मात करायला शिकवणारी योजना

**साक्षी संजय गाडे**
माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

मी साक्षी संजय गाडे, बी. ए., एल. एल बी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी, राजश्री शाहू महाराजांच्या तत्वानी प्रेरित होऊन मुलीनं मोफत शिक्षण देण्याचा दूरदर्शी सरकारी निर्णयाबद्दल मनापासून कृतज्ञता आणि कौतुक व्यक्त करू इच्छिते. या प्रगतशील जीआरच्या अंमलबजावणीपूर्वी, आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीतील अनेक मुलींना, बहुतेकदा गरिबी आणि मर्यादित आर्थिक संसाधनांमुळे, दहावीच्या पुढे उच्च शिक्षण घेण्यापासून रोखणाऱ्या मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला. शिकवणी अभ्यास साहित्य आणि संबंधित खर्च परवडत नसल्याने असंख्य हुशार तरुणींना त्यांचे शिक्षण सोडावे लागले. ज्यामुळे शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले आणि संधी मर्यादित झाल्या.

आता मी चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षण घेऊ शकते. ज्या मुलींना पूर्वी शिक्षण सुरू ठेवण्याची कोणतेही सोय नव्हती, त्या आता महाविद्यालयीन शिक्षण घेऊ शकता आणि आर्थिक ताण सहन करू शकतात.

मी सरकारला नम्रपणे विनंती करते, की विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी ही योजना सुरू ठेवावी आणि ती बळकट करावी. आभारी आहे.



# ज्ञानवृक्षाच्या मुळाशी

भारतीय ज्ञानपद्धती ही केवळ भूतकाळाची कथा नाही, तर ती भविष्याचा नकाशा आहे. ऋषिमुनींच्या मनातून उमललेले सूत्रज्ञान, शास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नातून उभे राहिलेले विज्ञान आणि तत्त्वज्ञानातील विश्वदृष्टी या साऱ्याला आज 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' च्या माध्यमातून पुन्हा उजाळा दिला जात आहे. हा वारसा म्हणजे जी आपल्या तरुण पिढीला नवोन्मेष, चिंतन आणि प्रगतीची प्रेरणा देणारी विचारांची गंगा ठरणार आहे. या अंकातील 'भारतीय ज्ञानपद्धती' या विशेष विभागात आम्ही त्या गंगेचे काही थेंब वाचकांपर्यंत आणत आहोत.

## द्रष्टा ज्ञानयोगी : आचार्य वराहमिहिर

आचार्य वराहमिहिर हे केवळ एक शास्त्रज्ञ नव्हते, तर ते एक ज्ञानयोगी होते, ज्यांनी ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात आपला तेजस्वी ठसा उमटवला. त्यांचे संशोधन, त्यांची तर्कशुद्धता, विश्वाकडे पाहण्याचा त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवकल्याणाची त्यांची तळमळ, हा भारतीय ज्ञानपरंपरेचा अनमोल आणि चिरंतन ठेवा आहे.





**प्रा.संजय साहेबराव जगदाळे**

दहिवडी कॉलेज, दहिवडी

भारतीय ज्ञानपरंपरेचा विशाल पट हा केवळ हजारो वर्षांच्या कालखंडात पसरलेला नाही, तर अथांग चिंतन, अथक संशोधन आणि अलौकिक प्रज्ञेने विणलेला एक समृद्ध वारसा आहे. या ज्ञानरूपी पटावर असे असंख्य ज्ञानसूर्य तळपले, ज्यांनी केवळ भारताच्याच नाही, तर संपूर्ण मानवजातीच्या इतिहासाला आपल्या तेजाने प्रकाशित केले. याच तेजस्वी आणि गौरवशाली परंपरेतील एक देदीप्यमान नक्षत्र म्हणजे आचार्य वराहमिहिर. खगोलशास्त्र, गणित, भूगर्भशास्त्र, जलविज्ञान, वास्तुशास्त्र आणि पर्यावरण विज्ञान अशा अनेक ज्ञानशाखांमध्ये त्यांनी केलेले कार्य अचंबित करणारे आणि दूरदृष्टीचे प्रतीक आहे.

या द्रष्ट्या शास्त्रज्ञाच्या कार्याचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे, हे राष्ट्रीय कर्तव्य आहेच; पण समाजात वैज्ञानिक आणि सांस्कृतिक जाणीव रुजवण्यासाठी आवश्यक आहे.

इ.स. ५०६ मध्ये प्राचीन भारताच्या ज्ञानभूमी उज्जैनमध्ये जन्मलेल्या वराहमिहिरांना (मूळ नाव : मिहिर) ज्ञानाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून, म्हणजेच प्रकांड पंडित आदित्यदासांकडून मिळाला. बालपणी वेद, गणित आणि ज्योतिर्विज्ञानाचे बाळकडू घरातच मिळाल्याने त्यांची प्रतिभा लहान वयातच अंकुरित झाली आणि अल्पावधीतच तिचे तेज सर्वदूर पसरले. त्यांची ज्ञानाची तहान त्यांना एका ठिकाणी स्वस्थ बसू देईना. त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला. या प्रवासात त्यांनी तत्कालीन श्रेष्ठ विद्वानांकडून, गुरुजनांकडून विविध शास्त्रांचे सखोल ज्ञान आत्मसात केले, अनेक पंथांचे आणि परंपरांचे अध्ययन केले. महान गणितज्ञ आर्यभट्ट यांच्या क्रांतिकारी सिद्धान्तांचा त्यांच्यावर सखोल प्रभाव पडला आणि तो त्यांच्या पुढील संशोधनाला दिशादर्शक ठरला. वराहमिहिरांचे कार्य केवळ एकाच ज्ञानशाखेत मर्यादित नव्हते; ते खऱ्या अर्थाने 'पॉलिमॅथ' (Polymath), म्हणजेच अनेक विद्या आणि कलांमध्ये पारंगत असलेले प्रतिभावान व्यक्तिमत्त्व होते.

## १. अवकाशाचा वेध घेणारा भारतीय दृष्टिकोन

खगोलशास्त्राच्या क्षेत्रात वराहमिहिरांनी केलेले कार्य केवळ आकाशातील ग्रह-ताऱ्यांच्या निरीक्षणापुरते मर्यादित नव्हते, तर ते अत्यंत अचूक गणितीय सिद्धान्तांवर आधारलेले होते.

- **पृथ्वीचे भ्रमण आणि वैश्विक गती :** पृथ्वी गोल आहे आणि ती स्वतःभोवती फिरते, हा सिद्धान्त त्यांनी ठामपणे मांडला. आज हे ज्ञान सर्वमान्य असले, तरी त्यांच्या काळात हा एक क्रांतिकारी विचार होता; तसेच ग्रह-तारे स्वतःच्या निश्चित कक्षेत आणि गतीत भ्रमण करतात, हे त्यांनी गणितीय आणि निरीक्षणजन्य पुराव्यांसह सिद्ध केले.
- **ग्रहणांचे विज्ञान आणि अंधश्रद्धा निर्मूलन :** सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण यामागे कोणताही दैवी चमत्कार किंवा अशुभ शक्ती नसून, तो केवळ पृथ्वी आणि चंद्राच्या सावल्यांचा नैसर्गिक खेळ आहे, हे त्यांनी वैज्ञानिक दृष्टीने आणि गणितीय आधारावर सिद्ध केले. यामुळे समाजात पसरलेल्या अनेक अंधश्रद्धा आणि भीती दूर होण्यास मदत झाली.
- **त्रिकोणमितीचा पाया आणि प्रगती :** आजच्या गणितातील कोनाच्या विपरित बाजूची लांबी / कर्णाची लांबी (Sine), कोनाच्या समीप बाजूची लांबी / कर्णाची लांबी (Cosine) आणि कोनाच्या विपरीत बाजूची लांबी / कोनाच्या समीप बाजूची लांबी (Tangent) यांसारख्या त्रिकोणमितीय संकल्पनांना त्यांनी अधिक विकसित केले. त्यांनी या संकल्पनांचा उपयोग खगोलशास्त्रीय गणना अधिक अचूक करण्यासाठी केला, ज्यामुळे ग्रह-ताऱ्यांच्या स्थितीचे आणि गतीचे भाकीत करणे सोपे झाले. त्यांच्या कार्यामुळे भारतीय गणितशास्त्रज्ञांनी त्रिकोणमितीमध्ये जागतिक स्तरावर भरीव योगदान दिले हे स्पष्ट होते.
- **पंचांग सुधारणा आणि कालमापन :** नक्षत्र आणि ग्रहगतीच्या सूक्ष्म अभ्यासातून त्यांनी पंचांगरचनेला अधिक शास्त्रीय आणि अचूक आधार दिला. त्यांनी वेगवेगळ्या संवत्सरांची (वर्षे) रचना, महिन्यांची विभागणी आणि शुभ-अशुभ मुहूर्तांचे वैज्ञानिक विश्लेषण केले, ज्यामुळे कालमापन पद्धती अधिक विश्वसनीय बनली.

## २. भूगर्भशास्त्र आणि जलविज्ञान:

- **भूमीतील रहस्यांचे अनावरण**

वराहमिहिरांचे सर्वांत क्रांतिकारी आणि दूरदृष्टीचे कार्य म्हणजे भूगर्भशास्त्र आणि जलविज्ञानातील त्यांचे सखोल संशोधन. त्यांना 'भारताचे पहिले भूगर्भशास्त्रज्ञ' आणि 'जलतज्ज्ञ' म्हटले, तर ते थोडेही वावगे ठरणार नाही.

- **भूमिगत पाण्याचा शोध** (भूजल सर्वेक्षण) : जमिनीखालील पाण्याच्या स्रोतांचा (भूजल) शोध कसा घ्यावा, याचे शास्त्रीय निकष त्यांनी 'बृहत् संहिते'त सविस्तरपणे सांगितले आहेत. वाळा, अर्जुन वृक्ष अशा विशिष्ट प्रकारच्या वनस्पती, दगडांचे प्रकार आणि वारुळांच्या (मुंग्यांच्या वसाहती) अभ्यासातून पाणी कुठे लागेल, कोणत्या खोलीवर मिळेल, याचे अचूक मार्गदर्शन त्यांनी केले. त्यांचे हे ज्ञान आजही ग्रामीण भागात, विशेषतः दुष्काळग्रस्त भागांमध्ये, जलसंधारणासाठी आणि विहीर; तसेच बोअरवेल खोदण्यासाठी वापरले जाते, हे त्यांच्या ज्ञानाची चिरंतन उपयुक्तता दर्शवते.
- **भूकंपाचे विज्ञान आणि पृथ्वीची अंतर्गत रचना :** भूकंप का होतात आणि त्याचे जमिनीवर काय परिणाम होतात, यावर त्यांनी केलेले तात्त्विक आणि वैज्ञानिक विवेचन थक्क करणारे आहे. त्यांनी भूकंपाचे वर्गीकरण केले आणि पृथ्वीच्या अंतर्गत शक्तींच्या हालचालींमुळे भूकंप होतात, असे मांडले. त्यांच्या या विचारांमुळे आधुनिक भूगर्भशास्त्राचा पाया रचण्यास मदत झाली.

## ३. वास्तुशास्त्र आणि पर्यावरण: निसर्गाशी सुसंवादाचे विज्ञान

वराहमिहिरांनी वास्तुशास्त्र आणि पर्यावरणाचा मानवी जीवनाशी असलेला अतूट संबंधही स्पष्ट केला.

- **वास्तुकलेचे नियम आणि ऊर्जा संतुलन :** त्यांनी वास्तुकलेचे अत्यंत वैज्ञानिक आणि पर्यावरणपूरक नियम मांडले. यात नैसर्गिक ऊर्जा (सौरऊर्जा), प्रकाश आणि वाऱ्याचा योग्य वापर, वास्तूच्या दिशांचे महत्त्व, भूचुंबकीय क्षेत्राचा मानवी शरीरावर होणारा परिणाम आणि निरोगी जीवनासाठी आवश्यक असलेले सकारात्मक वातावरण कसे निर्माण करावे, याचा समावेश होता.
- **पर्यावरण संतुलन आणि हवामानशास्त्र :** हवामानातील बदल, पर्जन्यमानाचे चक्र, त्याचे शेती आणि समाजावरील परिणाम यावर त्यांनी केलेले संशोधन आजच्या हवामान बदलाच्या (Climate Change) जागतिक संकटातही मार्गदर्शक ठरते. त्यांनी पर्जन्यमानाचे भाकीत करण्यासाठी



अनेक नैसर्गिक संकेतांचा अभ्यास केला आणि त्या आधारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरण संतुलनाचे महत्त्व त्यांनी अनेक शतकांपूर्वीच ओळखले होते, हे त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे.

## ग्रंथसंपदा

आचार्य वराहमिहिरांनी आपले संशोधन केवळ मौखिक सिद्धान्तांपुरते मर्यादित न ठेवता, ते ग्रंथरूपात अजरामर केले. त्यांच्या तीन ग्रंथांमध्ये तत्कालीन ज्ञानाचा महासागर सामावलेला आहे.

- **बृहत् संहिता :** हा त्यांचा सर्वश्रेष्ठ आणि अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो, जो खऱ्या अर्थाने 'ज्ञानाचा महासागर' आहे. यात खगोलशास्त्र, फलज्योतिष, कृषी विज्ञान, जलव्यवस्थापन, वास्तुशास्त्र, पर्जन्यमान विज्ञान, रत्नपरीक्षा, शकुनशास्त्र, विवाहसंस्था, समाजशास्त्र, मूर्तिकला आणि यात्रा असे अनेक विषयांचे सखोल आणि विस्तृत विवेचन आहे.
- **पंचसिद्धान्तिका :** या ग्रंथात त्यांनी तत्कालीन भारतीय (पैतामह, रोमक, पौलिस, वसिष्ठ) आणि युनानी (ग्रीक) खगोलशास्त्रीय सिद्धान्तांचे तुलनात्मक विश्लेषण करून एक अद्भुत समन्वय साधला आहे. हे त्यांच्या ज्ञानाविषयीच्या खुल्या आणि जागतिक दृष्टिकोनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांनी केवळ भारतीय ज्ञानावरच अवलंबून न राहता, परदेशी ज्ञानाचाही आदरपूर्वक स्वीकार करून त्याचे विश्लेषण केले.
- **बृहज्जातक :** हा ग्रंथ ज्योतिषशास्त्रातील एक आधारस्तंभ मानला जातो. यात त्यांनी कुंडली विश्लेषणाची अत्यंत शास्त्रीय आणि तार्किक पद्धत मांडली. मानवी जीवनातील घटनांचा ग्रहांशी असलेला संबंध त्यांनी केवळ अंधश्रद्धेच्या पलीकडे जाऊन वैज्ञानिक दृष्टीने समजावून सांगितला.

आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या माध्यमातून आपण आपल्या बौद्धिक आणि सांस्कृतिक वारशाचे पुनर्मूल्यांकन करत आहोत. या पार्श्वभूमीवर, वराहमिहिरांसारख्या महान शास्त्रज्ञाचा अभ्यास केवळ ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर तो वर्तमान आणि भविष्यासाठीही एक स्पष्ट दिशादर्शक आहे.

- **आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन (Interdisciplinary Approach):** वराहमिहिरांनी गणित, खगोल, पर्यावरण, भूगर्भशास्त्र आणि समाजशास्त्र यांना एकमेकांशी अत्यंत प्रभावीपणे जोडले. आजच्या शिक्षणपद्धतीत नेमका हाच आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन अपेक्षित आहे, ज्यामुळे विद्यार्थी एकाच विषयापुरते मर्यादित न राहता, विविध ज्ञानशाखांना जोडून समग्र विचार करू शकतील.
- **वैज्ञानिक वृत्ती (Scientific Temper):** वराहमिहिरांनी प्रत्येक गोष्ट केवळ परंपरेच्या आधारावर स्वीकारली नाही, तर ती निरीक्षणाच्या आणि तर्काच्या कसोटीवर घासून पाहिली. हाच वैज्ञानिक दृष्टिकोन (Scientific Temper) विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करणे आणि तार्किक विचार करण्यास शिकवणे, हे आजच्या शिक्षणाचे मूलभूत ध्येय आहे.
- **परंपरेशी आधुनिकतेची सांगड :** वराहमिहिरांनी पाश्चिमात्य ज्ञानाचा (उदा. युनानी सिद्धान्त) अभ्यास केला; पण त्याचा विनियोग भारतीय संदर्भात आणि गरजेनुसार केला. जागतिकीकरणाच्या युगात आपली सांस्कृतिक मुळे घट्ट ठेवून जगातील नवनवीन ज्ञानाला कसे आत्मसात करावे आणि त्याचा उपयोग स्वतःच्या विकासासाठी कसा करावा, याचा हा सर्वोत्तम आदर्श आहे.

आचार्य वराहमिहिर हे केवळ एक शास्त्रज्ञ नव्हते, तर ते एक ज्ञानयोगी होते, ज्यांनी ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात आपला तेजस्वी ठसा उमटवला. त्यांचे संशोधन, त्यांची तर्कशुद्धता, विश्वाकडे पाहण्याचा त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवकल्याणाची त्यांची तळमळ, हा भारतीय ज्ञानपरंपरेचा अनमोल आणि चिरंतन ठेवा आहे. आज 'विकसित भारता'चे स्वप्न साकारताना, आपल्याला वराहमिहिरांसारख्या महापुरुषांच्या खांद्यावर उभे राहूनच भविष्याचा वेध घ्यावा लागेल. त्यांच्या ज्ञानदृष्टीचा अभ्यास करणे, त्याचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून नवीन शोध लावणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांची ज्ञानदृष्टी नव्या पिढीसाठी नक्कीच एक प्रेरणास्रोत ठरेल आणि त्यांना विज्ञान, संशोधन तथा भारतीय संस्कृतीच्या समृद्ध वारशाची ओळख करून देईल.

# डायरेक्टर स्पीक्स!

'डायरेक्टर स्पीक्स' या विशेष सदरातून उच्च व तंत्र शिक्षण विभागातील चारही संचालनालये आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांचे संचालक त्यांच्या दृष्टीकोनातून विचार मांडणार आहेत. शिक्षणक्षेत्रातील धोरणे, नवनवीन उपक्रम, आव्हाने आणि भविष्यातील दिशा याबद्दल त्यांचे अनुभव व मते जाणून घेणे हे या सदराचे वैशिष्ट्य आहे. थेट संचालकांच्या संवादातून वाचकांना विभागाच्या कार्यपद्धतीची जवळून ओळख होणार असून, शिक्षण क्षेत्रातील बदलत्या क्षितिजांची झलकही यातून मिळणार आहे.






**प्रा. शैलेन्द्र देवळाणकर,**

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

मुलाखत : **डॉ. मृदुला बेळे**


राज्याच्या उच्च शिक्षण व्यवस्थेला व्यापक दृष्टी देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणून डॉ. शैलेन्द्र देवळाणकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक म्हणून कार्यरत असताना त्यांनी धोरणात्मक स्पष्टता, संस्थात्मक सुधारणा आणि गुणवत्ताधिष्ठित शिक्षणाची ठाम भूमिका सातत्याने मांडली आहे. प्रशासकीय दायित्वांबरोबरच आंतरराष्ट्रीय घडामोडींचे सूक्ष्म अभ्यासक म्हणूनही त्यांची स्वतंत्र ओळख आहे. जागतिक राजकारण, भू-राजकीय घडामोडी आणि त्यांचा भारताच्या शिक्षणव्यवस्थेवर होणारा परिणाम यांचे सखोल विश्लेषण करणारे विचारवंत म्हणून ते अभ्यासक व वाचकांमध्ये ओळखले जातात. शिक्षणवेधसाठी संपादक डॉ. मृदुला बेळे यांनी घेतलेल्या या मुलाखतीत त्यांनी राज्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील सद्यस्थिती, आगामी दिशा आणि जागतिक संदर्भातील आव्हाने यांवर परखडपणे भाष्य केले आहे.

**प्रश्न : महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणाबाबत पुढील पाच वर्षांसाठी तुमची दृष्टी काय आहे?**

**प्रा. देवळाणकर :** विकसित भारत–२०४७ हा राष्ट्रीय विकासाचा आराखडा तयार झालेला असून, तो २०२९, २०३५ आणि २०४७ अशा तीन टप्प्यांमध्ये आखण्यात आला आहे. या संकल्पनेत उच्च शिक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा सहभाग आहे. त्यामुळे पुढील काळात उच्च शिक्षण विभागाला निर्णायक भूमिका पार पाडावी लागणार आहे. सध्या महाराष्ट्राचा एकूण नावनोंदणी गुणोत्तर (gross enrolment ratio) सुमारे ३५ टक्के आहे. ते पुढील काही वर्षांत ६० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे. हे उद्दिष्ट गाठायचे असेल, तर शैक्षणिक संस्थांचा गुणात्मक; तसेच संख्यात्मक विस्तार अपरिहार्य ठरतो.

दुसरे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे पारंपरिक शिक्षणात कौशल्यांचा सुसंगत अंतर्भाव करणे. विद्यार्थ्यांना अधिकाधिक कौशल्याधिष्ठित शिक्षण मिळावे, यासाठी उद्योगजगताशी समन्वय, Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP), इंटर्नशिप, कार्यस्थळी प्रशिक्षण यांवर विशेष भर दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थी स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे राहतील. आमचा स्पष्ट प्रयत्न आहे, की राज्यातील सर्व पदव्या व्यवहाराभिमुख असाव्यात.

तिसरे उद्दिष्ट शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचे आहे. या उद्दिष्टाचे दोन भाग आहेत. पहिला म्हणजे आपल्या विद्यापीठांचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षणसंस्थांच्या तोडीचा होईल, याची खात्री करणे. दुसरा म्हणजे जगभरातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, शिक्षणासाठी आकर्षित करणे. सध्या देशात सुमारे ५० हजार परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, त्यापैकी सुमारे ५ हजार विद्यार्थी महाराष्ट्रात आहेत. येत्या काळात ही संख्या वाढवणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

चौथे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय क्रमवारीत महाराष्ट्रातील विद्यापीठांचा क्रम पहिल्या २०० मध्ये आणणे. सध्या राज्यातील विद्यापीठे सुमारे ५०० ते ५५० या क्रमांकांच्या पट्ट्यात आहेत. त्यामध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने आम्ही काम करत आहोत. पाचवे प्राधान्य म्हणजे राष्ट्रीय संस्थात्मक गुणवत्ता क्रमवारीतील स्थान आणि राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेचे (NAAC) मानांकन सुधारणे.

महाराष्ट्रात एकूण १२२५ अनुदानित महाविद्यालये आहेत, त्यांपैकी केवळ ४१ महाविद्यालयांचे राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन बाकी आहे. मात्र, सुमारे २३०० विनाअनुदानित महाविद्यालयांपैकी केवळ ६५० महाविद्यालयांनीच हे मानांकन पूर्ण केले आहे. पुढील पाच वर्षांत १०० टक्के अनुदानित आणि किमान ९० टक्के विनाअनुदानित महाविद्यालये राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन प्राप्त करतील, याची दक्षता घेतली जाईल. सध्या राज्यात २११ स्वायत्त महाविद्यालये आहेत; ही संख्या वाढवण्याच्या दृष्टीनेही आम्ही प्रयत्नशील आहोत. एकूणच पुढील पाच वर्षांत उच्च शिक्षण क्षेत्रात संख्यात्मक; तसेच गुणवत्तात्मक वृद्धी साधण्याचा आमचा संकल्प आहे.

**प्रश्न : महाराष्ट्र ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी उच्च शिक्षण परिसंस्था आहे. या परिसंस्थेची बलस्थाने कोणती आणि तिच्यापुढील आव्हाने कोणती आहेत?**

**प्रा. देवळाणकर :** महाराष्ट्राला समृद्ध सांस्कृतिक आणि शैक्षणिक परंपरेचे अधिष्ठान लाभलेले आहे. राज्यातील समाजसुधारकांनी उभारलेल्या नामांकित संस्थांमुळे शिक्षणाची चळवळ राज्यभर पोहोचली. आज अगदी खेडोपाड्यांमध्येही दर्जेदार शैक्षणिक संस्था आहेत, हे आपले मोठे बलस्थान आहे. तीन विद्यापीठे स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत, ही बाबच आपल्या परंपरेची साक्ष देते. आज राज्यात सुमारे ६ हजार संस्था, ८४ विद्यापीठे आणि सुमारे ४२ लाख विद्यार्थी आहेत. हा प्रचंड विस्तार हीच आपली ताकद आहे.

मात्र, सर्वांत मोठे आव्हान म्हणजे उच्च शिक्षण अजूनही प्रामुख्याने सिद्धान्त प्रधान (theory-oriented ) आहे. ते अधिक व्यवहाराभिमुख (applied) आणि व्यावसायिक (professional) कसे करता येईल, हा आमच्यासमोरचा प्रमुख प्रश्न आहे. शिक्षणाचा थेट उपयोग रोजगारनिर्मितीसाठी व्हावा, यासाठी अभ्यासक्रमात मूलभूत बदल करणे आवश्यक आहे. बी.एड. आणि विधी अभ्यासक्रमांमध्ये रोजगाराच्या संधी तुलनेने अधिक स्पष्ट आहेत; मात्र कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांतील विद्यार्थ्यांसाठी अजूनही मर्यादा आहेत. प्राध्यापक होणे किंवा स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत जाणे, यापलीकडे विविध करिअर पर्याय निर्माण करणे हेच आमच्यासमोरचे सर्वांत मोठे आव्हान आहे.

**प्रश्न : राज्यात शैक्षणिक संस्थांची झपाट्याने वाढ होत असताना गुणवत्ता टिकवण्यासाठी व वाढवण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालय काय प्रयत्न करत आहे?**

**प्रा.देवळाणकर :** गुणवत्तेवर आमचा ठाम भर आहे. त्यामुळे सर्व महाविद्यालयांसाठी NAAC accreditation आम्ही अनिवार्य केले आहे. NAAC मूल्यांकन नसलेल्या संस्थांना नव्या विद्याशाखा, नवी महाविद्यालये किंवा वर्गवाढीची परवानगी दिली जाणार नाही. गरज भासल्यास विद्यापीठांनी अशा संस्थांची मान्यता रद्द करावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

याशिवाय राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण (NEP) सरसकट लागू करण्यात आले आहे. शिक्षकभरती हे गुणवत्तेसाठी महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. माझ्या कार्यकाळात २०२८ पदे भरली असून, सुमारे ५ हजार पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. State Institutional Ranking Council (SIRC), University Department Ranking System (UDRS), Professor of Practice योजना, महाज्ञान दीप पोर्टल, आणि डेटा डॅशबोर्ड या सगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून गुणवत्ता उंचावण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**प्रश्न : ग्रामीण भागातील, आदिवासी समाजातील आणि महिला वर्गातील जे प्रथम-पिढीतील शिक्षार्थी आहेत, त्यांच्या समस्या काही वेगळ्या प्रकारच्या असतात. त्यांचे निराकरण उच्च शिक्षण संचालनालय कसे करत आहे?**

**प्रा. देवळाणकर :** या संदर्भात दोन प्रमुख प्रकारच्या समस्या आहेत. पहिली समस्या म्हणजे शालेय शिक्षणातून उच्च शिक्षणात प्रवेश करताना मोठ्या प्रमाणावर होणारी शैक्षणिक गळती. शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी केवळ सुमारे २५ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकतात. ही गळती अगदी शालेय स्तरावरच सुरू होते. आठवी उत्तीर्ण झाल्यानंतर दहावीपर्यंत शिक्षणच न पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही लक्षणीय आहे. शैक्षणिक गळतीचा पहिला टप्पा दहावीनंतर आणि दुसरा टप्पा बारावीनंतर दिसून येतो.

या गळतीमागे दोन प्रमुख कारणे आम्हाला आढळली आहेत. पहिले म्हणजे शिक्षणव्यवस्थेबद्दल असलेला अविश्वास- 'शिकून तरी नक्की काय मिळणार?' ही मानसिकता आणि दुसरे कारण म्हणजे आर्थिक मर्यादा. या समस्यांवर उपाय म्हणून आम्ही स्कूल कनेक्ट ही योजना राबवली. या योजनेच्या माध्यमातून महाविद्यालये आणि विद्यापीठे थेट शाळकरी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. कोणत्या अभ्यासक्रमासाठी कोणत्या शिष्यवृत्ती उपलब्ध आहेत; तसेच नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शिक्षण अधिक कौशल्याधिष्ठित कसे होत आहे, याची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संवादातून देण्यात आली. या उपक्रमाद्वारे ग्रामीण आणि शहरी भागातील सुमारे नऊ लाख विद्यार्थ्यांशी संवाद साधणे शक्य झाले.

दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे मुलींना मोफत शिक्षण देण्याची योजना. मुलींचे परीक्षा शुल्क आणि शिक्षण शुल्क आम्ही माफ केले आहे. या निर्णयाचा परिणाम म्हणून उच्च आणि तांत्रिक शिक्षण या दोन्ही क्षेत्रांमध्ये मुलींच्या सहभागात लक्षणीय वाढ झाली आहे. सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे प्रवेश होणाऱ्या बी.एड. आणि विधी अभ्यासक्रमांमध्ये तब्बल ४७ हजारांनी मुलींची संख्या वाढली आहे. याशिवाय, ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांच्या पाल्यांना शिक्षण शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात येते. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींतील विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत दिले जाते. या सर्व योजनांचा प्रथम-पिढीतील शिक्षार्थ्यांवर अत्यंत सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो.

**प्रश्न : प्राध्यापकांची गुणवत्ता वाढावी, त्यांना नवे विषय आत्मसात करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी उच्च शिक्षण संचालनालय कोणते प्रयत्न करत आहे?**

**प्रा. देवळाणकर :** महाराष्ट्रात प्राध्यापकांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी ही कायमस्वरूपी संस्था स्थापन करण्यात आली आहे. अशा प्रकारची संस्था उभारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. याशिवाय राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये प्राध्यापक प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून सातत्याने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.

नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात सर्व विद्यापीठांतील प्राध्यापकांना मार्गदर्शन करता यावे, यासाठीही विविध प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या माध्यमातून अध्यापन पद्धतींमध्ये मूलभूत बदल घडवून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**प्रश्न : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारतीय शिक्षणव्यवस्थेतील मूलभूत परिवर्तन मानले जाते. या बदलासाठी महाराष्ट्र खरोखर तयार आहे का?**

**प्रा. देवळाणकर :** शिक्षण हा विषय भारताच्या संविधानातील समवर्ती सूचीतील आहे. त्यामुळे केंद्र सरकार कोणतेही धोरण राज्यांवर सक्तीने लागू करू शकत नाही. असे असतानाही महाराष्ट्राने नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारले—तेही केवळ औपचारिकतेपुरते नव्हे.

सन २०२३–२४ मध्ये हे धोरण सरसकट राबवण्याआधी तब्बल तीन वर्षे त्याची सखोल तयारी करण्यात आली. पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबलाची स्थापना करण्यात आली; तसेच पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समिती गठित करण्यात आली. २०२३–२४ मध्ये प्रथम स्वायत्त महाविद्यालये, विद्यापीठांची परिसरे आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम यांच्यासाठी हे धोरण अंमलात आणण्यात आले. त्या अनुभवांतून आणि व्यापक चर्चांतून घेतलेले धडे लक्षात घेऊन आवश्यक बदल करत सन २०२४–२५ पासून हे धोरण सर्वत्र लागू करण्यात आले. धोरणाचा गाभा समजून घेत त्याची अंमलबजावणी झाली आहे, असे मी नक्कीच म्हणेन.

**प्रश्न : कोव्हिडनंतर शिक्षणक्षेत्रात डिजिटल शिक्षण, मिश्र अध्यापनपद्धती यांचा वापर वाढला आहे. मात्र, महाराष्ट्राच्या अनेक भागांत अजूनही विद्यार्थ्यांना संगणक वा इंटरनेट उपलब्ध नाही. या संदर्भात उच्च शिक्षण संचालनालय काय करत आहे?**

**प्रा. देवळाणकर :** कोव्हिडनंतर शिक्षणक्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढणे ही काळाची गरज ठरली आहे. मात्र, राज्यातील भौगोलिक आणि सामाजिक विषमता लक्षात घेता सर्वत्र समान सुविधा उपलब्ध आहेत, असे म्हणता येणार नाही. ही वस्तुस्थिती आम्ही स्वीकारली आहे. त्यामुळे डिजिटल शिक्षणाकडे जाताना 'सर्वांसाठी समान संधी' हा मूलभूत विचार केंद्रस्थानी ठेवला आहे.

राज्यातील अनेक दूरस्थ भागांमध्ये विद्यार्थ्यांना अद्याप संगणक, स्मार्टफोन किंवा स्थिर इंटरनेट सेवा उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत केवळ ऑनलाइन शिक्षणावर अवलंबून राहणे योग्य नाही. म्हणूनच आम्ही मिश्र अध्यापनपद्धती स्वीकारली आहे, ज्यामध्ये प्रत्यक्ष वर्गशिक्षण आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण यांचा समन्वय

साधला जातो. महा-ज्ञानदीप या डिजिटल वेदिकेच्या माध्यमातून अभ्याससाहित्य, व्याख्याने आणि शैक्षणिक संदर्भ उपलब्ध करून देण्यात येत आहेत; तसेच शासकीय व स्थानिक पातळीवर इंटरनेट सुविधा वाढवण्यासाठी संबंधित विभागांशी सातत्याने समन्वय साधला जात आहे.

### प्रश्न : उच्च शिक्षण संचालक म्हणून तुमच्या कारकिर्दीतील सर्वांत समाधानकारक आणि सर्वांत आव्हानात्मक बाब कोणती वाटते?

**प्रा. देवळाणकर :** माझ्या कार्यकाळातील सर्वांत समाधानकारक बाब म्हणजे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी. १९८६ पासून सुरू असलेल्या शिक्षणपद्धतीत या धोरणामुळे मूलभूत बदल घडून आला. दुसरी अत्यंत समाधान देणारी बाब म्हणजे उच्च शिक्षण संचालनालयाचे स्वतंत्र आणि सुसज्ज कार्यालय सुरू झाले. हे राज्याचे उच्च शिक्षण या विषयाचे मुख्यालय आहे, आणि त्या प्रतिष्ठेला शोभेल अशा इमारतीत संचालनालयाचे कामकाज सुरू झाले, हे माझ्यासाठी महत्त्वाचे यश आहे.

याशिवाय, राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन प्रक्रियेत देशभरात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला, ही बाब विशेष समाधान देणारी आहे. या सर्व यशांमागे माननीय मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांची भक्कम साथ आणि त्यांच्या दाखवलेल्या विश्वासाची मी नम्रपणे दखल घेतो.

सर्वांत मोठे आव्हान कोणते असेल, तर ते विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचे आहे. उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची अपेक्षा केवळ पूर्ण वेळ सरकारी नोकरीपुरती मर्यादित असते. हा दृष्टिकोन बदलून त्यांना नव्या उद्योगधंद्यांकडे, विविध व्यावसायिक संधींकडे वळवणे हेच आमच्यासमोरचे सर्वांत मोठे आव्हान आहे.

### प्रश्न : शिक्षणक्षेत्रात नव्याने प्रवेश केलेले तरुण प्राध्यापक आणि शैक्षणिक नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांना तुम्ही काय सल्ला द्याल?

**प्रा. देवळाणकर :** शिक्षण ही देशाची सॉफ्ट पॉवर आहे. भारतातील शिक्षणक्षेत्राची आर्थिक उलाढाल सुमारे २७२ अब्ज अमेरिकी डॉलर इतकी आहे, त्यापैकी उच्च शिक्षण क्षेत्राचे मूल्य सुमारे ७४ अब्ज अमेरिकी डॉलर आहे. इतकी विशाल शैक्षणिक व्यवस्था जगात अन्यत्र कुठेही दिसून येत नाही. आपली शैक्षणिक गुणवत्ता सक्षम आहे; मात्र समाजात आपल्या पाल्याला परदेशात शिक्षणासाठी पाठवण्याची चढाओढ सुरू आहे. या मानसिकतेत बदल घडवणे, हे नव्या पिढीच्या शैक्षणिक नेतृत्वाने केले पाहिजे.

भारतीय इतिहास, संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचे सखोल अध्ययन करून समाज अधिक बळकट करणे आवश्यक आहे. प्रत्येक बाबतीत पश्चिमेकडे पाहण्याऐवजी पूर्वेकडील दृष्टिकोनही स्वीकारला पाहिजे. तरुणांनी देश सोडून जाण्याऐवजी देशातच राहून आपल्या ज्ञान आणि कौशल्याच्या बळावर राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे.

### प्रश्न : एक प्राध्यापक, जागतिक घडामोडींचे अभ्यासक आणि शैक्षणिक नियोजक म्हणून तुमच्या वाटचालीकडे तुम्ही कसे पाहता?

**प्रा. देवळाणकर :** मी मराठवाड्यातील एका शेतकरी कुटुंबातून आलेला विद्यार्थी आहे. अशा पार्श्वभूमीतून आलेल्या व्यक्तीला राज्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च प्रशासकीय पदावर काम करण्याची संधी मिळणे, हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. माननीय मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

हे पद केवळ प्रशासकीय नाही, तर राज्याच्या शैक्षणिक दिशानिर्देशनाचे आहे. माझ्या मनात असलेल्या शैक्षणिक प्रयोगांना प्रत्यक्षात आणण्याची मोकळीक मला मिळाली. तरुणांच्या आयुष्यात गुणात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे जे स्वप्न मी पाहिले होते, ते प्रत्यक्षात उतरण्याची संधी मला या भूमिकेमुळे लाभली.

### प्रश्न : आंतरराष्ट्रीय संबंधांवरील तुमचा अभ्यास आणि उच्च शिक्षण संचालनालयातील प्रशासकीय जबाबदाऱ्या- या दोन्हींचा समतोल तुम्ही कसा साधता?

**प्रा. देवळाणकर :** प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडत असतानाही माझा शैक्षणिक कल जपण्याचा मी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. त्यासाठी माझ्या दिवसाची आखणी अतिशय शिस्तबद्ध असते. माझा दिवस सकाळी पाच वाजता सुरू होतो. सकाळी पाच ते आठ हा काळ माझ्या वाचन, लेखन आणि अभ्यासासाठी राखीव असतो. या अभ्यासामुळे दिवसभराच्या प्रशासकीय कामासाठी आवश्यक ऊर्जाच मला मिळते. आठ वाजल्यानंतरचा संपूर्ण वेळ प्रशासकीय जबाबदाऱ्यांसाठी दिला जातो.


### प्रश्न : हे सर्व कसे जमवता?


**प्रा. देवळाणकर :** मनात एखादे कार्य करण्याची प्रबळ इच्छा असेल, तर त्यासाठीचा मार्ग निश्चित सापडतो. शिक्षणक्षेत्रातील प्रशासकांनी प्रशासनात गुंतलेले असले, तरी आपल्या अध्ययन व अध्यापनाशी तडजोड करता कामा नये. तेच आपल्या कार्याचा पाया असतो. मी जरी शिक्षण प्रशासनात सक्रिय असलो, तरी माझे मूलभूत स्थान अध्यापकाचेच आहे, हे मी कधी विसरत नाही.

अर्थात, या वाटचालीत अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो. कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार यांच्यासाठी वेळ कमी मिळतो; कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहणे अनेकदा शक्य होत नाही; पण राज्याच्या शिक्षण क्षेत्राला दिशा देण्याचे अत्यंत पवित्र कार्य करत असल्याची जाणीव मनाला अपार समाधान देऊन जाते.

# दीपस्तंभ

आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि समाजाला प्रेरणा देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या अनुभवांतून शिकणे ही खरी संपत्ती आहे. म्हणूनच या त्रैमासिकात आम्ही एक विशेष सदर सुरू करत आहोत—'दीपस्तंभ.' या सदरात अशा व्यक्तींच्या मुलाखती सादर केल्या जातील, ज्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात अपूर्व कामगिरी केली आहे, नेतृत्वाची नवी परिभाषा निर्माण केली आहे आणि ज्यांचे आयुष्यच एक प्रेरणागाथा आहे. त्यांच्या विचारांमधून आणि जीवनप्रवासातून वाचकांना केवळ व्यावसायिकच नाही, तर वैयक्तिक आयुष्याच्याही अनेक मौल्यवान शिकवणी मिळतील. हे सदर म्हणजे यश, संघर्ष, तत्त्वनिष्ठा आणि नेतृत्व यांचे मार्गदर्शन करत वाट दाखवणारा एक दीपस्तंभ ठरेल.






**पद्मविभूषण**
**डॉ. रघुनाथ माशेलकर**
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

मुलाखत : **डॉ. मृदुला बेळे**


# इतिहास घडवायचा असेल तर...

तुम्ही चाललात तर रस्ता तयार होतो, तुम्ही धावलात तर इतिहास लिहिला जातो. त्यासाठी मोठी स्वप्ने बघणे आणि आपल्या मर्यादांना आव्हान देणे फार गरजेचे आहे.

भारताच्या विज्ञान, नवोन्मेष, संशोधन आणि धोरणनिर्मितीच्या प्रवासात डॉ. रघुनाथ माशेलकर हे एक तेजस्वी प्रेरणास्तंभ आहेत. वैज्ञानिक म्हणून असो वा प्रशासकीय नेतृत्वात, संस्थाबांधणीमध्ये असो वा जागतिक पातळीवर भारताची भूमिका अधिक सशक्त करण्याचे प्रयत्न, त्यांचे योगदान व्यापक, दूरदृष्टीपूर्ण आणि पिढ्यान् पिढ्यांना दिशा देणारे आहे. आधुनिक भारतातील नवोन्मेषाचे स्वरूप घडवताना त्यांनी मांडलेली मूल्ये, विज्ञाननिष्ठ दृष्टी आणि सर्वसमावेशक

विचार हे आजही देशातील संशोधकांसाठी दीपस्तंभासारखे आहेत. अशा या द्रष्ट्या व्यक्तीशी संवाद साधण्याची संधी मिळणे हा आमच्या त्रैमासिकासाठी मोठा सन्मानच आहे. त्यांच्या विचारांमुळे विद्यार्थी, संशोधक, उद्योजक आणि शिक्षक या सर्वांना प्रेरणा मिळेल, या विश्वासाने आम्ही ही मुलाखत आपल्या समोर सादर करत आहोत.

### प्रश्न : शिक्षणाने ज्ञानातून मूल्यनिर्मितीकडे गेले पाहिजे, असे आपण नेहमी म्हणता. या पार्श्वभूमीवर २१व्या शतकातील भारतीय उच्च शिक्षणाचा उद्देश काय?

**डॉ. माशेलकर :** २१वे शतक हे 'ज्ञानाचे शतक' आहे; पण केवळ ज्ञान असणे पुरेसे नाही, ज्ञानाने मूल्यनिर्मिती करायला हवी. म्हणूनच मी नेहमी म्हणतो, 'माइंड्स टू मार्केट'- ज्ञान प्रयोगशाळेत सुरू होऊन समाजापर्यंत पोहोचले पाहिजे. उच्च शिक्षणाचा उद्देश तीन गोष्टींमध्ये एकत्रित दिसायला हवा : ज्ञाननिर्मिती, नवप्रवर्तननिर्मिती आणि मूल्यनिर्मिती. भारताकडे जगातील सर्वांत मोठी युवा-शक्ती आहे; ती फक्त नोकऱ्या शोधणारी न राहता नोकऱ्या निर्माण करणारी झाली, तर भारत ज्ञान-संपन्न राष्ट्र बनू शकतो.

### प्रश्न : आपण नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या कार्यबल गटाचे अध्यक्ष आहात. या धोरणापुढे असलेल्या सबळ संधी आणि चिंताजनक आव्हाने कोणती?

**डॉ. माशेलकर :** NEP २०२० हे धोरण महाराष्ट्रासाठी अमर्याद संधी देणारे आहे. बहुविद्याशाखीय शिक्षण, लवचिकता, क्रेडिट मोबिलिटी, कौशल्याचा मुख्य प्रवाहात समावेश आणि जागतिक दर्जाच्या संशोधन विद्यापीठांची निर्मिती ही झाली त्यातील संधींची बाजू; पण आव्हानेही तितकीच गंभीर आहेत- शैक्षणिक संस्थांची क्षमता-वृद्धी, शिक्षकांचे सतत कौशल्य-अद्ययावत करणं, प्रशासनातील अनावश्यक गुंतागुंत दूर करणे आणि गुणवत्तेचा समान स्तर राखणे. संधी मोठ्या आहेत; परंतु त्या साधण्यासाठी धैर्य, दृष्टी आणि अनुशासन आवश्यक आहे आणि मला सांगायला आनंद वाटतो, की दादा म्हणजे ना चंद्रकांत दादा पाटील हे काम जोमाने करत आहेत.

### प्रश्न : विज्ञान आणि समाजाच्या गरजा यांची प्रभावी सांगड कशी घालावी?

**डॉ. माशेलकर :** विज्ञान हे समाजासाठीच असते हे तत्त्व विसरून चालणार नाही. आरोग्य, पाणी, ऊर्जा, शेती, हवामान या क्षेत्रांत भारतात प्रचंड गरजा आहेत आणि त्या वैज्ञानिक नवप्रवर्तनानेच पूर्ण होणार आहेत. प्रयोगशाळा आणि लोकशाळा यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी 'मिशन-मोड' संशोधन आवश्यक आहे. सामाजिक प्रभाव हा संशोधनाचा अंतिम मापदंड असायला हवा. जे संशोधन जीव वाचवतं, श्रम वाचवतं, संसाधन वाचवतं, तेच खरे परिवर्तन घडवते.

### प्रश्न : सर्वसमावेशक नवनिर्माण म्हणजेच Inclusive Innovation याचा आपण गेली अनेक वर्षे ध्यास घेतला आहे. त्याविषयी थोडे सांगा.

**डॉ. माशेलकर :** या विषयावर मी व सुशील बोर्डे यांनी मिळून एक पुस्तक लिहिले आहे, त्याचे नाव आहे More from Less for More: Innovation Holy Grail. चंद्रकांत दादा पाटील यांना ते पुस्तक मी भेट दिले आहे. त्यात लिहिलेली सर्वसमावेशक नवनिर्मितीची प्रत्यक्ष उदाहरणे पाहून ते भारावून गेले. त्यातील काही प्रमुख उदाहरणे मी सांगतो.

अंजनी माशेलकर फाउंडेशनने गेल्या अनेक वर्षांत 'परवडणारी उत्कृष्टता' (Affordable Excellence) हा केवळ विचार नाही, तर सामाजिक परिवर्तनाचा शक्तिशाली मार्ग म्हणून साकारला आहे. 'उत्पन्नातील प्रचंड विषमता असली, तरी संधी आणि सेवांमध्ये प्रवेश-समानता (Access Equality despite Income Inequality)' हा फाउंडेशनचा मुख्य ध्यास आहे. उच्च तंत्रज्ञान हे काही निवडकांच्या हातातील विशेषाधिकार न राहता, सर्वांच्या आयुष्यातील समान हक्क बनले पाहिजे हा विश्वास फाउंडेशनच्या प्रत्येक कृतीत ठामपणे दिसतो. म्हणूनच ज्या नवकल्पना गरीब, वंचित, आणि अंतिम टोकावरच्या नागरिकांसाठी तंत्रज्ञानाची शक्ती आणतात त्यांना फाउंडेशनने सतत प्रोत्साहन दिले आहे. उदाहरणार्थ, Agatsa चे परवडणारे, हातात मावणारे ECG उपकरण ज्यामुळे गावातील सामान्य व्यक्ती घरच्या घरी हृदयविकाराचे निदान करू शकते. EzeRex हे सुई न टोचता रक्तातील हिमोग्लोबिन मोजणारे उपकरण आहे. ईजी टच या उपकरणाने सुईदेखील न टोचता रक्तातील साखर कळते. वापरायला अगदी साधे, सोपे, खिशात मावणारे आणि अगदी अचूकपणे ग्लुकोज मॉनिटरिंग आणि ट्रॅकिंग करणारे हे उपकरण डायबेटिस रुग्णांसाठी वरदान ठरेल. इतर वेळेला रक्त तपासणीसाठी जितका खर्च येतो त्याच्या एक शंभरांश खर्चात म्हणजे अगदी किरकोळ (२५ पैशांत) खर्चात हे उपकरण रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण अचूकपणे मोजते.

### प्रश्न : वेगवान नवप्रवर्तनात नैतिकतेचे स्थान

**डॉ. माशेलकर :** आज नवप्रवर्तनाचा वेग अपूर्व आहे; परंतु वेगामुळे दिशा हरवली, तर प्रगती विनाशकारीही ठरू शकते. म्हणूनच मी नेहमी म्हणतो, 'नवप्रवर्तन होईल वेगवान; पण मूल्ये राहिली पाहिजेत अढळ.' AI, जनुकीय संपादन, डिजिटल प्लॅटफॉर्म्स या सर्व क्षेत्रांत नवप्रवर्तनाबरोबर नैतिक उत्तरदायित्व अनिवार्य आहे. समाजाच्या विश्वासाशिवाय तंत्रज्ञानाची स्वीकृती होत नाही; म्हणून नवप्रवर्तनात 'सामाजिक विश्वास' हेच मोठे भांडवल बनणार आहे.

### प्रश्न : बौद्धिक संपदा आणि सार्वजनिक हित यातील समतोल रखण्यात भारत यशस्वी झाला आहे, असे तुम्हाला वाटते का?

**डॉ. माशेलकर :** मी नेहमी 'जय ज्ञानाचा आणि जय जनाचा' असा समतोल मागतो. बौद्धिक संपदा नवप्रवर्तनाला चालना देण्यासाठी आवश्यक आहे; पण आरोग्य आणि आवश्यक तंत्रज्ञानात

लोकांच्या हक्कांकडे पाठ फिरवता येणार नाही. भारताने OSDD (Open Source Drug Discovery), जनरिक्स, TRIPS लवचिकता या सर्वांचा जगात सर्वांत प्रभावी वापर केला आहे. पुढे जाऊन आपल्याला 'IP for Public Good' या मॉडेलकडे चालावे लागेल, जेथे नवप्रवर्तन टिकेल आणि सामूहिक हितही सुरक्षित राहील.

**प्रश्न : भारतात संशोधनाचे रूपांतर उत्पादांमध्ये होण्याचे प्रमाण कमी आहे. ते वाढावे म्हणून काय बदल हवेत?**


**डॉ. माशेलकर :** भारताकडे प्रतिभा आहे, संशोधन आहे- पण 'लॅब टू मार्केट'ची दरी अजून रुंद आहे. हे बदलण्यासाठी तीन गोष्टी अनिवार्य आहेत :

१. संशोधन विद्यापीठ–उद्योग–स्टार्टअप्स यांचे त्रिकोणी नाते संस्थात्मक रूपात बांधणे.
२. प्रत्येक विद्यापीठात तंत्रज्ञान हस्तांतरण कार्यालये (TTOs) सक्षम करणे.
३. शोधनिबंध प्रकाशित करण्याबरोबरच 'पेटंट–प्रॉडक्ट–प्रॉस्पर' ही संस्कृती प्रस्थापित करणे.

जगाचे नेतृत्व करण्यासाठी भारताला 'इन्व्होवेशन इकोसिस्टिम' मजबूत करावीच लागेल. त्यासाठी संशोधक मनोभूमिका तयार करण्याबरोबरच बौद्धिक संपदांचे आणि विशेषतः पेटंट्सचे संशोधांनातील महत्त्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे.

**प्रश्न : नवप्रवर्तक घडवणाऱ्या शिक्षकांची भूमिका**

**डॉ. माशेलकर :** शिक्षकांचे काम फक्त शिकवणे नाही—ते शोधाची ज्योत पेटवणे आहे. प्रश्न विचारण्याची हिंमत, जिज्ञासा टिकवणे, अपयशातून शिकणे—ही शिकवण शिक्षकांनी द्यायची. आजचे शिक्षक 'सह-निर्माते' झाले पाहिजेत—विद्यार्थ्यांबरोबर संशोधन करणारे, स्टार्टअप्समध्ये मार्गदर्शक भूमिका करणारे आणि प्रयोगशीलता जपणारे. भारताचे भविष्य शिक्षकांच्या हातात आहे. शिक्षकांच्या अंतःकरणात उजेड असेल, तर




राष्ट्र स्वतः उजळेल.

**प्रश्न : आजच्या काळातील शिक्षण–विज्ञान नेतृत्व करणाऱ्यांसाठी कोणते गुण आवश्यक आहेत असे तुम्हाला वाटते?**

**डॉ. माशेलकर :** आज नेतृत्वाला चार गोष्टींची गरज आहे.

- दूरदृष्टी (Vision) – उद्याचे जग आज पाहण्याची क्षमता.
- धैर्य (Courage) – अवघड निर्णय घेण्याची ताकद.
- प्रामाणिकपणा (Integrity) – नीतिमूल्ये न ढळणारे.
- समावेशकता (Inclusion) – सर्वांना घेऊन जाण्याची वृत्ती.

धोरणे बदलू शकतात, योजना बदलू शकतात; पण नेतृत्वाचे चार स्तंभ कधीच बदलत नाहीत.

**प्रश्न : एक कुठला निर्णायक बदल केला, तर भारत ज्ञानसमृद्ध राष्ट्र होईल असे तुम्हाला वाटते?**

**डॉ. माशेलकर :** सर्वांत मोठा बदल म्हणजे देशात 'Research First' अशी संस्कृती निर्माण करणे.

शाळांपासून विद्यापीठांपर्यंत- उत्सुकता, शोध, प्रयोग, ॲक्शन- या गोष्टी शिक्षणाच्या केंद्रस्थानी आल्या, तर भारत जगातील 'ज्ञानगुरू' म्हणून उभारी घेईल. संशोधनात गुंतवणूक म्हणजे राष्ट्राच्या भविष्यावर गुंतवणूक.

**प्रश्न : महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी आपला संदेश कुठला?**

**डॉ. माशेलकर :** महाराष्ट्र ही ज्ञानभूमी आहे, कार्यानुभवाची भूमी आहे. ज्ञान मिळवणे महत्त्वाचे आहे; पण ज्ञानातून मूल्यनिर्मिती करणे अजून महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना मी सांगतो, जिज्ञासू राहा, धैर्यवान राहा आणि नवे मार्ग तयार करा. शिक्षकांना माझा नम्र संदेश - उत्सुकतेला पंख द्या आणि विद्यार्थ्यांना 'फक्त पदवीधर नव्हे, नवप्रवर्तक' बनवा.

आपण सर्व मिळून महाराष्ट्राला ज्ञान, नवप्रवर्तन आणि मूल्याधिष्ठित भविष्यात नेऊ शकतो आणि नेणारच.

**प्रश्न : तरुण पिढीवर आपले पाच माशेलकर मंत्र आपण नेहमी सांगता. ते कोणते ?**

**डॉ. माशेलकर :**

**पहिला मंत्र :** आकांक्षा म्हणजे अपार शक्यता
तुमची स्वप्नं लहान ठेवू नका!
आकांक्षा म्हणजे तुमची उंच भरारी. त्या उंच ठेवा- केवळ स्वतःसाठी नव्हे, तर आपल्या प्रिय भारतासाठीही. कारण तुम्ही उठलात, तर भारत उभा राहतो.

**दुसरा मंत्र :** इंस्टंट कॉफी असते, इंस्टंट यश नसते
आजच्या जगात सगळं जलद हवं असतं; पण यश असं झटपट मिळत नाही.
शांतपणे काम करा.
तुमच्या परिश्रमांचा आवाज तुम्ही करू नका-तो यशाला करू द्या.
यश जेव्हा बोलतं, तेव्हा जग शांत होतं आणि ऐकायला लागतं.

**तिसरा मंत्र :** जिद्द, चिकाटी आणि ध्येय- हीच खरी त्रिवेणी
लवकर हार मानू नका—खूपच लवकर हार मानतो आपण.
पण लक्षात ठेवा—
जिंकणारे कधी हार मानत नाहीत आणि
हार मानणारे कधी जिंकत नाहीत.
आणखी एक गोष्ट—
FAIL म्हणजे First Attempt In Learning.
अपयश म्हणजे शिक्षणाची पहिली संधी.

**चौथा मंत्र :** संधीची दारे बंद झाली? काही हरकत नाही!
कधी कधी जग तुम्हाला दार बंद करून दाखवतं.
पण तुम्ही थांबू नका.
ठोठावा... पुन्हा ठोठावा...
तरीही दार न उघडलं, तर?
नवा दरवाजा स्वतः तयार करा.
कारण संधी मिळत नाही, ती निर्माण करावी लागते.

**पाचवा मंत्र :** तुमच्या क्षमतेला सीमा नाही
मर्यादा फक्त त्या- ज्या तुम्ही स्वतः ठरवता.
स्वप्नं मोठी ठेवा, कल्पनाशक्ती मुक्त ठेवा, प्रयत्न प्रचंड ठेवा.
दर सकाळी स्वतःला सांगा—
"आज माझ्यासाठी सर्वोत्तम दिवस ठरणार आहे.
माझा सर्वोत्कृष्ट प्रयत्न आज मी भारतासाठी देणार आहे."
हे पाच मंत्र मी आयुष्यभर जगलो आहे.
मी गरीब होतो, संसाधने नव्हती; पण स्वप्ने श्रीमंत होती.
तुमच्याकडे संसाधनंही आहेत, तंत्रज्ञान आहे, संधी आहेत
मग मागे का राहायचं?
तुम्ही चाललात, तर रस्ता तयार होतो,
तुम्ही धावलात, तर इतिहास लिहिला जातो.
महाराष्ट्राचे भविष्य तुमच्या हातात आहे आणि मला खात्री आहे-
तुम्ही जेव्हा उभे राहाल... तेव्हा महाराष्ट्राची प्रगती कोणीही थांबवू शकणार नाही.



# कला दालन

कला ही केवळ रंगरेषांची मांडणी किंवा शिल्पातील आकार नसून, ती मानवी संवेदनांचा आणि विचारांचा प्रगटीकरणाचा मार्ग आहे; परंतु भारतीय समाज अजूनही कलांचा खरा अर्थ समजून घेण्यात काहीसा निरक्षर आहे. शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच 'कला-साक्षरता' हीदेखील तितकीच महत्त्वाची ठरते. कलेतूनच समाजात संवेदनशीलता, सौंदर्यदृष्टी आणि विचारांचा विस्तार घडतो. या विभागात आम्ही वाचकांना चित्रकला, शिल्पकला आणि अन्य कलाप्रवाह यांचा सखोल वेध घेणारे लेख सादर करत आहोत. हे केवळ कलांचे सौंदर्य दाखवणार नाहीत, तर त्यामागची सांस्कृतिक परंपरा, सामाजिक आशय आणि आधुनिक काळातील बदलते आयामही उलगडून दाखवतील.





अदिती जोगळेकर- हर्डीकर

## कला रसास्वाद कशासाठी?

कलानिर्मितीतून मिळणारा आनंद वेगळा असतो आणि कलेच्या रसास्वादातून मिळणारा आनंद वेगळा असतो. तो आनंद आयुष्यातल्या अनेक ताण तणावांतून तुम्हाला बाहेर यायला मदत करतो. तणावमुक्तीसाठी रसास्वाद या विषयाकडे पाहता येईल का? ही दृष्टी आपण शाळकरी वयात, म्हणजे घडत्या वयात दिली, तर त्याचा भविष्यात मुलांच्या विचार करण्यात उपयोग होईल असे वाटते.

कलेच्या आस्वादाविषयी अभ्यास मनन चालू असताना एक दिवस अचानक रिल्केच्या पत्रांचं पुस्तक हाती पडलं. प्रसिद्ध जर्मन कवी रिल्के त्याच्या एका पत्रात म्हणतो, 'कलेला कलाकाराचा स्वाद असतो. आस्वादकाच्या जिव्हेवर तो सार्थ ठरतो.' कलाकाराचा स्वाद ल्यालेली कलाकृती आणि आस्वादकाची त्याची त्याची चव याने त्या कलाकृतीला पूर्णत्व येतं. कलाकृती कोणासाठी? तर ती बघणाऱ्या, ऐकणाऱ्या, वाचणाऱ्या अनेकांसाठी.

कलानिर्मिती ही जशी कलाकाराची जबाबदारी तेवढीच आणि तशीच जबाबदारी आस्वादकाचीही असते. एखाद्या समाजाची अभिरुची केवळ तिथे कोणत्या प्रकारची कला निर्माण होते आहे यावर ठरत नाही, तर रसिकांची रसिकता किती प्रगल्भ आहे यावरही ठरत असते. उत्तम रसिक असणं हे सहजसाध्य नाही. जसं उत्तम कलाकार व्हायला साधना करावी लागते, अभ्यास करावा लागतो; तसंच उत्तम रसिक-आस्वादक होण्यासाठीही अभ्यास करावा लागतोच. हे आस्वादक होणं शिकवता येत नाही; पण आस्वादाच्या या पाऊलवाटेवर हात धरून नेणारा कोणी मार्गदर्शक भेटला, तर या वाटेवरून चालण्याचं भाग्य नक्की पदरात पडतं. मग एका क्षणी तो मार्गदर्शक या वाटेवरचा आपला सहप्रवासीच बनतो.

शाळकरी वयात कविता वाचताना, चित्रपट पाहताना, नाटक पाहताना, चित्र पाहताना हे कोणाला कसं सुचत असेल? कलाकृती कशा निर्माण होत असतील, याचं मला अतिशय कुतूहल वाटे; पण या प्रश्नांना उत्तर देईल असं कोणीही तेव्हा माझ्या आजूबाजूला नव्हतं. शाळकरी वयात असा हात धरून कलाकृतींच्या जगात मुशाफिरी करून आणणारा मार्गदर्शक मिळाला असता, तर काय बहार आली असती असं मला आज वयाच्या चाळीशीला पोहोचल्यावरही वाटतं. आस्वादाच्या पाऊलवाटेवरचा हा प्रवास तुम्हाला माणूस म्हणून समृद्ध करणारा असतोच; पण एका अनोख्या आनंदाच्या प्रदेशातही नेणारा असतो.

मी स्वतः चित्रकार असल्यामुळे



कलेच्या आस्वादाविषयी लिहिताना मला काही वर्षांपूर्वीचा एक प्रसंग आठवतो, तो बार्सिलोनातल्या नॅशनल म्युझिअममधला. शाळेतील एक शिक्षिका दुसरी तिसरीच्या वयाच्या मुलांना त्या विशाल म्युझिअममधली शिल्पं, चित्र दाखवायला घेऊन आली होती. नुसतीच फेरी मारावी आणि मुलांनी काय दिसेल ते बघावं इतका सामान्य अप्रोच नक्कीच नव्हता. ही मुलं आणि त्यांची शिक्षिका यांचा स्पॅनिश भाषेत संवाद सुरू होता. अचानक तिने एका दालनात मुलांना गोल करून खाली बसवलं आणि आजूबाजूच्या चित्रांकडे बोट दाखवत ती त्या मुलांना समजेल अशा भाषेत काही तरी सांगत होती. कोणतीही चुळबूळ न करता मुलं अतिशय कुतूहलाने तिचं बोलणं ऐकत होती, तिला प्रश्न विचारत होती. या अशा गप्पा तिने दोन तीन दालनात अगदी खाली बसून निवांतपणे केल्या. इतक्या लहान वयातल्या मुलांना हे सगळं बघायला मिळणं, यापेक्षाही कोणी तरी इथे कलादालनात येऊन काय बघायचं हे सांगणं, त्यांच्याशी गप्पा मारणं, त्यांच्या बालसुलभ प्रश्नांना उत्तरं देणं ही किती महत्त्वाची गोष्ट त्यांच्या शिक्षणप्रक्रियेत घडताना दिसली.

आपल्या देशाच्या संदर्भात कला आणि कला शिक्षण याचा विचार करायचा झाला, तर थोडं इतिहासात मागे जावं लागेल. भारतात प्राचीन काळापासून कला ही सामान्य माणसाच्या जगण्याचाच एक भाग होती. घरातल्या भांड्यांपासून ते अनेक कलाकुसरीच्या वस्तू, दागिने, रांगोळ्या, वस्त्रकला, प्रासाद- मंदिरे याकडे आपण पाहिलं, तर प्राचीन भारतातील फाइन आर्ट म्हणजे हेच सगळं काही होतं. भारतातील सांस्कृतिक विविधतेमुळे वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या प्रकारच्या कला अस्तित्वात होत्या, त्यातल्या काही आज तग धरून आहेत. आज आपल्या देशातले कोणतेही म्युझियम जाऊन बघितले, तरी या विधानाचा पुरेपूर प्रत्यय येईल, इतक्या विविध प्रकारच्या विविध माध्यमातील वस्तू आपल्या देशात घडवल्या जात होत्या. मध्ययुगीन काळातील परकीय आक्रमणे व परिणामी सततच्या अस्थैर्यामुळे व नंतर इंग्रजांच्या येण्यामुळे

भारतीय कला जगताचं चित्रही पुरेसं धूसर झालेलं आपल्याला दिसतं.

पुढे इंग्रजांच्या इथल्या दीर्घकालीन वास्तव्यानंतर व अजून नंतरच्या काळात जग जसं जवळ येत गेलं, औद्योगिकीकरण - यांत्रिकीकरण वाढत गेलं, तसं रोजच्या जीवनाशी संलग्न असलेली अप्लाइड स्वरूपाची कला म्युझियम, संग्रहालये यात परिवर्तीत होत गेली. कारण इंग्रजांनी युरोपियन कला अभ्यासाची पद्धती इथे रुजवली. हे झालं चित्र शिल्प या कलांबद्दल. वाढत्या औद्योगिकीकरण आणि यांत्रिकीकरणाने भारतातील परंपरागत हस्तकौशल्याच्या कलांची खूप पीछेहाट झाली. (नंतरच्या काळात परंपरागत कलांच्या संवर्धनाचा मोठा कार्यक्रम भारत सरकार व खासगी संस्थांना हाती घ्यावा लागला) आज म्युझिअम्समध्ये प्रदर्शित होणारी फाइन आर्ट हे खरं म्हणजे कलेचं पुष्कळच आधुनिक असं रूप म्हणावं लागेल.

भारतीय नृत्य, नाट्य, संगीत, चित्र शिल्प, वस्त्रकला यात मूलभूत प्रकारचं काम आपल्या देशात हजारो वर्षं घडलं होतं; पण याचे आविष्कार काळानुसार बदलत गेले. त्यालाही तंत्रज्ञानाची जोड मिळाली; पण त्यामुळे असंही झालं, की एकसारख्या दिसणाऱ्या अनेक वापरातल्या गोष्टी आपल्या जगण्याचा भाग बनल्या. कलात्मक वस्तूंची जागा सर्वसाधारण दिसणाऱ्या यंत्रांवर बनलेल्या वस्तूंनी घेतली. त्यामुळे सामान्य माणसाच्या रोजच्या जगण्यातून (मुख्यतः शहरात) कला पुष्कळच मागे जात राहिली किंवा सामान्य माणूसही कलेपासून, सौंदर्यदृष्टीपासून दूर जात राहिला हे म्हणणं अतिशयोक्तीचं ठरणार नाही.

कलेची निर्मिती ही विविध प्रकाराने सामान्य माणसापर्यंत पोहोचत राहिली, तर कलेची आस्वादकताही आपसूक समाजातल्या अनेकांपर्यंत पोहोचते. गेल्या अनेक पिढ्यांत ही आस्वादकता, अभिरूची कमी होत जाताना दिसते आहे. ती वाढावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत.

सौंदर्यदृष्टी किंवा दृश्यकलेचा रसास्वाद कसा घ्यावा? किंवा दृश्यकलेंतर्गत निर्माण होणाऱ्या अनेक कलाकृतींकडे कसं पाहावं? याचे कोणतेच संस्कार आपल्या शालेय शिक्षणात झाले नसल्यामुळे त्याचा परिणाम आपल्या सामाजिक जीवनात अनेक ठिकाणी झाल्याचं आपल्याला दिसून येईल. याची थेट प्रचिती आपल्याला आजही आजूबाजूला बघताना येते.


शहरातील सार्वजनिक जागा, खासगी व सरकारी इमारती, रस्त्यांवरचा परिसर यात सौंदर्यदृष्टीचा विचार करून आपण त्या डिझाइन केल्या का? चांगल्या सार्वजनिक जागा निर्माण करून त्या स्वच्छ ठेवणं, त्याची देखभाल करणं, त्याचं सौंदर्य अबाधित ठेवणं हे आपल्याला आणि आपल्या प्रशासनाला जमलेलं नाही. युरोपातल्या अनेक देशात छान वाटतं. अनेक अर्थाने तिथे जपलेलं सौंदर्य पाहताना त्यांच्या सौंदर्यदृष्टीची दाद द्यावीशी वाटते. स्वच्छता राखण्याचा आणि सौंदर्यदृष्टीचा संस्कार याचा परस्परसंबंध हा असतोच. आपल्याकडे अनेक ठिकाणी स्थापत्याच्या, डिझाइनच्या बाबतीत सौंदर्यदृष्टीचा अभाव तर दिसतोच; पण सामान्य माणसाच्या जगण्यातही किती लोक सौंदर्यदृष्टीचा विचार सामाजिक दृष्टिकोनातून करतात? सार्वजनिक जागांची स्वच्छता राखणं हे आपल्या अंगवळणी पडलेलं नाही. अगदी देवळाबाहेर कशाही काढलेल्या चपला असतील किंवा कुठेही रस्त्यात पडलेला कचरा असेल. हे चांगलं दिसत नाही म्हणून करायचं नाही, हे आपल्या लक्षात येत नाही.

बरेचदा आपण पाहतो, की माणसं कितीही छोट्या घरात राहिली, तरी त्यांची दहा बाय दहाची खोलीही आहे त्या स्थितीत नीट लावलेली असते. मात्र, वाड्या वस्त्यांच्या बाहेर घाणीचं साम्राज्य दिसून येतं. सामाजिक शिस्तीपेक्षाही मला यात सौंदर्यदृष्टीचा अभाव हे त्यामागचं मुख्य कारण आहे असे वाटतं. म्हणूनच इथे आस्वादकता महत्त्वाची ठरते. सौंदर्यदृष्टी आणि रसास्वादाचा थेट संबंध असा समाजाची अभिरूची घडण्यात होत असतो, असं मला खात्रीलायकपणे वाटतं.

एखाद्या गोष्टीचे सौंदर्यमूल्य केवळ त्याच्या बाह्यरूपावरच अवलंबून नसते हे तर खरेच; पण त्या बाह्यरूपातून त्या जागेशी, वातावरणाशी, समोरच्या दृश्याशी जे एक आंतरिक नाते निर्माण होत जाते, त्याचा थेट संबंध आपल्या भावभावनांशी असतो. मानसिक विकसनाशी असतो. सगळे जण कलाकार होऊ शकत नाहीत; पण कलेचे आस्वादक, रसिक मात्र होऊ शकतात. त्यासाठी लहान वयापासून मुलांना या आस्वादकतेची ओळख करून द्यायला हवी आणि ती प्रक्रिया शाळेतून अगदी नैसर्गिकपणे घडू शकते.

देशापरदेशात अनेक ठिकाणी शाळकरी वयात मुलांच्या मनात सौंदर्याची ही भावना कशी रुजवावी याचा विचार शिक्षण प्रणालीत केलेला दिसतो. तैवानच्या शिक्षण प्रणालीत असं म्हटलं आहे की, “Aesthetics is defined as experience of the perceived good and instances of beauty that are autonomously constructed deep inside the mind of an individual, which is to interpret external information through the keen senses and connect with imagination and experience, which triggers the feeling of moving and joy in the individual’s inner soul. The goal of this is to cultivate the abilities of children to explore and observe, express and create and respond and appreciate.”

निसर्गातला एखादा सुंदर देखावा बघून छान वाटतं; पण पुराचं दृश्य, खवळलेला समुद्र हे बघून मनात एक भीतीही काही जणांना वाटू शकते. तसंच एखादं गाणं ऐकून, नृत्य पाहून, नाटक सिनेमा बघून, पुस्तक वाचून, चित्र शिल्प बघून वेगवेगळ्या भावना आपल्या मनात निर्माण होतात. कारण प्रत्येक कलाकृती ही वेगवेगळ्या भावना आपल्या मनात उत्पन्न करत असते. ही आस्वादकता आपल्या भावनात्मक समृद्धीसाठी खूप पोषक असते. मुळात या आस्वादकतेतून मिळणारा आनंद आपल्या भावनकोशाच्या समृद्धीसाठी सगळ्यात




जास्त मोलाचा ठरतो. तसंच आपल्या मेंदूत होणाऱ्या तार्किक विचारांना, सर्जनात्मक विचारांना पोषक ठरणारी असते.

कला शिक्षण म्हणजे कलेचे तंत्र शिकवणे आणि ज्या कलेत ज्यांना रस आहे किंवा गती आहे त्यांनीच त्या कलेचे व्याकरण शिकून कलानिर्मिती करणे, असा समज आपल्याकडे पिढ्यान् पिढ्या आहे. बरेचदा आपल्याकडे पालक शिक्षक वर्ग या आस्वाद प्रक्रियेपेक्षा कलेचं तंत्र शिकण्यावर भर देऊन शालेय वयात मुलांना छंद वर्गांना घालतात. मग कालांतराने चित्र काढायला किंवा संगीत शिकायला आवडत नाही किंवा यात करियर करायचं नाहीये या टप्प्यावर आल्यावर ते वर्गही बंद होतात.

अशा वेळी ते मूल त्या कलेपासून दूर जायचा धोका अधिक असतो. चित्र काढायला जमत नाही, म्हणूनही चित्रकलेपासून दूर जाणारे अनेक जण आपण बघतो. त्याच वेळी मनात कुठे तरी आस्वादकतेच्या पातळीवरही ते त्या कलेपासून दूर गेलेले असतात. मुळात चित्र काढणं आणि चित्रं पाहणं या दोन भिन्न गोष्टी आहेत. कलेची निर्मिती आणि कलाकृतीचा आस्वाद या वेगळ्या गोष्टी आहेत. कलाकृतीचा आस्वाद घेण्यासाठी तुम्ही कलाकार असायला हवं हा समजच मुळात चुकीचा आहे.

पण हे सगळं विषद करणारे चित्र शिल्प पाहावं कसं? दृश्य कलेचा आस्वाद कसा घ्यावा? हे सांगणारी कोणतीही व्यवस्था आपल्या आत्ताच्या शिक्षण प्रक्रियेत नाही. चित्रकलाच काय? कोणत्याही कलेचा आस्वाद घ्यायचा म्हणजे काय करायचं? त्यासाठीही काही अभ्यास करावा लागतो, वेगवेगळं ऐकावं पाहावं लागतं आणि ते काय? हे आज कोणीच सांगत नाही.

कलानिर्मितीतून मिळणारा आनंद वेगळा असतो आणि कलेच्या रसास्वादातून मिळणारा आनंद वेगळा असतो. तो आनंद आयुष्यातल्या अनेक ताण तणावांतून तुम्हाला बाहेर यायला मदत करतो. एक तणावमुक्तीसाठी रसास्वाद या विषयाकडे पाहता येईल का? ही दृष्टी आपण शाळकरी वयात म्हणजे घडत्या वयात दिली, तर त्याचा भविष्यात मुलांच्या विचार करण्यात उपयोग होईल असे वाटते. एकूणच कलेचा आस्वाद घेण्याच्या प्रक्रियेत सौंदर्यदृष्टीचे आकलन मुलांना होते आहे का? आणि तसे होत असेल, तर सौंदर्यमीमांसा म्हणजे aesthetics हा फक्त कलाकारांनी अभ्यासायचा विषय नसून, अभिरुची घडणासाठी समाजातील सर्वांनी तो अभ्यासावा लागेल, शालेय शिक्षणातच त्याचा अंतर्भाव असायला हवा असे वाटते.

महाराष्ट्र शासनाने काही वर्षांपूर्वी कला रसास्वाद आणि स्व विकास हे पुस्तक अभ्यासक्रमात लावले होते. त्यात नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प आदी कलांच्या रसग्रहणाबद्दल आस्वादनाबद्दल चर्चा केली होती. हा विषय शाळेत कसा घ्यावा याबद्दल पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी संस्थेद्वारे शिक्षकांचे एक ट्रेनिंगदेखील पुण्यात आम्ही काही जणांनी घेतले; पण या विषयाला आणखी एक पर्यायी विषय अभ्यासक्रमात आल्यानंतर दुर्दैवाने शाळांनी या विषयाकडे पाठ फिरवली. व्यक्तिमत्त्व विकसनाच्या अनेक मुद्द्यांना हा विषय स्पर्श करत असल्याने शाळा आणि महाविद्यालयात कोणत्याही विद्याशाखेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कलेची आस्वादकता हा विषय आवर्जून शिकायला हवा. त्यासाठी शैक्षणिक संस्थांनाच पुढाकार घ्यायला लागेल असे वाटते.

*(अदिती जोगळेकर- हर्डीकर या कला आणि लेखन क्षेत्रात कार्यरत आहेत.)*





भव्य शिल्प घडवण्याची स्वप्न बघणारे आणि ती प्रत्यक्षात आणणारे देशातील एक प्रख्यात शिल्पकार म्हणजे राम सुतार. गांधीजींची भक्ती करणारे; पण एखादा विषय शिल्पासाठी मिळाला, की अखंड अभ्यास आणि चिंतन यातून अनोखे, उदात्त असे काही घडवणाऱ्या या कलाकाराला नुकताच महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यानिमित्ताने...

**राजेंद्र ज.महाजन,**
चित्रकार, कला अभ्यासक, सेवानिवृत्त प्राचार्य,
ललित कला केंद्र चोपडा, जि. जळगाव.

# भव्यतेचा उपासक : महाराष्ट्र भूषण राम सुतार

आधुनिक भारतीय कलेत महाराष्ट्रातील शिल्पकारांचे मोठे योगदान आहे. रावबहादूर गणपतराव काशिनाथ म्हात्रे, रघुनाथ कृष्णा फडके, विनायक पांडुरंग करमरकर, बाळाजी वसंत तालीम, वासुदेव विष्णू मांजरेकर, नारायण गणेश पाणसरे, सदाशिव साठे आदी प्रसिद्ध शिल्पकारांच्या मांदियाळीत पद्मभूषण राम वनजी सुतार यांचे नाव त्यांच्यातील वेगळेपणासाठी घ्यावे लागेल. या प्रतिभावंत शिल्पकाराने अफाट संघर्ष करीत वाढत्या वयागणिक उत्तरोत्तर भव्य शिल्पे घडवली. म्हणून कलेच्या इतिहासात त्यांची कारकीर्द ओलांडून पुढे जाताच येणार नाही.

आज वयाच्या शंभरीतही ते न थकता, दुपारची वामकुक्षीही न घेता दररोज आठ ते दहा तास नोएडा स्थित स्टुडिओत उभे राहून शिल्पकलेत रममाण असतात. या वयात त्यांच्याकडे अरबी समुद्रातील चारशे फूट उंचीचे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, मुंबईतील इंदू मिलमधील 'स्टॅचू ऑफ इक्वालिटी', ३५० फूट उंचीचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी-चिंचवड-मोशी येथील छत्रपती संभाजी शिल्प, अयोध्या येथील तब्बल साडे सहाशे फूट उंचीचे श्रीराम शिल्प ही भव्य शिल्पे निर्माण अवस्थेत आहेत. याशिवाय अन्य अनेक लहान-मोठी

शिल्पे त्यांच्या स्टुडिओत तयार होत आहेत. महानतेचा अथक प्रवासी असलेले राम सुतार यांना पाच, सहा वेळा भेटण्याचा योग आला. नोएडा स्टुडिओत २००९ साली आणि कोरोना काळात कलापुष्प सांगलीद्वारे कलामंथन चर्चासत्रात ऑनलाइन प्रदीर्घ मुलाखत घेण्याची संधी मला मिळाली.

शरीरयष्टीने उंचपुरे, भव्य कपाळ, पिंगट, वाढत्या वयानुसार कमी झालेले; पण मानेवर रुळणारे केस, अतिशय साधा पेहराव, निगर्वी संवेदनशील अशा पद्मभूषण राम सुतारांचे व्यक्तिमत्त्व बघताच क्षणी मनात ठसते. ऋषी परंपरेतील तपसाधनेतून आलेले चेहऱ्यावर तेज आपल्याला खिळवून ठेवते. खान्देशात धुळ्याजवळ गोंदूर या छोट्याशा खेड्यात सामान्य विश्वकर्मा सुतार कुटुंबात १९ फेब्रुवारी १९२५ रोजी त्यांचा जन्म झाला. ते आठ अपत्यांपैकी दुसरे होते. त्यांचे वडील वंजी हंसराज सुतार लाकडाच्या बैलगाड्या, टांगा, नांगर व तत्सम पारंपरिक सुतारकामाचा व्यवसाय करायचे. त्यांचे घर अगदी साधे माती कुडाचे होते. सारवण करणारी, गोवऱ्या थापणारी आई सीताबाई यांना बघतच राम सारवलेल्या भिंतीवर चित्र काढायला लागले. बालपणीच्या आठवणीत रमताना ते सांगतात, "नकळत्या वयात विंचू चावला. मी तो मारला; पण कलात्मक जाण असल्याने त्याच्या मृत आकाराने माझे लक्ष वेधले. घरात असलेल्या ५०१ साबण वडीवर मी लगोलग विंचूचा आकार कोरला व हुबेहूब रंगवलासुद्धा आणि माझ्या शिल्पकलेला सुरुवात झाली."

त्यांना शिक्षणाची उमेद फार होती. चौथीपर्यंत गावात शिक्षण घेतले. पुढील शिक्षणासाठी निमदळ, अवधान व इतर गावांत अनवाणी पायपीट झाली. त्यांच्या शब्दात सांगायचे, तर भोवऱ्याप्रमाणे शिक्षण प्रवास सुरू राहिला. वयाच्या १०व्या वर्षी मधुसूदन कुलकर्णी या शिक्षकांच्या सांगण्यावरून त्यांनी केलेल्या गणपतीच्या मूर्तीची वाहवा झाली. मॅट्रिकला असताना वडिलांचे निधन झाले. त्यामुळे परीक्षेत अपयशाला सामोरे जावे लागले; परंतु गुणग्राहक कलाशिक्षक रामकृष्ण जोशींनी त्यांना शाळेत शिवाजी महाराजांना तलवार देताना भवानी माता असे चित्र पाटीवर कोरताना पाहिलेले होते. त्यांनी राम सुतारांना कलेच्या उच्च शिक्षणासाठी उद्युक्त केले व सर्वतोपरी मदतही केली. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे पाठवून त्यांना चार वर्षे ते दरमहा ₹.२५ देत राहिले. ते कृतज्ञतेने म्हणतात, "जोशी गुरुजी होते म्हणून राम सुतार घडला." उच्च कला शिक्षणाला जाण्यापूर्वी इ.स.१९४७ मध्ये याच गुरुजींच्या प्रेरणेतून त्यांनी सात फूट उंचीचे 'बॉडी बिल्डर' हे सिमेंट माध्यमातील व ग्रीक प्रभावातील शिल्प घडवले. ते शिल्प आजही नेर, जि. धुळे येथे बघावयास मिळते. या व्यक्तीशिल्पातील शरीरशास्त्राचा अचूक अभ्यास, एकूणच अवयवांची प्रमाणबद्धता यातून त्यांच्यातील असामान्यत्वाची चुणूक दिसून येते.

मुंबईतील सुप्रसिद्ध सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून राम सुतार यांनी प्रथम श्रेणीत प्रथम येऊन प्रतिष्ठेचे मेयो सुवर्णपदक पटकावत जी. डी. आर्ट ही पदविका प्राप्त केली. या काळात ते एक नम्र प्रतिभावंत कला विद्यार्थी म्हणून कला वर्तुळात परिचित होते. त्यांच्या सालस स्वभावामुळे शिक्षक नेहमीच त्यांना मदत करीत असत. कला विद्यार्थी असतानाच ते रावबहादूर म्हात्रे, वि. पां.करमरकर, खानविलकर या दिग्गज शिल्पकारांच्या स्टुडिओत कॉलेज सुटल्यावर संध्याकाळी नऊ वाजेपर्यंत कामासाठी जायचे. ते कधी कधी त्यांना बक्षीसही द्यायचे. या दरम्यान नेर येथील शाळेत त्यांनी केलेले गांधी शिल्प तर अफलातून कल्पक असे आहे. त्यात वर गांधीजींचे हसरे अर्धशिल्प, त्याखालील चौकोनी पेडस्टलवर येशू ख्रिस्त, महाकवी टागोर, महात्मा बुद्ध, कार्ल मार्क्स यांची उत्थित शिल्पं कालखंडासह व त्याही खाली चारही बाजूंनी चार सिंह स्तंभांच्या प्रतिकृती; यांतून त्यांची मानसिकता व भव्य आशयघन स्मारक बनविण्याची बीजे रुजलेली दिसून येतात.शिक्षणानंतर उमेदवारीच्या काळात त्यांनी सन १९५४-५८ या चार वर्षांत भारतीय पुरातत्त्व विभागात अजिंठा वेरूळ लेण्यांचे जतनीकरण करण्याकामी मॉडेलर म्हणून नोकरी केली. ते म्हणतात, "अजिंठा वेरूळचे ते दिवस अविस्मरणीय होते." कारण तिथल्या वास्तव्यात त्यांनी अनेक अभिजात शिल्पांची डागडुजी केली.फावल्या वेळात भरपूर रेखांकने केली. त्याद्वारे अभिजात शिल्पकला परंपरा जवळून अभ्यासता आली. याबद्दल बोलताना ते म्हणतात, "या सगळ्या अनुभवाने माझे आयुष्यच बदलून गेले." अजिंठा वेरूळच्या वास्तव्यात प्रसिद्ध टेबलटॉप छायाचित्रकार केकी मुस यांच्या चाळीसगावस्थित रेम्ब्रांट रिट्रीट बंगल्यात केलेली गंगा, यमुना, त्रिमूर्ती व केकी मूस यांचे अर्धशिल्प ही शिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

सन १९५९ला त्यांनी टेक्निकल असिस्टंट म्हणून ऑडिओ व्हिज्युअल पब्लिसिटी इन्फॉर्मेशन अँड कास्टिंग विभागात दिल्ली येथे दीड वर्ष नोकरी केली. शासकीय नोकरीत असताना बाह्य शिल्पकामे करता येणार नाहीत, असे वरिष्ठांनी बजावताच त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. सन १९५९ पासून 'कला हेच जीवन' मानून स्वतंत्र शिल्पकार म्हणून दिल्लीतच राहून ते छोटी मोठी कामे करू लागले. ज्या शिल्पामुळे त्यांना नोकरीचा राजीनामा द्यावा लागला, ते शिल्प म्हणजे प्रगती मैदानाच्या प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूला असलेले १३ फूट उंचीचे सिमेंट काँक्रीटचे शेतकरी शिल्प व शेतकरी जोडप्याचे शिल्प होय. वास्तुविशारद जोगळेकरांमुळे संसद भवनात त्यांना सात फूट उंचीचा लाल दगडातील सिंहस्तंभशीर्ष घडवायला मिळाला. भोपाळच्या टागोर भवनातील करंजगावकर या वास्तूविशारदाच्या मदतीने त्यांनी गंगा यमुना ही शिल्पे घडविली. ते म्हणतात, "पैशांसाठी मी कधीही काम केले नाही, जे मिळत गेले ते स्वीकारत गेलो आणि झपाटल्यागत कामे केली." अशा तऱ्हेने त्यांची शिल्पकलेतील तपसाधना वाढत्या वया गणिक फळाला येत गेली.

राम सुतार सुरुवातीला सिमेंट, काँक्रीट, दगड, संगमरवर आणि ते नंतर ब्रॉंझ ,फायबर ग्लास या माध्यमांकडे

वळले. राजस्थान-मध्य प्रदेश सीमेवरील चंबळ नदीवरील गांधीसागर धरणावर ४५ फूट उंचीचे चंबळ देवतेच्या भव्य प्रतिकात्मक शिल्पामुळे ते देशभर प्रसिद्ध झाले. ४५ फूट उंचीच्या सिमेंट काँक्रीटच्या ठोकळ्याला पंधरा महिने रात्रंदिवस स्वतःला झोकून देत, अजिंठा वेरूळच्या कलावंताप्रमाणे छिन्नी हातोड्याचे घाव घालत, कोरून भारतीय अभिजात परंपरेशी नाते सांगणारे हे शिल्प त्यांनी उभे केले. बंधुभाव दर्शवणारे हे शिल्प एकमेवाद्वितीय आहे. या शिल्पातील आकृत्यांची प्रमाणबद्ध मांडणी, वस्त्र, अलंकारांची योजकता, शरीर लय व दैवी भाव, लावण्य महत्त्वाचे म्हणजे तंत्र कौशल्य हे रसिक मनाला मंत्रमुग्ध करून जाते.

राष्ट्रपिता महात्मा गांधीवर राम सुतार यांची अपार भक्ती होती.त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव त्यांनी आयुष्यभर निष्ठेने अंगीकारलेला आहे.सन १९४८ ला बनवलेला नेर, जि. धुळे येथील सिमेंटचा हास्यमुख गांधी या अर्ध पुतळ्यापासून ते आजवर त्यांची केलेली विविध अवस्थेतील, विविध माध्यमांतील अनेक गांधी शिल्पे बघावयास मिळतात. प्रत्येकातून गांधींचे महानत्व झळकताना दिसते. ते नेहमी म्हणतात, "शिल्पाशय समजून घेण्यासाठी भरपूर वाचन केले पाहिजे, चिंतन मननाबरोबरच असंख्य आरेखने केली पाहिजेत, तरच तुम्ही त्या व्यक्तित्वाच्या जवळ पोहोचू शकता आणि तुमची शिल्पं रसिकांच्या हृदयाला भिडतील."


त्यांची गांधींची शिल्पे भारतासह जगभरातील २१० देशांत, ४५० शहरांत गेलेली आहेत. दिल्ली संसद भवन आवारातील १६ फूट उंचीचे बसलेले 'ध्यानस्थ गांधी' हे ब्रॉंझ शिल्प तर सर्वोत्तम असेच आहे. गांधी स्मृती स्थळ, दिल्ली येथील १३ उंचीचा ब्रॉंझ स्मारक समूह अनुभवताना त्यावरील 'मेरा जीवन ही मेरा संदेश है' हा विचार आपणास नतमस्तक व्हायला भाग पाडतो.

या व्यतिरिक्त त्यांची संसद भवनात १५ राष्ट्रपुरुषांची भव्य शिल्पे बघावयास मिळतात. १८फूट उंचीचे पंडित



जवाहरलाल नेहरू, मौलाना अब्दुल कलाम आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, जयप्रकाश नारायण, शहीद भगतसिंग, २१ फूट उंचीचे अश्वारूढ शिवाजी महाराज, अश्वारूढ महाराणा रणजित सिंग, छत्रपती शाहू महाराज, पंडित गोविंद वल्लभ पंत, महात्मा फुले, संत कबीर, विवेकानंद, बाबू जगजीवन राम इ. भव्य शिल्पांतून प्रत्येकाची स्वभाववैशिष्ट्ये चटकन नजरेत भरतात. लोकनेता वा अन्य नेत्यांची हुबेहूब व्यक्तिरेखा घडविण्यात राम सुतार कोणतीही कसर सोडत नाहीत. अमृतसर येथील २१ फूट उंचीचे महाराणा रणजित सिंग यांचे अश्वारूढ शिल्प, लुधियाना गोविंदगढ येथील २० फूट उंचीचे भव्य गंगा, यमुना जलदेवतेचे शिल्प, माजी पंतप्रधान राजीव गांधींच्या वीरभूमी समाधी स्थळावरील १६×५ फुटांची आडवी उत्थित पॅनल्स; तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिवर्तन स्थळ, लखनौस्थित स्मारकातील अनेक उत्थित व गोल शिल्पे, म्युरल्स व अगदी अलीकडील ८४ फूट उंचीचे जोरहाट, आसाम येथील ललित बोरफुकन, ९० फूट उंचीचे बेंगळुरू येथील केपन गौडा, १५३ फूट उंचीचे चिकबल्लारपूर, कर्नाटक येथील शिवा इ. भव्य व्यक्तिशिल्पे कल्पकतादृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण व अनोखी आहेत.

गाथा मंदिर देहू स्थित संत तुकाराम (इ.स.२००७) या सात फूट उंच शिल्पात त्यांच्या बालपणीच्या हळव्या आठवणी गुंतलेल्या आहेत. ते म्हणतात, "तुकाराम हे माझे आवडते संत. लहानपणी त्यांचे अभंग कानी पडत असत. पाचवीत असताना 'संत तुकाराम' या नाटकात मी तुकारामांची भूमिका केली होती, तिचे शाळेत तेव्हा



भरभरून कौतुक झाले होते. त्याच वयात मी संत तुकाराम हा मूकपटही बघितला होता. ती प्रतिमा माझ्या हृदयात होती, या शिल्पातून मी ती उतरवण्याचा प्रयत्न केला याचेच मला मोठे समाधान आहे.”

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधींचे श्रीपेरुम्बदूर (तमिळनाडू) येथील स्मारक तर प्रतिकात्मक रूपक स्तंभासाठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. १५ फूट उंच व ६ फूट गोलाई असलेले ब्राँझ कॅपिटल्स हे ५०फूट उंचीच्या सात गोल स्तंभांवर उभारलेले आहे. धर्म, सत्य, न्याय, त्याग, शांती, विज्ञान व समृद्धीचा विचार सांगणारे हे प्रतिकात्मक स्तंभ सम्राट अशोक स्तंभांची आठवण करून देताना दिसतात. पुणे विमानतळावर असलेले १६×४० फूट लांबी रुंदीचे फायबर क्लास माध्यमातील ग्लोरी ऑफ शिवाजी (इ.स.१९८२) ‘छत्रपती शिवराय-समर्थ रामदास-संत तुकाराम भेट’ हे काहीसे उथळ उठावाचे भव्य म्यूरल अतिशय सौंदर्यपूर्ण आणि इतिहासाला बोलके करणारे असे आहे. खजुराहो येथील अजरामर शृंगार शिल्पे घडवणाऱ्या अनामिक शिल्पकारांना श्रद्धांजली ( इ.स.१९९६) वाहणारे बारा फूट उंचीचे शिल्प व त्यावर कोरलेला ‘खजुराहो के निडर कलाकार, अमर शिला में गान तुम्हारा’ हा संदेश राम सुतारांच्या अफलातून कल्पकशक्तीला सलाम करणारा आहे. इतिहासातल्या सौंदर्यशील शिल्प घडवणाऱ्या अनामिक कलावंतांना वाहिलेली ही भावगर्भ श्रद्धांजली रसिकांच्या मनावर मात्र कायमची कोरली जाते हे निश्चित.

वर अभ्यासलेल्या शिल्पांचा मुकुटमणी म्हणता येईल ते म्हणजे ब्रह्म सरोवर हरियाणा कुरुक्षेत्र येथील इ.स.२००८ साली बनविलेले ‘कृष्ण अर्जुन गीता संवाद’ हे प्रचंड आकाराचे भव्य आणि दिव्य अजरामर ब्राँझ शिल्प होय. ज्या ठिकाणी कौरव पांडवांचे घनघोर युद्ध झाले, त्या कुरुक्षेत्रावर हे शिल्प विराजमान आहे. त्याची लांबी, रुंदी व उंची अनुक्रमे ६०×३०×३४ फूट असून, ते जगातील सर्वांत मोठे शिल्प असावे. आजवरच्या पद्मभूषण राम सुतारांच्या कारकिर्दीतील ही सर्वोत्तम कलाकृती म्हणता येईल. ‘कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन.....’ असा संदेश देणाऱ्या या शिल्पात चार घोड्यांच्या रथावर आरुढ कृष्ण-अर्जुन संवाद घडत आहे. सारथ्य करणारा प्रसन्न श्रीकृष्ण विमनस्क अवस्थेत असलेल्या योद्धा अर्जुनाला गीता सार ऐकवत आहे. घोड्यांच्या डोळ्यांतील भावसुद्धा प्रसंगाच्या धीरगंभीरतेत भर घालताना दिसतो. रथाचा साज, अलंकृत छत्री हे सारे राजवैभवाला साजेसेच आहे. या भव्य शिल्पाबद्दल राम सुतार म्हणतात, “भव्यदिव्य असे काही तरी घडवावे हे मी आधीपासूनच ठरवलेले होते. ‘इच्छिले ते घडते’ या उक्तीप्रमाणे पार पडत

गेले. जीवन हे भोवऱ्यासारखे आहे. त्यात दोऱ्यांसारख्या अनेक गुंडाळ्या असतात. विचार न करता सुरुवात करा, आपोआप मार्ग सापडत जातो. प्रयत्नांची पराकाष्ठा करा, स्वतःशी प्रामाणिक राहा, यश आपसूकच गवसणी घालायला लागते."

राम सुतार यांचे इ.स.२०१३ते २०१८ दरम्यान नर्मदा सरोवर गुजराथ येथे घडवलेले 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे जगातील सर्वाधिक ५९७ फूट उंचीचे व्यक्तिशिल्प आज प्रचंड बहुचर्चित झालेले आहे. लाखो पर्यटक या शिल्पाला पाहण्यासाठी जगभरातून येत असतात. एकतेचे प्रतीक म्हणून या भव्य शिल्पाची निर्मिती केलेली आहे. भारतातील सहा लाख ग्रामीण लोकांकडून ५००० मेट्रिक टन लोखंड संग्रहित करून त्याचा उपयोग या शिल्पात केलेला आहे. या शिल्पाचा मुख्य ढाचा लोखंड व त्यावर पितळाचे लेपन आणि चबुतरा काँक्रिटचा आहे. या संपूर्ण शिल्पाला स्मारकाचे स्वरूप दिलेले आहे. येथे दररोज लेजर शोचे आयोजन केले जाते. त्यातून देशाची एकता, अखंडता व देशप्रेम यांचा संदेश दिला जातो. "मी लहानपणी स्टॅचू ऑफ लिबर्टीचे पाहिलेले फोटो, असेच जगातील सर्वांत उंच शिल्प आपणही बनवावे हे स्वप्न अशा तऱ्हेने पूर्ण झालेले बघणे हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव आहे," असे ते एका मुलाखतीत म्हणाले आहेत.

राम सुतारांच्या या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीचा गौरव भारत सरकारने पद्मश्री (१९९९) आणि मग पद्मभूषण (२०१६) देऊन केला आहे; तसेच रवींद्रनाथ टागोर सौहार्द पुरस्कार (२०१६) देऊन त्यांच्या कलेचा गौरव केलेला आहे. यांसह त्यांना मुंबई आर्ट सोसायटीचा 'रूपधर जीवनगौरव' (२०१०) व खान्देशातील जैन इरिगेशन, जळगाव येथील जीवनगौरव पुरस्कार असे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार वेळोवेळी मिळालेले आहेत. ते प्रख्यात इंडियन आर्ट अँड क्राफ्ट सोसायटी (आयफेक्स), दिल्लीचे विद्यमान अध्यक्ष आहेत.

आज शंभरी पार करताना त्यांना मदत होते, ती प्रख्यात वास्तुतज्ज्ञ व रचनाकार असलेल्या अनिल सुतार या प्रगल्भ सुपुत्राची. ते जन्मजात शिल्पकार व वास्तूरचना तज्ज्ञ असून, १४ वर्षे अमेरिकेत आर्किटेक्चर प्रोजेक्ट डिझायनर म्हणून काम केल्यानंतर सन १९९४ पासून ते सरांच्या मदतीला असतात. त्यांच्याबद्दल राम सुतार म्हणतात, "आम्ही दोघे म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत." त्यांचा भारतातील सर्वांत मोठा आठ हजार स्क्वे.मी. एवढा अवाढव्य स्टुडिओ कम फाउंड्री नोएडा परिसरात गाजियाबाद येथे आहे. तिथे रोज १००० किलोग्रॅमचे मेटल कास्टिंग होते. नोएडाला त्यांचा दोन हजार स्क्वे.मी.आकाराचा 'क्ले मॉडेलिंग' स्टुडिओ आहे. अनिल सुतार सांगतात, "गेल्या पंधरा वर्षांपासून आम्ही आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारून या स्टुडिओत काही बदल केलेले आहेत. जसे सहा सीएनसी राउटर मशिन, रोबोट आणलेले आहेत ते अधिक ॲक्युरेट असते. त्यात सीडी स्कॅनिंग पार्ट्सचे डिझाइन अधिक सुलभतेने होते."

गाजियाबाद येथे सुरज कुंड भडकल सरोवर रस्त्यावर इ.स. १९९९ मध्ये पाच एकर जागेत 'आनंदवन' शिल्प बगीचा व त्या शेजारीच सहा एकर जागेत सन २००९ ला 'सुतारकला वाटिका' राम सुतारांनी विकसित केलेली आहे. तिथे सरांनी आजवर केलेल्या सर्व लहान-मोठ्या शिल्पांच्या प्रतिकृती बघावयास मिळतात.

वास्तुतज्ज्ञ अनिल सुतार यांना भविष्यातील योजनांबाबत विचारले असता ते सांगतात, "महाराष्ट्रात लोणावळा वा नाशिक वा पुणे येथे पंधरा ते वीस एकर जागे वर पॅरिसच्या लूव्र दर्जाचे बाबांचे शिल्पाकृतींचे म्युझियम बनवावे, ललित कलांची एकत्र मांडणी त्यात असावी असे स्वप्न उरी बाळगले आहे.बघू या.. कसे जमते ते!"

स्वातंत्र्यपूर्व काळातील २२ वर्षे व स्वातंत्र्योत्तर काळातील सुमारे ७८ वर्षे अनुभवलेल्या पद्मभूषण राम सुतारांना झालेल्या बदलाबद्दल व एकंदरीतच प्रदीर्घ जीवनाबद्दल विचारले असता ते म्हणतात, "परिस्थिती बदलली, माणसे बदलली, आधुनिक तंत्रज्ञान आले, गतिमानता आली; पण तेव्हाही मेहनत होती, आताही ती आहेच. निसर्ग फार मोठा खजाना आहे, तो गुरू आहे, डोळे उघडे ठेवा. 'जहाँ मिली नजर वहाँ दुनिया बेखबर.' चालायला लागा, सतत उद्योगी राहा, मागे बघू नका, पुढे बघू नका, नवनवीन तंत्रज्ञान स्वीकार करा, प्रामाणिकपणा जपा. कलाकाराच्या रूपाला आठवण रहावी म्हणून कलेची सेवा करा. यश, पैसा, प्रसिद्धी आपोआपच मिळत जाईल."

मी एकदम स्तब्ध, नतमस्तक झालो!

ता.क. - पद्मभूषण राम सुतार यांना १०१ व्या वर्षपूर्तीनिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार, ना. एकनाथ शिंदे यांनी नोएडास्थित घरी जाऊन महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केला.



कॅलिग्राफी ही केवळ अक्षरांची मांडणी नसून, ती शाई, साधन आणि कलाकाराच्या मनःप्रवाहाने विणलेली एक दृश्य-रचना आहे. अक्षरांच्या पलीकडे जाऊन ती भावना, ताल, लय आणि सौंदर्य यांच्या संगतीने उभी राहते. या समृद्ध परंपरेला आधुनिकतेचा स्पर्श देणारे अच्युत पालव यांनी भारतीय लिपीमधील सौंदर्यगर्भ शक्यता नव्याने उजागर केल्या आहेत.

# अक्षरांचा जादुगार – अच्युत पालव

**मुलाखत : प्रा. गणेश तरतरे**
सर जे. जे. कला महाविद्यालय

अच्युत पालव यांचे भारतीय सुलेखन (कॅलिग्राफी) कलेतील स्थान फार महत्त्वाचे आहे. अक्षरांच्या दृश्यात्मक अलंकरणाला नवे परिमाण देणारी 'कॅलिग्राफी' ही कला भारतात ज्या उंचीवर पोहोचली, त्या प्रवासाला पालव यांनी नवी दिशा, नवी प्रतिष्ठा आणि नवे सौंदर्यदर्शन दिले. देवनागरीच्या परंपरेत त्यांनी निर्माण केलेल्या दृश्यानुभवामुळे भारतीय अक्षर कलेची ओळख अधिक गहिरी आणि प्रभावी झाली. त्यांच्या योगदानाची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मश्री सन्मान प्रदान केला, हा त्यांच्या कर्तृत्वाला केलेला सलाम आहे.

भारतीय संस्कृतीत अक्षराला केवळ संवादाचे साधन न मानता, एक आध्यात्मिक, दृश्य आणि कलात्मक अनुभव मानले गेले आहे. वेदांतील ध्वनिशास्त्र, मंदिरशिल्पांतील शिलालेख, संत वाङ्मयातील अक्षर नाद या सर्वांत अक्षर एक प्राणस्पंदन म्हणून जाणवते. मानवाने प्रारंभी चित्र चिन्हांतून अर्थ व्यक्त केला, त्या चित्रांतूनच ब्राह्मी, हायरोग्लिफिक्स, क्युनिफॉर्म यांसारख्या लिपींचे रूप विकसित झाले. दगड, ताम्रपट आणि भूर्जपत्रांवरील कोरीव अक्षरांनी क्रमशः कॅलिग्राफी कलेची बीजे रुजवली. लेखन ही कृती उपयोगाच्या कक्षेतून बाहेर पडून कलात्मकतेच्या पटावर झेपावली आहे.

सिंधू संस्कृतीतील मोहोरांवरील चित्रलिपी आज जरी वाचता येत नसली, तरी तिच्या रेषा वैभवातून त्या समाजाचा कला संस्कार प्रखरतेने जाणवतो. प्रत्येक

चिन्हातली रचनात्मक नेमकेपणा, रिक्त जागेचा सुबोध वापर आणि संक्षिप्ततेतून उभे राहणारे सौंदर्य हे अत्यंत आधुनिक भासते. बैल, एक शिंगी प्राणी, वृक्ष, त्रिशूळसदृश आकृती या सर्व प्रतीकांमध्ये एक सूक्ष्म, परिष्कृत सौंदर्यशक्ती दडलेली आहे. ही लिपी अर्थाने मूक असली, तरी दृश्यार्थाने विलक्षण समृद्ध आणि कलात्मक आहे.

भारतीय सुलेखनाची परंपरा ब्राह्मीपासून देवनागरीपर्यंत समृद्ध होत गेली. अशोक स्तंभांवरील कोरीव अक्षरांची संरचना, संतकालीन हस्तलिखितांची लयबद्ध रचना, इस्लामिक परंपरेतील अरबी-फारसी सुलेखनाची नक्षी कामातील भव्यता, चीन-जपानमधील शिस्तबद्ध ध्यानात्मक कॅलिग्राफी; तसेच युरोपीय मध्ययुगीन ग्रंथांची अलंकारिक अक्षरकला, ही सर्व मानवी अभिव्यक्तीची विविध रूपे एकाच अंतः प्रवाहाशी, अक्षरातील सौंदर्याच्या शोधाशी जोडलेली आहेत.

या समृद्ध परंपरेला आधुनिकतेचा स्पर्श देणारे अच्युत पालव यांनी भारतीय लिपीमधील सौंदर्यगर्भ शक्यता नव्याने उजागर केल्या. त्यांच्या रेषांमध्ये उत्स्फूर्तता आहे, स्ट्रोकमध्ये संगीत आहे आणि आकारांत लयबद्ध शिस्त आहे. त्यांनी सुलेखनाला केवळ कला न ठेवता, एक सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि दृश्य-भाषिक अनुभव बनविला. त्यामुळे भारतीय कॅलिग्राफी आज जागतिक स्तरावर नव्या अभिजाततेने उजळून निघते.

**शिक्षण आणि पुढील दिशा**

अच्युत रामचंद्र पालव यांचा जन्म मुंबई, महाराष्ट्रात झाला. लालबाग गणेश टॉकीज परिसरात त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील रेल्वेत नोकरीला होते आणि आई गृहिणी होत्या. परळच्या डॉ. शिरोडकर हायस्कूलमध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. चित्रकलेत आवड व गती असल्याने शाळेत फळ्यावर सुविचार लिहिण्याची जबाबदारी त्यांचे कलाशिक्षक परशुराम नंबर यांनी त्यांच्याकडे दिली. तेथे त्यांची खऱ्या अर्थाने अक्षरांशी ओळख झाली. काळा फळा आणि पांढरा खडू या परस्परविरोधी रंगांमधील सौंदर्य त्यांना तेव्हाच समजले असावे. लहानपणापासूनच अक्षराशी त्यांचे असे नाते जुळले ते, कायमचे, आयुष्यभरासाठी. शाळेतील फलक लेखनातच त्यांच्या हस्ताक्षरात एक वेगळेपण, लय, सौंदर्य दिसत असे. इतरांसाठी जे अक्षर म्हणजे केवळ भाषेचे साधन होते; परंतु तेच अक्षर पालव यांच्या दृष्टीने एक स्वतंत्र कलारूप होते.

१९८२ साली त्यांनी मुंबईच्या सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट येथून उपयोजित कलेचे शिक्षण घेतले. त्यात त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तीला व्यासपीठ मिळून अक्षरांच्या सौंदर्यदृष्टीची शास्त्रीय जाणीव त्यांना प्राप्त झाली. कला कोणत्याही माध्यमातून आविष्कृत होत असते. मग ती अक्षराच्या माध्यमातून व्यक्त होऊ शकते. शब्द नेहमीच आशय आणि अर्थग्राही असतात. ते मूलतः सुंदर असतात. त्यांचे अर्थवाही दृश्यरूप म्हणजे अक्षर. या अक्षरांना सूचक असा अर्थ चिकटलेला असतोच. अक्षराचे बहुतांशी रूप त्यात अंतर्भूत असतेच, त्याच रूपाला सुंदर करण्याचे काम पालव यांनी केले आहे. 'जेजे'तील कलाशिक्षण पूर्ण झाल्यावर काही दिवस त्यांनी तेथेच अध्यापनाचे काम केले; पण त्या साचेबंध कामात ते फार काळ रमले नाहीत. त्यांनी आपला वेगळा मार्ग निवडत कॅलिग्राफीच्या ध्यासाने सुलेखनावर लक्ष केंद्रित केले. ज्या काळात सुलेखनाला कला म्हणून मान्यता नव्हती, अशा वेळी पालव यांनी हे धाडस दाखविले. त्यानंतर त्यांनी 'रेड गार्डन' नावाने स्टुडिओ सुरू केला. यातील 'रेड' या शब्दाचा संबंध लालबागशी आहे. आपण ज्या परिसरात राहतो, त्याविषयी व्यक्त केलेली ही कृतज्ञता किंवा प्रेम आहे.

सर जेजे इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट येथे त्यांनी भारतीय; तसेच पाश्चात्त्य जाहिरात कला परंपरांचा अभ्यास केला. विशेषतः ग्राफिक डिझाइन, टायपोग्राफी आणि व्हिज्युअल कम्युनिकेशनच्या अभ्यासातून त्यांच्या कॅलिग्राफी कलेला नवे परिमाण मिळाले. याच काळात कॅलिग्राफीचे मर्मज्ञ श्री. र. कृ. जोशी यांच्याशी त्यांचा परिचय झाला. त्यांचे कॅलिग्राफी या विषयातील योगदान फार महत्त्वाचे आहे. त्यांनी खऱ्या अर्थाने विषयाची क्षितिजे विस्तारली आहेत. कॅलिग्राफी कलेतील तेच त्यांचे मार्गदर्शक आहेत. त्यांचे नाते गुरू शिष्याचे आहे.

'उल्का' या जाहिरात एजन्सीने पालव यांना शिष्यवृत्ती दिली. त्यांनी भारतीय लिपीत संशोधन करावे हे अपेक्षित होते. त्या काळात त्यांनी मोडी लिपीचा अभ्यास केला.

विविध लिपिंच्या अभ्यासासाठी पालव यांनी कश्मीर ते कन्याकुमारी अशी भारतभर यात्रा केली. त्यात त्यांनी विविध भाषा आणि अनेक लिपिंचे अवलोकन केले. या यात्रेत त्यांनी अनेक कला व शैक्षणिक संस्थांना भेटी दिल्या. अनेक खेड्यांत, गावांत, शहरांत अनेक डेमो प्रात्यक्षिके दिली. त्यातून कॅलिग्राफी कलेचा प्रसार झाला. यामुळे देशात अनेक calligrapher कॅलिग्राफीकार निर्माण झाले.

भारतात देवनागरी लिपीचा इतिहास प्राचीन आहे; परंतु आधुनिक काळात ती मुद्रित पुस्तके किंवा शालेय वापरापुरती मर्यादित राहिली होती. मात्र, अच्युत पालव यांनी देवनागरीला तिच्या या मर्यादित भूमिकेतून मुक्त करून तिला दृश्यकलेच्या बरोबरीने आणले.

त्यांच्या सुलेखनात अक्षरे केवळ वाचण्याचे साधन न राहता, ती दृश्यानुभवाचा अविभाज्य भाग बनतात. त्यांच्या रचनांमध्ये रेषा, वक्र, गोलाई, जाडी, विराम आणि रिक्त अवकाश यांचा अत्यंत सूक्ष्म आणि सुंदर वापर दिसतो. प्रत्येक अक्षर केवळ एक संकेत न राहता, एक जिवंत आकृती बनते.

अक्षर म्हणजे केवळ भाषा नसते. ते एक संस्कृतीचे, इतिहासाचे आणि संवेदनांचे प्रतीक असते. असा दृष्टिकोन त्यांच्या संपूर्ण कलेतून प्रकर्षाने दिसून येते. त्यांनी आपल्या उर्जाक्षरं (Urjakshra) या पुस्तकात सुलेखनकलेविषयी मते मांडली आहेत, त्यातून त्यांचे कला आणि सुलेखन संदर्भातील धारणा स्पष्ट होते.

'I like to be a dot.

It has existence but no dimensions.

I want to exist 'dot' way. Free, fascinating and floating...'- (Urjak-

shra, अच्युत पालव)

'मला बिंदू असायला आवडते.

त्याला अस्तित्व आहे; पण परिमाण नाही.

मला 'बिंदू' पद्धतीने अस्तित्व हवे आहे.
मुक्त, आकर्षक आणि तरंगणारे...'

'I like to be a dot' या वाक्यातील डॉट म्हणजे केवळ एक बिंदू नसून, अस्तित्वाचे अत्यंत सूक्ष्म; पण पूर्ण स्वरूपाचे प्रतीक आहे. बिंदूला परिमाण नसते, ना उंची, ना रुंदी, ना विस्तार. तरीही त्याचे अस्तित्व निर्विवाद असते. म्हणूनच पालव म्हणतात, की मला बिंदूसारखे व्हायचे आहे, अस्तित्वात असलेले; पण बंधनांपासून मुक्त.

बिंदू स्वतःमध्ये पूर्ण असतो. त्याला कोणत्याही आधार किंवा चौकटीची गरज नसते. नकाशातील प्रवासही बिंदूपासून सुरू होतो आणि कलेतील कोणताही आकार बिंदूपासून जन्म घेतो. त्यामुळे बिंदू हा एकाच वेळी आरंभ आणि परीघ या दोघांचे प्रतीक आहे.

'Free, fascinating and floating' या विधानातून बिंदूसारखे मुक्तपणे, भाररहितपणे आणि अवकाशात तरंगत अस्तित्व अनुभवण्याची इच्छा व्यक्त होते. कोणत्याही अपेक्षा, भूमिका किंवा ओळखीच्या दडपणातून मुक्त होऊन, फक्त 'असणे', ही त्यातील मूलभूत तत्त्वज्ञानाची जाणीवच आहे.

अशा प्रकारे बिंदूसारखे अस्तित्व म्हणजे, साधेपणात विशालता, सूक्ष्मतेत अनंतता, आणि मुक्ततेत सौंदर्य शोधण्याचा एक विचार आहे. बिंदू, सृष्टीचा उद्गाता आणि थेंब बिंदूसदृश असतो. त्याच्याविषयी पालव यांना आसक्ती आहेच.

पालव आकार, स्ट्रोक, आणि पॅलेटचे नाते खूप लालित्यपूर्ण भाषेत उलगडून सांगतात.

'Strokes and shapes

jump from my palette

like galloping horses,

in pursuit of excellence and
harmony'- (Urjakshra, अच्युत पालव)

'स्ट्रोक आणि आकार

माझ्या पॅलेटमधून उडी मारतात

सरपटणाऱ्या घोड्यांप्रमाणे,

उत्कृष्टता आणि सुसंवाद साधण्यासाठी'

अवकाशाला सामोरे जात असताना त्यांना आलेला अनुभव ते अशा प्रकारे सांगतात, प्रत्येक अनुभवात आपण स्वतःलाच पुन्हा कसे नव्याने सापडत जातो, ते सांगतात. साधनेतून स्वतःच, स्वतःला उमगणे म्हणजेच, सृष्टीच्या खऱ्या स्वरूपाचे दर्शन होण्यासारखे आहे.

कलाकाराच्या पॅलेटवरून उठणारे स्ट्रोक आणि आकार वेगाने धावणाऱ्या घोड्यांसारखे उड्या मारतात. ती रेषा, रंगांचे स्पंदन आणि आकारांची चळवळ आहे, हे सगळं एकाच ध्येयासाठी धावत असतात, उत्कृष्टता आणि सौंदर्यपूर्ण सामंजस्य साधण्यासाठी. कलाकाराच्या हातातील प्रत्येक हालचाल ही सर्जनाच्या त्या शर्यतीचा भाग बनते, जिथे कला एकाच वेळी जोमदार आणि सुंदर रूपात प्रकटत असते.

'Am scared to put the first dot,
but then realise,

Fear always collapses at the
first dot.' - (Urjakshra, अच्युत पालव)

'पहिला बिंदू टाकायला भीती वाटते; पण
नंतर लक्षात येते की,

भीती नेहमीच पहिल्या बिंदूवर कोसळते.'

सहजता माझ्या शाई आणि ब्रशमधूनच खऱ्या अर्थाने समजली. एका झटक्यात ब्रश फिरला आणि कलाकृती तयार झाली. पाहणारे थक्क होऊन 'वा!' म्हणत कौतुक करत असतात; पण मी मात्र स्वतःच आश्चर्यचकित होऊन स्तब्ध उभा राहतो. कारण जे घडले ते इतके नैसर्गिक, अनपेक्षित आणि सहज होते, की मला स्वतःलाही त्याचा विस्मय वाटला. पालव यांचे चित्र कसे घडत जाते हे या शब्दांमधून व्यक्त होते. संदर्भात कल्पना येते.

पालव यांच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे, आयआयटी पवई येथे झालेले 'अक्षरयोग' नावाचे आंतरराष्ट्रीय संमेलन. त्यात देश-विदेशांतून अनेक टायपोग्राफी करणारे कलाकार उपस्थित होते. त्यातील वर्नर स्नायलर याजर्मन कॅलिग्राफरशी त्यांचा परिचय झाला. पालवांच्या सुलेखनाने ते खूप प्रभावी झाले. त्यांनी पालवांना जर्मनीत आमंत्रण दिले, हा त्यांचा पहिला परदेश











दौरा ठरला. जर्मनीत व्हॉर्नर स्नाईडलर आणि क्यातमरबरोबर त्यांनी काम केले आणि त्यांना वेगळी दिशा मिळाली. त्यानंतर भारतात परतल्यावर देवनागरी लिपीत प्रचंड काम केले. त्यातून पालव यांचे कार्य मोठे होत गेले. एका अर्थाने पालव घडत गेले. त्या नंतर पालव यांनी अनेक देशांमध्ये कार्यशाळा, संबोधन शिबिरे, व्याख्याने, प्रदर्शने भरवली. फ्रान्समध्ये महत्त्वाचे प्रकल्प केले. जर्मनीच्या आर्काईव्हल म्युझियमने त्यांच्या कलाकृतीचे जतन केले आहे. रशिया, जर्मनी, अल्जेरिया, फ्रान्स, दुबई यांसारख्या देशांमध्ये त्यांच्या कलेची प्रदर्शने झाली आहेत. भारतीय सुलेखनाला प्रतिनिधित्व मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यामुळे देवनागरी लिपीला एक आंतरराष्ट्रीय ओळख प्राप्त झाली.

अच्युत पालव यांच्या सुलेखनाची विशेषता म्हणजे त्यात परंपरेचा गंध आणि आधुनिकतेचे भान यांचा सुंदर संगम दिसतो. त्यांनी देवनागरीबरोबरच ब्राह्मी, मोडी, शारदा, आणि प्राचीन भारतीय लिपींचा अभ्यास केला. हा केवळ संशोधनापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो त्यांच्या प्रयोगशील कलाकृतींचा आधार झाला. त्यांच्या कलेत प्राचीन हस्तलिखितांचे गांभीर्य आहे, संतवाङ्मयाची आध्यात्मिकता आहे आणि आधुनिक ग्राफिक डिझाइनची सुस्पष्टता आहे. यामुळे त्यांची कॅलिग्राफी काळाच्या चौकटीत न अडकता आधुनिक पटलावर चर्चेत आहे.

अनेक कलाकारांना डिजिटल माध्यम आले, की पारंपरिकता मागे पडण्याची भीती वाटते; पण अच्युत पालव यांनी डिजिटल विश्वालाच एक नवी संधी म्हणून स्वीकारले. त्यांनी देवनागरी, टायपोग्राफी, डिजिटल फॉन्ट डिझाइन आणि ग्राफिक माध्यमांतून भारतीय सुलेखन कलेला जागतिक परिभाषेचे बळ दिले.

पुस्तकांची मुखपृष्ठे, चित्रपटांचे शीर्षक, जाहिराती, प्रदर्शनांची निमंत्रणे, फॅशन शो अशा अनेक क्षेत्रांत त्यांच्या अक्षरशैलीने एक वेगळाच प्रभाव निर्माण केला. त्यांनी दाखवून दिले, की भारतीय लिपी ही केवळ भूतकाळाचे स्मरण नसून, आधुनिक काळाशी जुळवून घेण्यास ती समर्थ आहे. हे त्यांनी पुन्हा-पुन्हा सिद्ध केले.

पालव यांनी स्वतःला कोणत्याही शैलीत अडकून न घेता, अनेक प्रकारे काम केले आहे. अक्षर किती सुंदर असते, किती सुंदर होऊ शकते हे दाखवणारे अनेक प्रयोग केले. त्यांनी अनेक साधने वापरली. ब्रश या पारंपरिक साधनाचा वापर ते कौशल्याने करतातच; परंतु त्यांनी अनेक साधने निर्माण केली आहेत. त्यामुळे त्यांना कॅलिग्राफी कलेला समकालीन कलेच्या मोठ्या परिदृश्यात स्थान मिळून देता आले.

अच्युत पालव हे केवळ कलाकार नाहीत, तर एक संवेदनशील शिक्षक आणि मार्गदर्शकही आहेत. त्यांची शिकवण्याची पद्धत केवळ तांत्रिक नसून, तिला आध्यात्मिक बैठक आहे. ते आपल्या विद्यार्थ्यांना सांगतात, की कॅलिग्राफी म्हणजे केवळ हाताचे नव्हे, तर मनाचाही व्यायाम आहे. रेषा काढताना आत्मा शांत हवा, श्वास लयीत हवा आणि मन केंद्रित हवे. त्यांच्या शिकवणीत ध्यान, श्वसनाचे भान, शरीर-मन-संवाद या गोष्टींना विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे त्यांचे विद्यार्थी केवळ कॅलिग्राफी शिकत नाहीत, त्याबरोबर त्यांची संवेदनशक्ती विकसित होत असते.

पालव यांनी सुलेखनाला केवळ प्रदर्शनापुरते सीमित न ठेवता सार्वजनिक भित्तीलेखन, साहित्य संमेलने, सांस्कृतिक महोत्सव, भाषा जतन चळवळी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या अक्षरातून भाषेचे सौंदर्य आणि त्यामागील सांस्कृतिक अर्थ लोकांपर्यंत पोहोचतो. त्यामुळे त्यांचे कार्य हे सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भातदेखील महत्त्वाचे ठरते.

मराठी आणि देवनागरीप्रति असलेली



त्यांची निष्ठा आणि प्रेम त्यांच्या प्रत्येक कामातून दिसून येते. त्यांनी आपल्या कलेद्वारे भाषा आणि लिपी जतनाच्या चळवळीत मोलाची भूमिका बजावली आहे.

कॅलिग्राफी ही केवळ अक्षरांची मांडणी नसून, ती शाई, साधन आणि कलाकाराच्या मनःप्रवाहाने विणलेली एक दृश्य-रचना आहे. अक्षरांच्या पलीकडे जाऊन ती भावना, ताल, लय आणि सौंदर्य यांच्या संगतीने उभी राहते. या कलेत असलेली उत्स्फूर्तता, गती, स्ट्रोक आणि आकार ही चार तत्त्वे केवळ तांत्रिक अंग नव्हे, तर कलाकाराच्या अंतरंगाचे प्रतिबिंब बनून उमलतात.

मनातल्या विचारांचे आणि भावनांचे तरंग जेव्हा हातातून उमलतात, तेव्हा प्रत्येक अक्षर हे एक सहज उमटलेली अनुभूती बनते. ती कधीही नियोजित नसते. ते केवळ उत्स्फूर्ततेतून जन्मलेले स्ट्रोक असतात. तो कलाकाराचा श्वास, मानसिकता, आनंद आणि शंका असे, सगळे त्यात लोप पावतात. म्हणूनच पालव यांच्या कॅलिग्राफी कलेत उत्स्फूर्त स्ट्रोक म्हणजे शाईत ओथंबलेल्या भावनांचा प्रभावी अविष्कार आहे.

आकार, सुलेखनाला संपूर्णत्व देणारे तत्त्व म्हणजे अक्षराची रचना, त्यातील संतुलन, त्याचे प्रमाण, त्यामधील मोकळी जागा, आकारमान म्हणजे सुलेखनाचा सांगाडा. आकार म्हणजे शिस्तबद्धता, परिपूर्णता आणि दृक-अनुभवातील समृद्धता. जसे कवितेला वृत्त हवे, तसे सुलेखनाला आकाराचा बांधेसूद आधार हवा. अक्षरांची उंची, विस्तार, वळण आणि त्यांच्या परस्परातील मांडणी हेच कला आणि भाषेच्या सीमेवर उभे असलेले एक सुंदर वैभव आहे.

पालव यांचे कॅलिग्राफी, ही एक अशी कला आहे, की जी केवळ वाचली जात नाही, तर 'अनुभवली' जाते. ती दृश्यरचना असूनदेखील ध्वनीची आठवण करून देते, ती स्थिर असूनही प्रवाहाचा भास निर्माण करते आणि ती अक्षरांनी बनलेली असूनही शब्दांच्या पुढे जाऊन भावनांचे सुंदर जग उभे करते.

भारतातील प्रख्यात कॅलिग्राफर आणि भारतीय लिपी संस्कृतीचे प्रमुख प्रवर्तक म्हणून पालव यांचे नाव आहे. यांनी संपूर्ण आयुष्य भारतीय लिपींच्या सौंदर्य, अभिव्यक्ती आणि डिझाइन मूल्यांना जागतिक पातळीवर परिचित करून देण्यासाठी अर्पण केले आहे. देवनागरीसह अनेक भारतीय लिपींमध्ये त्यांनी अभिनव प्रयोग केले. फ्यूज़न कॅलिग्राफी आणि अपारंपरिक माध्यमांचा वापर करून कला अधिक समृद्ध केली आहे. त्यांची प्रदर्शने, कार्यशाळा, प्रात्यक्षिके व व्याख्यानांमुळे भारतीय लिपींची कलात्मक आणि व्यावसायिक क्षमता अधोरेखित झाली आहे. 'अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफी' आणि भारतातील पहिला 'कॅलिफेस्ट' या उपक्रमांद्वारे त्यांनी सुलेखनासाठी नवीन दालने उघडली.

अच्युत पालव यांचे कार्य म्हणजे भारतीय संस्कृतीच्या मुळाशी असलेल्या अक्षरपरंपरेला नवजीवन देणे आहे. आज जागतिक पातळीवर भारतीय सुलेखनाची जी ओळख निर्माण होत आहे, त्यामागे अच्युत पालव यांचा सिंहाचा वाटा आहे. ते केवळ एक कॅलिग्राफीकार नाहीत, तर भारतीय अक्षरपरंपरेचे आधुनिक वारसदार आहेत. त्यांच्या योगदानामुळे भारतीय कॅलिग्राफी ही भविष्याच्या कलाभूमीवर उभी राहिलेली एक सशक्त परंपरा बनली आहे. पालव यांना अनेक पुरस्कार मिळाले असून, त्यात कॅग, राज्य पुरस्कार, दक्षिण कोरियातील 'बेस्ट ऑफ बेस्ट' अशा मानाच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्कारांचा समावेश आहे. त्यांच्या कार्याची दाखल घेऊन भारत सरकारने त्यांना २०२५ चा पद्मश्री (कला) पुरस्कार देऊन गौरविले आहे. नुकताच सीबीएसई, आयसीएसई यांच्या अभ्यासक्रमात पालवांच्यावर 'सुलेखनकार' असा धडा अभ्यासक्रमात ठेवण्यात आला आहे. त्यामुळे सुलेखन कलेची ओळख पुढील पिढीला होईल यात शंका नाही.

हा सन्मान केवळ अच्युत पालव यांचा नसून, कॅलिग्राफी कलेचादेखील आहे. नृत्य, नाटक, संगीत, साहित्य, चित्र, शिल्प आदी कलांप्रमाणे पालव यांनी राष्ट्रपती भवनात कॅलिग्राफी कलेला सन्मान मिळून दिला आहे. कलाक्षेत्रात सुलेखन कलेसाठी पहिल्यांदाच पद्मश्री पुरस्कार देण्यात आहे.



शिवछत्रपती अन् गडकोट हे नाते सोळाव्या शतकापासून आजपर्यंत इतिहास, भूगोल अन् वारसा अभ्यासकांना आकर्षित करीत आहे. 'युनेस्को वर्ल्ड हेरिटेज साइट' अर्थात जागतिक वारसास्थळ म्हणून १२ गडकोटांची निवड होणे, ही प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची गोष्ट आहे. पुढील काळात पुरातत्त्व खाते आणि सरकारी यंत्रणेसह या वारशासाठी नव्या पिढीचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. जागतिक वारसा झालेल्या या गडकोटांची ओळख करून देणारी ही नवी लेखमाला सुरू करत आहोत.



**प्रसाद पवार**

..................................

# महाराष्ट्राचा वारसा जगाच्या नकाशावर

शिवकालापूर्वी महाराष्ट्रात गडकोट नव्हते, असे नाही. सातवाहनांपासून यादवांपर्यंत आणि आदिलशाही–निजामशाही काळापर्यंत महाराष्ट्राची भूमी दुर्गवैभवाने नटलेली होती. तरीही गड म्हटला, की आपल्याला आजही सर्वप्रथम आठवतो तो शिवकाळ. हा प्रश्न साहजिक आहे, की आधीही अस्तित्वात असलेले गड शिवछत्रपतींच्या काळातच आपल्याला इतके जिव्हाळ्याचे, इतके आत्मीय का वाटतात? याचे उत्तर केवळ लष्करी यशात नाही, तर शिवछत्रपतींच्या दुर्गदृष्टीत दडलेले आहे. त्यांच्या आज्ञापत्रात गडकोटांना दिलेले महत्त्व पाहिले की हे स्पष्ट होते— "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग."

गड म्हणजे केवळ दगडमातीची रचना नव्हे, तर राज्याचे मूळ, खजिना, सैन्यबळ, वसतिस्थळ, सुखनिद्रागार आणि प्राणसंरक्षण होते. दुर्गांना अशी सर्वांगीण प्रतिष्ठा देणारा राजा विरळाच. म्हणूनच शिवकाळातील गडकोट आपल्या इतिहासाशीच नव्हे, तर संस्कृतीशी आणि भावनांशीही घट्ट जोडले गेले. दीपावलीत अंगणात उभे राहणारे लहानसे गड हाच तर त्या संस्कारांचा पुरावा आहे. अशा या गडकोटांच्या एकत्रित वैभवाचा वेध घेऊ या आणि मग त्यांच्या इतिहासात डोकावू.

शिवकालापूर्वी महाराष्ट्रात गडकोट होते का? तर होते... मग शिवकालातच असे काय घडले, की गडकोटांचा हा वारसा आपल्याला शिवकाळाशी अधिक तादत्म्य साधणारा वाटतो... याचे उत्तर शिवछत्रपतींच्या आज्ञापत्रात दडलेले आहे.

*संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग*
*गडकोट म्हणजे राज्याचे मूळ,*
*गडकोट म्हणजे खजिना..*
*गडकोट म्हणजे सैन्याचे*
*बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्षी*
*गडकोट म्हणजे आपली*
*वसतिस्थळे, गडकोट म्हणजे*

*सुखनिद्रागार किंबहुना गडकोट म्हणजेच आपले प्राणसंरक्षण...*

या वाक्यांमधून शिवकाळातली गडकोटांविषयीची दृढ भावना आपल्या लक्षात येते. राज्याचे सार म्हणतानाच गडकोटांना राज्यलक्ष्मी, सुखनिद्रागार, वसतिस्थळ आणि प्राणसंरक्षण याची उपमा देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. गडकोट आधीही होते; पण जितके प्रेम शिवछत्रपतींनी गडांवर केले तितके क्वचितच कुणा नेतृत्वाने केले असावे आणि याच कारणास्तव दीपावलीतही अंगणात गडकोट उभारण्याची परंपरा सुरू झाली. गडकोट हे आपल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत. याच कारणास्तव आज ते जागतिक वारशापर्यंत पोहोचू शकले. या गडांची एकत्रित ओळख करून घेऊ या आणि मग त्यांची सविस्तर माहिती जाणून घेऊ.



## १. शिवनेरी (जि. पुणे) :



शिवछत्रपतींचे जन्मस्थान असण्याबरोबरच शिवनेरीचा इतिहास त्याच्या पोटातील लेणींमुळे आणखी हजारएक वर्षे मागे जातो. जुन्नर (जुनेर, जीर्णनगर) ही जुनी बाजारपेठ असल्यामुळे परिसरातील घाटवाटा, प्रशासन या सगळ्याचे नियंत्रण येथून होत असे. सात दरवाजांची मालिका, शिवजन्मस्थान, कडेलोट, गंगा-यमुना ही टाकी, अंबरखाना, बदामी तलाव, गडाच्या पोटातील असंख्य लेणी आणि शिवाईदेवीचे स्थान यामुळे शिवनेरीचा इतिहास सुवर्णाक्षरांत नोंदला गेला आहे.

## २. राजगड (जि. पुणे) :

शिवकालाचा आधारस्तंभ आणि 'गडांचा राजा आणि राजांचा गड' अशी ओळख. स्वराज्यस्थापनेचा श्रीगणेशा झाल्यावर तोरण्याजवळचा बिरमदेव वा मुरूमदेव वा शहामृग या नावाने ओळखला जाणारा डोंगर 'राजगड' होऊन स्वराज्याची राजधानी झाला. शिवछत्रपतींचा सर्वाधिक, म्हणजे २५ वर्षांचा सहवास राजगडाला लाभला. (इसवी सन १६४५ ते १६७०) स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचा मान. पद्मावती, सुवेळा आणि संजीवनी या अद्वितीय माच्या, बालेकिल्ला, माच्यांचे लष्करीदृष्ट्या केलेले (दुहेरी-तिहेरी तटबंदी) बांधकाम, जलव्यवस्थापन ही वैशिष्ट्ये.

## ३. लोहगड (जि. पुणे) :

लोहासारखा भक्कम आणि मजबूत गड अशी ख्याती. गडावरील लक्ष्मीकोठी त्याच्या पुरातन अस्तित्त्वाचा पुरावा देते. जवळच्या कार्ले-भाजे लेणींमुळे लोहगडही सुमारे हजार-दीड हजारवर्षांपूर्वीचा वारसा सांगतो. अप्रतिम दरवाजांची मालिका, गडावरील मंदिरे, तलाव, विंचूकाटा ही गडापासून सुटावलेली दुर्गम माची व त्याखालचे घनदाट जंगल यामुळे मावळातला दुर्गम दुर्ग अशी ख्याती. सुरतेवरून आणलेली संपत्ती राजगडावर आणण्यापूर्वी येथील लक्ष्मीकोठीत ठेवल्याचे सांगितले जाते. बोरघाट संरक्षक आणि शिवछत्रपतींचा सहभाग असलेल्या उंबरखिंडीतील गनिमी काव्याच्या लढाईचा (इसवी सन १६६१) साक्षीदार.





### ४. रायगड (जि. रायगड) :

विस्तारित स्वराज्याची दुसरी राजधानी होण्याचा मान. (इसवी सन १६५५ ते इसवी सन १६८९) डच, पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच या परकीय सत्तांच्या प्रतिनिधींनी भेट दिलेली गडवास्तू. शिवछत्रपतींचा राज्याभिषेक (इसवी सन १६७४), त्यांचे निधन (इसवी सन १६८०) याचा साक्षीदार. छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि संपूर्ण कारकिर्दीचा साक्षीदार. लष्करी बांधणी, जलव्यवस्थापन, मंदिरे, राजसभा, सर्वाधिक वाडे यासह शिवछत्रपतींचे सर्वाधिक वास्तव्य (सुमारे दहा वर्षे) झालेली दुसरी गडवास्तू (इसवी सन १६७० ते १६८०). कोकण किनारपट्टीवर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने मोक्याची व दुर्गम जागा.

### ५. प्रतापगड (जि. सातारा) :

शिवछत्रपतींच्या आदेशानुसार पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांनी बांधलेला (इसवी सन १६५६) महाबळेश्वरजवळील दुर्गम जावळीच्या खोऱ्यातला शिवकालीन गड. वनदुर्ग आणि गिरीदुर्ग हे वैशिष्ट्य. आटोपशीर माथा, माची यासह स्वराज्यदैवत आई भवानीमातेची स्थापना केल्याने गडाचे वेगळे महत्त्व. जनीच्या टेंबावर १० नोव्हेंबर १६५९ रोजी विजापुरी सरदार अफजल खानाचा वध आणि त्यानंतर भवानीमातेची स्थापना (इसवी सन १६६२) या घटना घडल्या. साडेतीनशे वर्षांपूर्वी गडावर पहिले देवस्थान त्याच्या व्यवस्थेसह स्थापन. केदारेश्वर, राजवाडा, तळी, टाक्या, महाद्वार आणि आजही शिवकालीन चालीरीती जपणारा, राबता असणारा गड.

### ६. साल्हेर (जि. नाशिक) :

महाराष्ट्रातील सर्वोच्च गडमाथा अशी ख्याती. दरवाजांची मालिका, गडवास्तू, परशुराम मंदिर यासह इतिहासात साल्हेरचे युद्ध प्रसिद्ध आहे. इसवी सन १६७२ मध्ये गडपरिसरात झालेली लढाई शिवकालातील मराठा साम्राज्य आणि मुघल यांच्यातील सर्वाधिक मोठे द्वंद्व मानले जाते. या लढाईत मराठ्यांचा विजय झाला आणि मैदानी संघर्षातही मुघलांचा पराभव करता येतो, हा आत्मविश्वास त्याने दिला. इतिहासात या लढाईची अनेक वर्णने आढळतात. बागलाण प्रांतातून स्वराज्याची सीमा साल्हेर-सालोट्यापासून सांगितली जाते. सुरतेहून आणलेल्या संपत्तीचा काही भाग येथे ठेवण्यात आला होता.

### ७. पन्हाळा (जि. कोल्हापूर) :

बाराव्या शतकात भोज राजाने बांधलेला हा गड दक्षिणेतला स्वराज्यातला सर्वांत महत्त्वाचा गड होता. अफजलखान वधानंतर स्वराज्यात हा गड दाखल झाला. (२८ नोव्हेंबर १६५९) महाराजांनी रात्री मशालींच्या उजेडात गड पाहिला. विस्तृत माथा आणि वास्तूंमुळे पन्हाळा राजांच्या आवडत्या गडांपैकी एक होता. विजापूरचा मुलूख या गडासह स्वराज्याला जोडला गेला. इतिहासात पन्हाळा ते विशाळगड हा संग्राम प्रसिद्ध आहे. छत्रपती ताराराणींच्या काळात काही काळ स्वराज्याची राजधानी होण्याचा मानही या गडाला मिळाला.





### ८. खांदेरी (जि. रायगड) :

मुंबईतल्या इंग्रजांची नाकेबंदी करण्यासाठी खांदेरी या बेटावर बांधलेला गड. खांदेरी बेट मुंबईजवळ असल्याने महाराजांनी त्याचा उपयोग मुंबई व परिसरातील इंग्रज आणि सिद्दीवर वचक ठेवण्यासाठी होणार हे हेरले. मायनाक भंडारी यांच्या नेतृत्वाखाली एकीकडे गडबांधणी व एकीकडे लढाई असे करत त्याचे काम पूर्ण झाले. इसवी सन १६७२ मध्ये पहिला प्रयत्न आणि त्यानंतर १६७९ मध्ये ते पूर्णत्त्वास गेले. खांदेरी म्हणजे शिवरायांनी शेवटचा श्वास घेण्यापूर्वी इंग्रजांचा पराभव केल्याचा साक्षीदार. त्याचा मान म्हणून भारतीय नौदलाने त्याचे नाव पाणबुडीला दिले.

### ९. सिंधुदुर्ग (जि. सिंधुदुर्ग) :

शिवछत्रपतींच्या आदेशानुसार मालवणजवळच्या कुरटे बेटावर २५ नोव्हेंबर १६६४ रोजी सिंधुदुर्गाचे काम सुरू झाले. तीन वर्षांनी इसवी सन १६६७ मध्ये ते पूर्ण झाले. मराठा आरमारासाठी सुरक्षित स्थळ आणि जंजिऱ्याच्या सिद्दीचा व इतर परकीयांचा बंदोबस्त, मराठा साम्राज्याची सागरी बाजू सुरक्षित करणे या हेतूने तो बांधला गेला. ब्रिटिश अंमल वगळता देश स्वतंत्र होईपर्यंत भगवा ध्वज फडकत ठेवणारा एकमेवाद्वितीय जलदुर्ग. शिवलंका अशी ओळख असून, ८४ बंदरांत अशी जागा नसल्याचे सांगितले जाते. गडावर शिवछत्रपतींचे मंदिर आहे. गडाची तटबंदी बांधताना पायात शिसे ओतण्याचा अभिनव प्रयोग राजांनी केला.

### १०. विजयदुर्ग (जि. सिंधुदुर्ग) :

इसवी सन १६६४ मध्ये शिवछत्रपतींनी घेरिया हा गड जिंकून त्याचे नाव 'विजयदुर्ग' असे ठेवले. मूळ बांधकाम वाढवून त्याला तिहेरी तटबंदी केली. या गडाची वास्तूशांत करून मराठा आरमाराचा तळ कायम केला. कान्होजी आंग्रे व धुळप घराण्याची कारकीर्द विजयदुर्गाच्या साक्षीने बहरली. महाराजांनी जिंकल्यापासून दीर्घ काळ स्वराज्यात राहिलेला गड. समुद्रावरील गडसाखळीतला महत्त्वाचा दुवा. इसवी सन १८६८ मध्ये ब्रिटिश शास्त्रज्ञ सर जे. नॉर्मन लॉकयर यांनी खग्रास सूर्यग्रहणाचा अभ्यास करण्यासाठी या निवड केली होती. पुढे हेलियमचा शोध विजयदुर्ग इथूनच लागला.

### ११. सुवर्णदुर्ग (जि. रत्नागिरी) :

शिवरायांनी इसवी सन १६६० ते १६६५ दरम्यान या जलदुर्गाची बांधणी केली आणि त्याला अधिक मजबूत केले. सुवर्णदुर्ग हा मराठा आरमाराच्या दृष्टीने महत्त्वाचा जलदुर्ग असून, 'दर्यावरील शिवाजी' अशी ओळख असलेल्या कान्होजी आंग्रे यांच्या कारकिर्दीचा प्रारंभ इथून झाला. हर्णे बंदर सुरक्षित करणाऱ्या या जलदुर्गाला कनकदुर्ग, फत्तेगड आणि गोवा अशा तीन किनारीदुर्गांची संरक्षणात्मक फळीही लाभली आहे. समुद्रावरील जलदुर्गसाखळीतला महत्त्वाचा गड.

### १२. जिंजी (तमिळनाडू) :

शिवकाळात 'चंजी' वा 'सेंजी' असे या गडाचे उल्लेख आहेत. शिवकाळात स्वराज्याची तिसरी राजधानी होण्याचा मान या गडाला लाभला. राजगिरी, कृष्णगिरी आणि चंद्रयानदुर्ग अशा तीन गडांनी मिळून जिंजी गड बनला असून, महाराजांनी दक्षिण दिग्विजयात तो स्वराज्याला जोडला आणि त्याचे बांधकामही केले. रायगडावरून निघून छत्रपती राजाराम महाराज जिंजीला पोहोचले. (नोव्हेंबर १६८९) त्यानंतर महाराष्ट्रातील मुघलांची लष्करी मोहीम जिंजीकडे गेल्याने येथील स्वराज्यरक्षकांना सावरण्यासाठी वेळ मिळाला. छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत जिंजीची व्यवस्था त्यांच्या भगिनी अंबिकाबाई आणि दाजी हरजीराजे महाडिक यांच्याकडे होती.

*(लेखक हे 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीमध्ये सिनीअर डिजिटल कंटेंट क्रिएटर म्हणून कार्यरत असून, गडभ्रमंतीसह व वारसा अभ्यास हा त्यांचा आवडीचा विषय आहे.)*

# नव्या वाटा-नवे उद्यम

आजच्या नव्या युगात नवकल्पना आणि उद्योजकता हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली ठरते आहे. विद्यार्थ्यांनी, संशोधकांनी आणि तरुण व्यावसायिकांनी केलेल्या कल्पना प्रयोगशाळेतच न थांबता प्रत्यक्ष समाजोपयोगी उत्पादने व सेवा म्हणून साकार व्हाव्यात, यासाठी स्टार्टअप संस्कृती महत्त्वाची भूमिका बजावते. या सदरातून वाचकांना विविध स्टार्टअप उपक्रम, तरुण उद्योजकांचे अनुभव, यशस्वी कल्पनांची उदाहरणे आणि नव्या संधींबाबत प्रेरणा मिळेल. 'कल्पनेतून कृतीकडे' या प्रवासाची कहाणी मांडत हे सदर उद्योजकतेकडे वाटचाल करू इच्छिणाऱ्यांसाठी दिशादर्शक ठरेल.

## नव्या उद्योजक पिढीला घडवणारे नवोन्मेष केंद्र

'भाऊ इन्स्टिट्यूट' नवोन्मेष आणि उद्योजकतेचे एक प्रभावी केंद्र बनले आहे. मूल्याधिष्ठित नेतृत्व, जागतिक नेटवर्क, सशक्त पायाभूत सुविधा आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण यांच्या जोरावर ही संस्था विद्यार्थ्यांना आणि नवोन्मेषकांना शाश्वत उद्योग उभारण्यासाठी सज्ज करत आहे.




**मंदार जोशी**

प्रमुख कार्यकारी अधिकारी, भाऊ इन्स्टिट्यूट


पुण्याच्या गतिमान नवोन्मेष परिसंस्थेत एक प्रभावी व प्रेरक नाव म्हणून COEP चे 'भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इनोव्हेशन, आंत्रप्रेन्युअरशिप अँड लीडरशिप' उदयास आले आहे. २०१७ साली सेक्शन ८ अंतर्गत नफारहित संस्थेच्या रूपात स्थापन झालेली ही संस्था म्हणजे भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या (DST) सहकार्याने कार्यरत असलेले टेक्नॉलॉजी बिझनेस इन्क्युबेटर (TBI) आहे. अल्पावधीतच 'भाऊ इन्स्टिट्यूट'ने भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेत स्वतःची ठळक ओळख निर्माण केली आहे.

'भाऊ इन्स्टिट्यूट'ची संकल्पना भारतातील काही मान्यवर शिक्षणतज्ज्ञ व उद्योगनेत्यांच्या दूरदृष्टीतून साकार झाली. 'फ्लुकॉन'चे संस्थापक प्रा. संजय इनामदार ('भाऊ'चे सह-संस्थापक), AICTE चे माजी अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे आणि 'काळे कन्सल्टंट्स लिमिटेड'चे संस्थापक अध्यक्ष श्री. नरेंद्र काळे ('भाऊ'चे सह-संस्थापक) यांच्यासह अनेक उदार सहकाऱ्यांनी या संस्थेचा पाया घातला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे 'भाऊ इन्स्टिट्यूट' केवळ इन्क्युबेटर न राहता एक सशक्त विचारपीठ बनले आहे.

'भाऊ' म्हणजे मोठा भाऊ, केवळ लाड न करता आधार देणारा, धाक न दाखवता मार्गदर्शन करणारा आणि अपेक्षा न ठेवता प्रोत्साहन देणारा हा विचार 'भाऊ इन्स्टिट्यूट'च्या कार्यपद्धतीचा गाभा आहे. उद्योजकांना तयार साचे न देता त्यांच्या क्षमतेचा शोध घेण्यास आणि स्वतःचा मार्ग घडवण्यास प्रोत्साहन दिले जाते.

स्वयं शासन, शाश्वत आणि विस्तारक्षम पद्धतीने उद्योजकतेचा विकास करणे हे 'भाऊ इन्स्टिट्यूट'चे प्रमुख ध्येय आहे. विविध इन्स्टिट्युशन्स इनोव्हेशन कौन्सिल्स (IICs) आणि अभियांत्रिकी संस्थांशी सहकार्य करत, ही संस्था भारतभर उद्योजक संस्कृती रुजवण्याचे कार्य करत आहे.

**राष्ट्रीय पातळीवरील दिशा :** 'भाऊ इन्स्टिट्यूट' शाश्वत, सामाजिकदृष्ट्या





जबाबदार आणि परिणामकारक स्टार्टअप परिसंस्था उभारण्यावर भर देते. एक मॉडेल म्हणून ती भारतभर राबवता येईल अशी आहे. सध्याचा काळ हा परिवर्तनकारी तंत्रज्ञानाचा काळ आहे. 'भाऊ इन्स्टिट्यूट'ने अशाच क्षेत्रांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. त्यात इलेक्ट्रिक व स्मार्ट मोबिलिटी, आरोग्य तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता व इंटरनेट ऑफ थिंग्ज, तळागाळातील नवोन्मेष; तसेच अक्षय ऊर्जा अशा क्षेत्रांचा समावेश आहे.

जागतिक स्तरावरील मार्गदर्शक, गुंतवणूकदार आणि उद्योगातील भागीदारांच्या सहयोगातून, नव्या कल्पनांना यशस्वी उद्योगात रूपांतरित करण्यासाठी आवश्यक दिशा आणि साधने येथे उपलब्ध करून दिली जातात.

COEP टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी (पूर्वीचे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे) यांच्याशी असलेले घनिष्ठ सहकार्य हा 'भाऊ इन्स्टिट्यूट'ला मिळालेला भक्कम शैक्षणिक व तांत्रिक आधार आहे. स्टार्टअप्सना प्रगत प्रयोगशाळा, अद्ययावत पायाभूत सुविधा आणि COEP च्या बौद्धिक परिसंस्थेचा लाभ मिळतोच, शिवाय COEP मधील प्राध्यापकांचे मार्गदर्शन स्टार्टअप्सच्या प्रोटोटाइप विकासाला विशेष चालना देते.

नवोन्मेष हे सीमांनी बांधलेले नसते, या तत्त्वावर विश्वास ठेवत 'भाऊ इन्स्टिट्यूट'ने आंतरराष्ट्रीय उद्योजक, गुंतवणूकदार आणि इन्क्युबेटर्सशी सक्रिय सहकार्य निर्माण केले आहे. त्यामुळे स्टार्टअप्सना जागतिक संधींचे नवे क्षितिज उपलब्ध होण्याच्या शक्यता खूप वाढल्या आहेत.

जागतिक दर्जाच्या कल्पनांसाठी सुसज्ज पायाभूत सुविधा हे या केंद्राचे वैशिष्ट्य आहे. २६,००० चौरस फूट क्षेत्रफळाची, तीन मजली अत्याधुनिक इमारत, आधुनिक प्रयोगशाळा, को-वर्किंग स्पेस आणि सहयोगात्मक क्षेत्रांनी सुसज्ज असून, येथे सर्जनशीलता व डीप-टेक प्रयोगांसाठी पोषक वातावरण निर्माण केले आहे.

शिका. उभारा. विस्तार करा (Learn. Incubate. Integrate) अशा विकासाच्या तीन टप्प्यांचा विचार यात केलेला आहे.

**शिका (Learn):** या टप्प्यात अनुभवाधारित शिक्षणावर भर दिला जातो— केस स्टडीज, फील्डवर्क, सिम्युलेशन लॅब्स; तसेच कार्यरत उद्योजकांचे मार्गदर्शन यांचा समावेश असतो.

**उभारा (Incubate):** या टप्प्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम, सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह आणि पर्यावरणपूरक स्टार्टअप्सना इन्क्युबेशन, मेंटॉरशिप, उद्योग व गुंतवणूकदार संपर्क यांचा लाभ घेता येतो; तसेच विविध शासकीय व कॉर्पोरेट निधी योजना उपलब्ध होण्याची संधी मिळते.

**विस्तार करा (Integrate):** या टप्प्यात स्टार्टअप्स गुंतवणूक स्पर्धा, हॅकाथॉन, महिला उद्योजकता कार्यक्रम, डीप-टेक कार्यशाळा, डेमो डे आणि यशोगाथा सत्रांच्या माध्यमातून व्यापक परिसंस्थेशी जोडले जातात.

**भागीदारीतून सामर्थ्य :** AWS, Zoho, MongoDB, SolidWorks आणि Ansys यांसारख्या आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपन्यांबरोबरच IAVC, Arthayan, Product Tank Pune, Stanford Seed Spark आणि Wadhwani Global Foundation यांसारख्या संस्थांशी असलेले सहकार्य 'भाऊ इन्स्टिट्यूट'च्या स्टार्टअप्सना विशेष लाभ देते.

Ignited Innovators of India (i2i) सारख्या उपक्रमांद्वारे 'भाऊ इन्स्टिट्यूट' देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक नवोन्मेषाची जाणीव निर्माण करत आहे. COEP च्या Innovation & Entrepreneurship Cell ला दिले जाणारे मार्गदर्शन विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय दृष्टिकोन विकसित करते.

अल्पावधीतच 'भाऊ इन्स्टिट्यूट' नवोन्मेष आणि उद्योजकतेचे एक प्रभावी केंद्र बनले आहे. मूल्याधिष्ठित नेतृत्व, जागतिक नेटवर्क, सशक्त पायाभूत सुविधा आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण यांच्या जोरावर ही संस्था विद्यार्थ्यांना आणि नवोन्मेषकांना शाश्वत उद्योग उभारण्यासाठी सज्ज करत आहे.

भारताच्या भविष्यात योगदान देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी— 'भाऊ इन्स्टिट्यूट' हे केवळ एक इन्क्युबेटर नसून, विचारांचा मार्गदर्शक आणि यशाच्या प्रवासातील विश्वासू सोबती आहे.

# बुक्स अँड रिल्स

‘You are the books you read, the movies you watch, the music you listen to, and the people you meet.’ ही प्रसिद्ध ओळ आपण अनेकदा वाचली आहे. ही ओळ आयुष्याचं खूप सुंदर तत्त्व सांगते. आपण काय वाचतो, काय बघतो, काय ऐकतो आणि कोणासोबत राहतो, यावरून आपलं व्यक्तिमत्त्व घडतं. या सदरातून विद्यार्थ्यांना अशीच काही पुस्तकं आणि चित्रपटांची ओळख करून दिली जाणार आहे, जे फक्त मनोरंजन करत नाहीत, तर प्रेरणा, विचार आणि जीवनमूल्यांचा खजिना आहेत. एखादं पुस्तक वाचताना आपल्याला त्यातील पात्रांमध्ये स्वतःचं प्रतिबिंब दिसतं, तर एखादा चित्रपट आपल्याला जगाकडे वेगळ्या दृष्टीने पाहायला शिकवतो. या सदरामध्ये तुम्हाला कधी विचार करायला लावणारी कथा सापडेल, कधी मनाला भिडणारा संदेश मिळेल, तर कधी एखादी कल्पना जी तुम्हाला पुढे नेईल. या विभागाचा हेतू केवळ चांगले वाचण्याची आणि पाहण्याची सवय लावणे हा नाही, तर त्यातून मनोरंजनाबरोबर मनन घडवणे हा आहे. पुस्तकांच्या पानांमधून आणि पडद्यावरील दृश्यांतून घडणारी ही एक आगळीवेगळी शिक्षणयात्रा आहे.

## वाचाल तर वाचाल

बाराखडी ते अभ्यासाची भली मोठी पुस्तके वाचता वाचता आपण सगळ्यांनीच शब्दांच्या जादूचा अनुभव घेतलेला आहे. पानोपानी उलगडणाऱ्या या अक्षरविश्वाने कित्येक पिढ्यांना विचार दिला, दिशा दिली आणि अनेक नवी जीवनमूल्यं शिकवली. या प्रवासात असंख्य अमूल्य पुस्तके निर्माण झाली. त्यापैकी काही विशेष, त्यातही तरुण विद्यार्थ्यांनी नक्की वाचावीत अशी पुस्तके आपण ‘वाचाल तर वाचाल’ या सदरामधून जाणून घेणार आहोत.



**नीता कुलकर्णी**

# अनुभव आणि प्रयत्नांचे ठिपके जोडताना...

आयुष्यातील अनेक बिंदू कधीच पुढे बघत म्हणजेच भविष्याचा वेध घेत जोडता येत नाहीत. त्यासाठी मागे बघत, भूतकाळाचाच वेध घेत ते जोडावे लागतात आणि त्यासाठी कशावर तरी विश्वास ठेवायलाच लागतो – तुमची हिम्मत, नियती, आयुष्य, कर्म – कशावरही! या दृष्टिकोनाने आयुष्य बदलू शकते , ते कसे?

व्यवसाय उभारण्याचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी कोणत्या अडचणी येऊ शकतात? पैसा? शिक्षण? अनुभवाची कमतरता? की आणखी काही?

खरं सांगायचं तर आपल्याला आयुष्यात नेमकं काय करायचं आहे, कशाचा पाठपुरावा करायचा आहे, त्यासाठी काय सोडून द्यायला हवं आणि काय हातात घट्ट पकडून ठेवायला हवं – याच गोष्टींचा विचार करायची सहसा आपली तयारी नसते. रूढ मार्ग, तथाकथित समाजमान्य धारणा, वर्षानुवर्षांची घट्ट निरगाठी बांधलेली गृहितकं या गोष्टी आपल्याला नेमकं काय हवं आहे, खरंच काय करायचं आहे, हे जाणून घेण्याच्या वाटेवरच्या अडचणी ठरतात. एका ठरलेल्या चाकोरीत शिक्षण पूर्ण करायचं, मग अधिकाधिक फायद्याची नोकरी मिळावी यासाठी आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करून नोकरी मिळवायची ही गोष्ट वाईट नाही, तीच योग्य आहे असंही नाही. अनेकांना हे लक्षातही येत; पण मळलेली वाट सोडून जाण्याची मानसिक तयारी नसते.

रश्मी बन्सल यांनी लिहिलेलं ‘कनेक्ट द डॉट्स’ हे पुस्तक वीस उद्योजकांच्या कथा सांगतं. आरती कदम यांनी केलेला मराठी अनुवाद ‘मेहता पब्लिशिंग

हाउस’तर्फे प्रकाशित झाला आहे.

ती चाकोरीतील प्रक्रिया आणि मळलेली वाट रस्ता या दोन्ही गोष्टी सोडून दिलेल्या वीस जणांच्या गोष्टी यात आहेत. आपल्या मनाची साद ओळखली, आपल्याला काय करायचं आहे आणि काय करायला आवडणार नाही- ही स्पष्टता त्यांच्या मनात होती. जे शिक्षण घेतलं आहे, त्या विषयाच्या क्षेत्रातच काम करायचा मोह सोडून अगदी वेगळ्याच क्षेत्रात पाऊल ठेवलं आणि त्यात यश मिळवलं. काय फरक आहे त्यांच्यात आणि आपल्यात? जेन झीच्या भाषेत याचं उत्तर द्यायचं झालं तर ते आहे ‘किडा.’ काही तरी वेगळं करण्याचा! जे करू ते मनापासून करण्याचा! आपल्या स्वप्नाला त्यांनी प्रयत्नांबरोबर सर्जनशीलता आणि नावीन्याचीही जोड दिली.

या पुस्तकात तीन भागांत या वीस उद्योजकांच्या कथा विभागलेल्या आहेत. ते विभाग आहेत – जुगाड, जुनून आणि जुबान! या विभाग-शीर्षकांवरूनही यातल्या उद्योजकांची वृत्ती लक्षात येते. व्यवसाय उभारून तो यशस्वीपणे चालवण्याचं कोणतंही शास्त्रशुद्ध शिक्षण न घेता, केवळ निरीक्षण, प्रयोग आणि स्वतःची बुद्धी वापरून मोठ्या उलाढालीचे व्यवसाय सांभाळणारे उद्योजक ‘जुगाड’मध्ये भेटतात. दुसरा विभाग ‘जुनून’मध्ये काळाच्या पुढची गरज ओळखून त्या क्षेत्रात व्यवसाय उभारणारे, काम करत राहणारे उद्योजक आहेत. त्यांचे उद्योग ही त्यांची स्वप्नं, पॅशन आणि ध्यास कसे बनले याच्या कथा हा विभाग सांगतो. तिसरा विभाग ‘जुबान.’ या विभागात ‘उद्योजक’ या संकल्पनेच्या रूढ आणि पुस्तकी व्याख्येत अजिबात न बसणारे कलंदर आहेत. एखाद्याची सर्जनशीलता ही फारच आगळीवेगळी असते, अशा सर्जनशीलतेच्या अभिव्यक्तीसाठी नव्याने व्यासपीठ तयार करण्याची गरज असते. अशा वेळी वृत्तीने कलाकार असणारी एखादी व्यक्ती कर्तृत्वाने ‘उद्योजक’ कशी बनते, याची गोष्ट या विभागातून उलगडत जाते.

लेखिका रश्मी बन्सल यांची मळलेल्या वाटा नाकरणाऱ्या व्यक्तींचा परिचय करून




देणारी इतरही अनेक पुस्तकं आहेत. मात्र, ‘कनेक्ट द डॉट्स’ हे पुस्तक अगदी शालेय विद्यार्थ्यांपासून त्यांच्या पालकांपर्यंत सर्वांनी वाचायला हवं असं आहे. त्याचं मुख्य कारण म्हणजे, स्वप्नं बघण्याची ताकद हे पुस्तक देतं. यात ज्या लोकांनी त्यांचा प्रवास मांडला आहे, त्या सर्वांच्या आयुष्याचं सरासरी ज्ञान सारखंच आहे. मुख्य म्हणजे यापैकी कुणीही पिढीजात उद्योजक नव्हते, त्यामुळे त्यांच्या पाठीशी अनुभवसंपन्न वारसा नव्हता. यापैकी अनेकांचं शिक्षण वेगळ्या विषयातलं आहे आणि ते काम वेगळ्या क्षेत्रात करत आहेत. या सगळ्यांचा सल्ला एकच आहे (आणि तो स्वानुभवातून आला आहे...) – ‘तुमचं सामर्थ्य कशात आहे, हे ओळखा; तुम्हाला कशामुळे प्रोत्साहन मिळतं, ते समजून घ्या. आव्हानं, नवीन गोष्टी सतत करत राहणं हीच गरजेची गोष्ट असते. तुमच्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यावर ठाम विश्वास असणं गरजेचं असतं. त्याबद्दल जग काय म्हणेल, याचा विचार न करता त्याच्या पलीकडे बघायला शिकायला हवं. अनेकदा एखादी गोष्ट मागे खेचतीय, असं वाटलं तरी पुढे जाऊन नवीन काही तरी करायला उद्युक्त करणारा, तुमच्या क्षमता वाढवणारा तो धक्का असतो, हे लक्षात येतं.’

या उद्योजकांमध्ये फूड चेन चालवणारे, सौंदर्य प्रसाधनांची निर्मिती करणारे, रिसायकलिंगमध्ये वेगळंच काम करणारे, चित्रपटलेखक, दिग्दर्शक, जाहिरात कंपनी सुरू करून ॲड वर्ल्डमध्ये ठसा उमटवणारे, वाइल्ड लाइफ फोटोग्राफर, कोचिंग सेंटर चालवणारे, पुस्तक दालनांची यशस्वी चेन उभे करणारे, डेअरी, शेती, टी-शर्ट प्रिंटिंग अशा अनेक क्षेत्रांत ‘क्रिएटिव्हली’ काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. त्यांना पुस्तकात भेटणं हे शब्दशः आनंददायी आहे.

या पुस्तकाच्या सुरुवातीच्या पानांत स्टीव्ह जॉब्ज यांच्या एका भाषणातला एक परिच्छेद वाचायला मिळतो. तो इथे आवर्जून सांगावासा वाटतो,

“आयुष्यातील अनेक बिंदू तुम्हाला कधीच पुढे बघत, म्हणजेच भविष्याचा वेध घेत जोडता येत नाहीत. त्यासाठी तुम्हाला मागे बघत, भूतकाळाचाच वेध घेत ते जोडावे लागतात. म्हणूनच तुम्हाला कशावर तरी विश्वास ठेवायलाच लागतो – तुमची हिंमत, नियती, आयुष्य, कर्म – कशावरही! या दृष्टिकोनाने माझ्या पदरात कधीही अपयश टाकलं नाहीच, उलट त्यामुळे माझं आयुष्य बदलून गेलं.”

आयुष्यातले वेगवेगळे ठिपके जोडले गेले, तर त्याची सुंदर रांगोळी होते, हे या पुस्तकातल्या वीस जणांनी सिद्ध केलं आहेच. आयुष्याचा एक आराखडा असतो, हे खरं आहे. त्यातला प्रत्येक अनुभव आपल्याला घडवत असतो. तो चांगला असो किंवा वाईट! आपण सगळेच त्या अनुभवांचा परिपाक असतो. म्हणूनच मोकळेपणाने त्या साचेबद्ध आराखड्याच्या पलीकडे जाऊन अनेक आणि वैविध्यपूर्ण गोष्टी करत राहा, शाळा-कॉलेजच्या बाहेर काही धडे घ्या. लेखिकेच्या शब्दांत सांगायचं, तर ‘आयुष्याच्या कॅनव्हासवर अनुभवांचे असंख्य बिंदू निर्माण करा. मग धीटपणाने ते सर्व जोडून त्यातून सुंदर चित्र निर्माण करा.’

आपल्या आयुष्यात अनुभवांचे असंख्य ठिपके जोडून ज्यांनी चमकदार चित्र बनवलं आहे, त्यांच्या कथा जाणून घेण्यासाठी हे पुस्तक वाचायलाच हवं.

(लेखिका संपादक आणि अनुवादक आहेत )

# रूपे रूपेरी

चित्रपट बघायला आवडत नाही, अशी व्यक्ती सापडणं अवघड. आपल्या सगळ्यांना रूपेरी पडद्यावरच्या या जादूने गेल्या शतकाहून अधिक काळ वेड लावलं आहे. या काळात अनेक उत्तमोत्तम चित्रपट तयार झाले. त्यातल्या काही विशेष, त्यातही तरुण विद्यार्थ्यांनी आवर्जून पाहाव्यात अशा काही कलाकृतींचा वेध आपण 'रूपे रूपेरी' या सदरामधून घेणार आहोत.

गेल्या काही वर्षांत आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात वैयक्तिक सुख-समृद्धी खूप आली; पण आपण त्यासाठी कशाची किंमत मोजली, हे बरेचदा आपल्या लक्षात येत नाही. आता सगळं काही झटपट हवंय आपल्याला! आपण फार जीव तोडून कशाच्या तरी मागे लागलो आहोत आणि त्यासाठी फार महत्त्वाचं, शाश्वत असं काही तरी गमावत चाललो आहोत, याचं भान चैतन्य ताम्हाणे दिग्दर्शित 'द डिसायपल' हा चित्रपट देतो.



श्रीपाद ब्रह्मे

# द डिसायपल : कणसुराची सुरेल मैफल

चैतन्य ताम्हाणे या तरुण दिग्दर्शकाचा 'कोर्ट'नंतर आलेला 'द डिसायपल' हा नवा चित्रपट म्हणजे एका कणसुराची सुरेल मैफल आहे. आयुष्यात सगळ्यांचेच तंबोरे सुरेल लागतात, असं नाही. प्रत्येकाला आपल्या जगण्याची मैफल रंगवता येतेच असं नाही. किंबहुना असं रंगलेल्या मैफलीसारखं जीवन लाभणारे फार थोडे. बाकीच्यांच्या आयुष्यात कमअस्सलतेचे, कमकुवतपणाचे, कचखाऊपणाचे कणसूरच अधिक! या कणसुरांना सुरेल जगात स्थान नाही. त्यांचं गाणं कोणी गात नाही.

चैतन्यचं कौतुक अशासाठी, की त्यानं या कणसुराचं गाणं गायलं. त्याला भरल्या मैफलीत स्थान दिलं. शास्त्रीय संगीत हा तसा मोठा विषय. या विषयाची पार्श्वभूमी असलेला एकही मराठी चित्रपट अद्यापपर्यंत आलेला मला तरी आठवत नाही. चैतन्यनं हे आव्हान पेललंय. अर्थात त्याचा हा चित्रपट केवळ शास्त्रीय संगीतापुरता मर्यादित राहत नाही, तर कोणत्याही कलेला किंवा जगण्यातल्या कुठल्याही प्रांताला लागू होईल, अशा व्यापक अर्थापर्यंत पोहोचतो. कला, साधना, गुरू-शिष्य परंपरा, माणसाची स्खलनशील वृत्ती या सर्वांवर नेमकेपणानं बोट ठेवतो आणि प्रत्येक प्रेक्षकाला अंतर्मुख होण्यास भाग पाडतो.

शरद नेरुळकर (आदित्य मोडक) या तरुणाची कथा 'द डिसायपल' आपल्याला सांगतो. शरद आपले गुरू पं. विनायक प्रधान (पं. अरुण द्रविड) यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे धडे गिरवतो आहे. त्यालाही मोठा गायक व्हायचंय, मैफली गाजवायच्या आहेत. त्याचे वडील शास्त्रीय गायक होते. मात्र, त्यांना त्यांच्या आयुष्यात फार यश मिळवता आलेलं नाही. शरद त्याच्या प्रवासाला सुरुवात करतो, तेव्हा हळूहळू त्यालाही त्याची मर्यादा समजत जाते. एका अर्थानं त्याला झालेला हा साक्षात्कार आहे. त्याला निराळ्या अर्थाने आलेली ही 'उपज' आहे. आपल्याला काय येत नाही, हेही अनेकदा लोकांना कळत नाही. आपल्याला काय जमत नाही आणि आपण आयुष्यात काय होऊ शकत नाही, याचं वेळेवर भान येणं हेही यशस्वी आयुष्याचं गमक आहे. हे भान आल्यावरच माणूस त्याला ज्या गोष्टी येतात, जमतात



त्या करण्याच्या मागे लागतो. लौकिकार्थाने यशस्वी होऊ शकतो; पण आयुष्यभर एक टोचणी घेऊन जगत राहतो. 'पुलं'च्या लेखात एक प्रख्यात गायक वृद्धापकाळी गाताना खंत व्यक्त करताना म्हणतात, "मला ती जागा दिसते आहे; पण आता तिच्यापर्यंत पोहोचता येत नाही." या सिनेमातल्या तरुण नायकाला कधीच त्या जागेपर्यंत जाता येत नाही, हाच काय तो फरक! आपण तिथं जाऊ शकत नाही, हे समजण्यापर्यंतचा त्याचा एका तपाचा प्रवास म्हणजे हा चित्रपट!

या चित्रपटाची मांडणी मोठी वेधक आहे. चैतन्यला चित्रभाषेची केवळ उत्तम जाणच नाही, तर त्याची तिच्यावर मांड आहे. 'कोर्ट'मध्येही त्यानं वैशिष्ट्यपूर्ण कॅमेरावर्क दाखवलं होतं. 'द डिसायपल' त्या तुलनेत एवढा गुंतागुंतीचा नसला, तरी यातल्या नायकाचे पेच आहेतच. पहिल्या सिनेमात समाजविषयक भाष्य होतं, तर ते इथं एका व्यक्तीपुरतं मर्यादित आहे. अर्थात, गोष्ट एका व्यक्तीची असली, तरी त्यातला आशय वैश्विकच असेल, याची काळजी दिग्दर्शक घेतो. यातलं त्याचं कॅमेरावर्कही पाहण्यासारखं आहे. इथेही 'कोर्ट'सारखे लाँग शॉट आहेत; पण ते प्रामुख्यानं मैफलीच्या दृश्यांचे आहेत. इतर वेळी चौकटीतले तपशील अधोरेखित करण्यावर त्याचा भर आहे. त्याच्या गुरूचं चाळीतलं घर, नायकाचं घर, नाट्यगृहं किंवा सार्वजनिक संस्थांची छोटी सभागृहं, हॉटेल्स, दुकानं हे सगळं कथेच्या ओघात दिसत राहतं. त्याहून सर्वांत महत्त्वाचं पात्र आहे ते मुंबई शहर व इथले रात्रीतले एकांडे रस्ते! नायक आपल्या मोटारसायकलवरून हे शहर हिंडत असतो आणि त्याच वेळी त्याच्या गुरूंच्या गुरू माई उर्फ सिंधूताई जाधव यांनी दिलेली व्याख्यानं तो इअरफोनवरून ऐकत असतो. माईंचे हे संगीतविषयक विचार हा या सगळ्या चित्रपटाचा गाभा आहे.

सुमित्रा भावे यांच्या आवाजात आपल्याला ती ऐकायला येतात. या आवाजासाठी सुमित्रा भावेंचा आवाज वापरणं हा दिग्दर्शकाचा 'मास्टरस्ट्रोक' आहे. आयुष्यभर एखाद्या विषयाला वाहून घेतलेल्या, साधना केलेल्या व्यक्तीचा आवाज याहून निराळा असणार नाही, असं आपल्याला तो आवाज ऐकताना जाणवतं. सुमित्रा भावेंच्या किंचित कातर आवाजात समजावणीचा समंजस सूर आहे. तो आवाज या चित्रपटाचा मध्यवर्ती टोन सेट करतो.

कथानकाच्या दृष्टीने चित्रपटाचे सरळ दोन भाग आहेत. साधारण २००६ च्या आसपास, जेव्हा नायक २४ वर्षांचा असतो, तेव्हा घडणाऱ्या घटना आणि मग थेट २०१८ मध्ये नायक ३६ वर्षांचा झाला असतानाचा दुसरा काळ समोर येतो. या बारा वर्षांत आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात भौतिक बदल खूप झाले. बटनवाल्या मोबाइलपासून ते स्मार्टफोनपर्यंत आणि छोट्या सभागृहातील मैफलींपासून ते रिॲलिटी शोपर्यंतचे हे सगळे बदल दिग्दर्शकानं फार चाणाक्षपणे टिपले आहेत. अगदी शरद रात्री मुंबईत रस्त्याने फिरत असताना पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या इमारतीही उत्तुंग व चकचकीत झाल्या आहेत. निऑन साइन्समधून आवाहन करणाऱ्या जाहिरातीही बदलल्या आहेत. रिॲलिटी शोमधून देशभर लोकप्रिय झालेल्या एका बंगाली गायिकेची यशोगाथाही नायकाला व आपल्याला समांतर दिसते आहे.

क्लासमध्ये मुलाला कॉलेजच्या बँडमध्ये गायला परवानगी मागायला येणाऱ्या गुजराती बाईचा प्रसंगही उत्तरार्धात येतो. या सगळ्यांत शरदही बदलतो. अगदी स्वतःचं फोटोशूट करून वेबसाइट तयार करतो.



त्याची मैफल ऐकायला येणाऱ्या आणि पहिल्या रांगेत बसून स्मार्टफोनवर मेसेज चेक करणारे 'शो अॅरेंजर'ही दिसतात. शरदही आता यू-ट्यूबवर आपल्या मित्र-मैत्रिणींचे व्हिडिओ बघतो. ते लौकिकार्थाने यशस्वी झालेले दिसतात. अगदी परदेशातही मैत्रिणीच्या मैफली झालेल्या दिसतात. हा सर्व बदल एकाच दृश्यात आपल्याला सहज दिसतो. या सर्व काळात होत चाललेलं संगीत क्षेत्राचं बाजारीकरण, श्रोत्यांची विशिष्ट अपेक्षा, 'सगळ्यांना भावगीतंच ऐकायची असतात,' हा सीडी विकतानाचा संवाद, पूर्वी चांगलं वाजविणाऱ्या आणि आता 'प्लेइंग टु द गॅलरी' वाजविणाऱ्या सतारवादकाची मैफल ('कानातून रक्त येईल!' ही शरदच्या मित्राची प्रतिक्रिया धमाल आहे!) असे सगळे प्रसंग येत राहतात.

पूर्वार्धात शरदचे वडील त्यांच्या दोन मित्रांसह 'तीन तासांवर असलेल्या' एका शहरात रेल्वेने एक मैफल ऐकायला चालले आहेत. तेव्हाचे त्यांचे संवाद भारी आहेत. मुंबईहून पुण्याला 'सवाई गंधर्व महोत्सव' ऐकायला येणारे हे श्रोते असणार, यात शंका नाही. चित्रपटात हे सरोदवादन एका धरणाच्या काठी निसर्गरम्य ठिकाणी होतं, हा भाग वेगळा; पण श्रोत्यांची सर्व चर्चा 'सवाई'च्या श्रोत्यांची आठवण करून देते. अशा सर्व गोष्टींवर हा चित्रपट जाता जाता प्रभावी भाष्य करतो. शरदच्या तरुणपणी घडलेला; पण चित्रपटाच्या उत्तरार्धात येणारा एका अतरंगी समीक्षकासोबतचा प्रसंग पण असाच प्रभावी आहे. या सर्व बदलांत एकच गोष्ट बदललेली नसते, ती म्हणजे त्याच्या गुरुजींचं घर. हे फारच सूचक व प्रतीकात्मक आहे. बाकी शरदच्या धारणांना हादरा देणारे प्रसंग किंवा घटना घडत असतात, त्यावर शरद त्याच्या परीने उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो. बारा वर्षांनंतर त्याला 'हे आपल्याला जमणे नाही,' याचा साक्षात्कार होतो. त्यानंतर तो काय निर्णय घेतो, हे चित्रपटातच पाहायला हवे.

आदित्य मोडक या तरुणानं नायक शरद नेरुळकरची भूमिका समजून केली आहे. सीए असलेला आदित्य स्वतः शास्त्रीय गायक आहे. त्याचा रूपेरी पडद्यावरचा हा पहिलाच अनुभव असावा. या भूमिकेत अनुस्यूत असलेलं एक अवघडलेपण, वैफल्य ही भावना दाखवण्यासाठी आदित्यच्या नवखेपणाचाही उपयोग झाला असावा. त्याचे गुरू पं. विनायक प्रधान यांची भूमिका ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. अरुण द्रविड यांनी केली आहे. तेही स्वतः गायक असल्यानं गाण्याच्या मैफलींचे सर्व प्रसंग जिवंत झाले आहेत. शरदच्या वडिलांच्या छोट्याशा भूमिकेत किरण यज्ञोपवित आणि राजन जोशी या समीक्षकाच्या भूमिकेत प्रसाद वनारसे लक्षात राहतात. अन्य कास्टिंगही उत्तम. चित्रपटातली लोकेशन्स अभ्यासण्यासारखी आहेत. सर्व मैफलींचं चित्रीकरण अगदी ऑथेंटिक आहे.

गेल्या काही वर्षांत आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात वैयक्तिक सुख-समृद्धी खूप आली; पण आपण त्यासाठी कशाची किंमत मोजली, हे बरेचदा आपल्या लक्षात येत नाही. आता सगळं काही झटपट हवंय आपल्याला! एका प्रसंगात शरदचे गुरुजी त्याला म्हणतात, 'कसली घाई आहे? कुठे पोहोचायचं आहे?' हे ऐकताना हे आपल्यालाच उद्देशून म्हटलंय की काय, असं वाटत राहतं. आपण फार जीव तोडून कशाच्या तरी मागे लागलो आहोत आणि त्यासाठी फार महत्त्वाचं, शाश्वत असं काही तरी गमावत चाललो आहोत, असं चित्र आहे. करोना काळानंतर तर या वेगवान व कथित भौतिक प्रगतीचं वैयर्थ पदोपदी जाणवतं आहे. अशा वेळी शाश्वत, दीर्घ काळ टिकणारं काय आहे हे सांगणारा आणि त्याच वेळी तिथं पोचण्यापर्यंतची आपली मर्यादा जाणवून देणारा असा हा चित्रपट आहे. चुकवू नका! (हा चित्रपट नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे.)

*(लेखक 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीत वृत्तसंपादक आहेत.)*

# मनाचिये गुंती

विद्यार्थीजीवन हे स्वप्नं, ध्येयं आणि आव्हानांचा संगम असतं. करिअरची शाश्वती, बदलतं शैक्षणिक वातावरण, सततची स्पर्धा आणि त्यासोबत सोशल मीडियामुळे निर्माण होणारा मानसिक दबाव- हे सगळं त्यांच्या मनात मोठा जटील गुंता तयार करतं. हा गुंता आधीच्या पिढीला पूर्णपणे उमगेलच असं नाही. 'मनाचीये गुंती' या सदरामधून अशाच प्रश्नांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला जाईल. मनातील संभ्रमाला दिशा देणं, अंधारातला मार्ग दाखवणं आणि विद्यार्थ्यांच्या प्रवासाला आधार देणं हा या सदराचा मुख्य हेतू आहे.

# गोड सूड

महाविद्यालयीन वय म्हणजे स्वप्नं, स्वातंत्र्य आणि भविष्याकडे झेप घेण्याचा काळ; पण आज याच वयात व्यसनाधीनतेची सावली अधिक गडद होत चालली आहे. दारू, अमली पदार्थ, तंबाखू; तसेच नव्या स्वरूपातील रासायनिक व्यसने—ही केवळ वैयक्तिक समस्या न राहता कुटुंब, शिक्षणसंस्था आणि समाजासमोरचे गंभीर आव्हान झाली आहेत. आकडेवारीपेक्षा बोलके ठरतात ते अशा युवकांचे प्रत्यक्ष अनुभव, जे व्यसनाच्या विळख्यात नकळत अडकतात आणि सुटकेच्या क्षणी संताप, भ्रमनिरास आणि अपराधभावनेच्या मिश्र भावनिक वादळाशी सामना करत असतात. पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रात घडलेला हा एक संवाद असा अनुभव उलगडतो, जो केवळ एका रुग्णाची कथा नसून, आजच्या तरुण पिढीच्या मनःस्थितीचा आरसा दाखवतो.



**डॉ. आनंद नाडकर्णी**

"मला त्यांनी सांगितले, मावशी सिरीयस आहे. पुण्याला जायचं आहे. गाडी निघाली. इथे आलो आणि समोर पाटी 'मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र.' फसवून आणले मला इथे! बायको, भाऊ, आई-बाप. एका शब्दाने डिस्कस नाही केले. मी याचा सूड घेणार आहे. इथून डिस्चार्ज मिळू दे. बघतो एकेकाला. डोके आउट होते माझे, त्यांचे विचार आले की."

माझ्या समोरचा हा रुग्णमित्र तावातवाने बोलत होता. बरोबर होता त्याचा काउन्सेलर, माझा सहकारी दत्ता श्रीखंडे. स्थळ, पुण्याचे 'मुक्तांगण.'

"पण त्या वेळी मी सरेंडर झालो डॉक्टर. शक्तीच नव्हती विरोध करायची." तो म्हणाला. हा प्रसंग घडत होता, तो त्याचा 'मुक्तांगण'मधला अठरावा दिवस होता.

"या अठरा दिवसांमध्ये तुझ्या दिनक्रमामध्ये कोणते चांगले बदल घडले आहेत ते आधी पाहू या आणि त्यानंतर मनाची ही जी तगमग होते आहे तिच्याकडे येऊ या आपण? चालेल?" मी नम्र जिव्हाळ्याने विचारले.

तो नियमित उठणे, झोपणे, योग-व्यायामाची सत्रे, वेळेवर चौरस खाणे, लायब्ररी, उपचारसभा, काउन्सेलरबरोबर नियमित सत्रे याबद्दल बोलू लागला. गप्पा सुरू झाल्या. मुख्य म्हणजे आम्ही त्याच्या मद्यपाशाबद्दल एक शब्दही बोलत नव्हतो. माझ्यासमोरच्या फाइलमध्ये तो सारा इतिहास होताच. वाढणारे व्यसन, त्यामुळे होणारे त्रास यांचा लेखाजोखा तिथे लिहिलेला होता.

"या मित्राचा साडेचार वर्षांचा छोटा मुलगा आहे. कालच तो फोनवर बोलला याच्याशी." दत्ता म्हणाला. आमचे काउन्सेलर नियमितपणे कुटुंबाशी संवाद साधतात. रुग्णाबरोबरही कुटुंबीयांचा दूरसंवाद असतो. "काय म्हणाला तुला मुलगा?" मी विचारले.

"परत आल्यावर कधी ते 'घाण पाणी' प्यायचे नाही असं म्हणाला." रुग्णमित्राच्या सुरामध्ये आता आक्रमकता नव्हती. या भावनिक संधीचा

उपयोग करत मी त्याला म्हणालो, "तुझ्या इच्छेविरुद्ध त्यांनी तुला इथे आणून टाकले हे त्यांचे सपशेल चुकले हे मी मान्य करतो. त्यांचा सूड घेण्याची तुझी भावना तितकीच स्वाभाविक आहे; पण या छोटूने तुला त्याची जी इच्छा निरागसपणे सांगितली आहे, त्याचे काय? ती पूर्ण करणं किती महत्त्वाचं वाटतंय तुला?"

"डॉक्टर, सर मला नाही जायचं परत व्यसनाकडे; पण याना मी सोडणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ." तो म्हणाला.

"तर मग तू 'घाण-पाणी' प्यायचे सोडले आहेस, हे तुझ्या मुलाला पुराव्यासह कसं कळणार? तू घरच्यांशी भांडायला लागलास, की ते त्यांची बाजू तुला सांगणार. तुमचे भांडण होणार. पुन्हा पहिल्यासारखे. त्यातून तुझी दारूबद्दलची तीव्र इच्छा पुन्हा जागृत झाली, तर तुझी स्लिप (slip) होणार. मग कुटुंबीय तुलाच दोष देणार." मी शांतपणे बोलत होतो. रुग्णमित्र विचारात पडला होता.

"सूड म्हणजे काय? त्यांना पश्चाताप होणे. त्यांच्या वागण्याचे त्यांना वाईट वाटायला हवे. हेच करण्याचा अजून एक मार्ग मी तुला सांगतो. अजिबात बदलू नकोस ती सूडभावना; पण आपण नावीन्यपूर्ण सूड उगवू." मी म्हणालो.

"कसा?" त्याने विचारले.

"व्यसनाची तीव्र इच्छा होऊ नये म्हणून आपण तुझ्या छोट्याचा चेहरा आणि त्याचे शब्द वापरू. इकडच्या वास्तव्यात मिळालेल्या सगळ्या चांगल्या गोष्टी, आरोग्याच्या नेटक्या सवयी, आतमध्ये रुजवू. व्यसनमुक्तीच्या पायावर पुन्हा आपला व्यवसाय उभा करू. प्रगती होत जाईल. काही काळ लोटेल. पत्नी म्हणेल, 'अहो, तुम्हाला त्या वेळी 'मुक्तांगण'मध्ये इच्छेविरुद्ध नेऊन टाकले ती चूकच झाली आमची.' तिच्या चेहऱ्यावर संपूर्ण पश्चाताप असेल आणि तू म्हणशील..." मी थांबलो.

अन् त्याच्या तोंडातून अचानक शब्द आले, "जाऊ दे गं, जे होतं ते भल्यासाठी."

आणि आम्ही तिघेही या शब्दांनंतरची शांतता अनुभवत राहिलो.

"मित्रा, ही भावना कोणती असेल? विचार कर."

"क्षमेची." जमिनीकडे पाहत, चाचरत तो म्हणाला.

"सूडाचे समाधान क्षमेमध्येच असते. संतापाची ऊर्जा जर प्रगतीसाठी वापरली, विकासाच्या ध्येयामध्ये टाकली, तर तिचे रूपच पालटून जाते." मी म्हणालो.

आता तो लक्षपूर्वक ऐकत होता. त्या दिवशी सकाळच्या मी घेतलेल्या प्रश्नोत्तरांच्या गटसत्रामध्ये विवेक आणि अविवेकाच्या व्याख्या कशा असतात यावर चर्चा झाली होती. स्वहिताचा विसर पडणे आणि परहिताला विस्कटून टाकणे म्हणजे अविवेकाने वागणे. व्यसनामध्ये काय होते, तर क्षणिक सुखाच्या अनुभवाला म्हणजे तात्पुरत्या सुखाला मन 'कायमचा आनंद' मानू लागते. त्यामुळे हा अनुभव वारंवार घ्यायलाच हवा अशी भूमिका बनते. त्याशिवाय तो अनुभव 'परमनंट' कसा होणार? कालांतराने हा 'एकच आनंद' आणि त्याच्याभोवती फिरणारे जीवन अशी परिस्थिती बनते. जी 'केमिकल' म्हणजेच सेवन करायच्या पदार्थांची व्यसने असतात, त्यामधल्या रसायनांची मनाला गुलाम करायची क्षमता आणि व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील कमतरता यांची गाठ बांधली जाते. अविवेकाचा जन्म होतो.

स्वतःच्या अविवेकालाच 'विवेकी' म्हणायचे, तर वास्तव नाकारायला हवे (Denial). स्वतःच्या बाजूने जाणारे पुरावे निर्माण करायला हवेत (Rationalization). आणि सारा दोष दुसऱ्यांवर टाकायला हवा (Projection). या आहेत बचावाच्या मतलबी पद्धती. सकाळच्या सत्रातील मुद्द्यांची आम्ही आमच्या रुग्णमित्राबरोबर उजळणी केली.

मी विचार करत होतो, की संभाषणाच्या प्रारंभीच जर मी त्याच्या सूडबुद्धीला आव्हान दिले असते, तर त्याला त्या मतलबी बचावपद्धती वापरायला एक कारणच मिळाले असते. तसे झाले नाही त्यामुळे त्याला नेहमीच्या तलवारी म्यानाबाहेर काढण्याची संधी मिळाली नाही.

"नातेवाइकांनी तुला 'मुक्तांगण'मध्ये सोडले, तेव्हा तू लागलीच बंड पुकारले नाहीस. मनामध्ये संताप असतानाही तू इथे राहिलास; त्यामुळे तुला आरोग्याचे फायदे झाले, व्यसनमुक्तीच्या प्रयत्नांना दिशा मिळाली, दत्तासारखा काउन्सेलर मिळाला. म्हणजे काही लाभ झाले." मी म्हणालो.

"होय. दत्ता सरांशी बोलून, त्यांच्या स्वतःच्या व्यसनमुक्तीचे अनुभव ऐकून माझा नक्कीच फायदा झालाय. इकडचा स्टाफही मला मदत करतोय. डॉक्टर चांगले आहेत." तो म्हणाला.

"आणि तूसुद्धा चांगला आहेस. तुझे इथे अशा पद्धतीने राहणे हा तुझ्यातला सद्भाव आहे. तुझा संताप आणि ती सूडाची भावना हा तुझ्यातला त्रासदायक भाग आहे."

"पण म्हणजे मी मुळात चांगला माणूस आहे की वाईट?" त्याने विचारले.

"मानसशास्त्र उत्तर देईल, की तू 'माणूस' आहेच हेच सत्य. तुझ्यात सद्भाव आणि दुष्टभाव आहेत. विवेक आणि अविवेक आहेत. त्यांच्यामध्ये पारख करायला शिक. जसे रत्नपारखी असतात, तसा विचारपारखी बन. Learn to Discriminate. आपले तत्त्वज्ञान आणि धर्म आपल्याला सांगतो, की तू मुळात फक्त चांगलाच नाहीस, तर तुझ्यात ईश्वरअंश आहे. तुझ्यात विशाल असे दैवीपण आहे. आपली परंपरा असा कौल देते, की Divinity म्हणजे देवत्वाचा आविष्कारच आहे. विश्वातील प्रत्येक आकार. बौद्ध विचारसुद्धा हेच सांगतो, की आत्मज्ञान मिळवण्याची पात्रता प्रत्येकाकडे असते. मग तो अंगुलीमालसारखा दरोडेखोर का असेना! आपल्या हिंदू परंपरेतही वाल्या ते वाल्मिकी हा प्रवास आहेच. त्यातही खास असे, की गुन्हेगारी इतिहास असलेली व्यक्ती असामान्य प्रतिभेची उद्गाती ठरली. म्हणूनच ज्ञानेश्वर सांगतात, की अविवेकाची काजळी नष्ट करण्यासाठी विवेकाचे दीप लावू या आणि सूड संतापाची वाटसुद्धा गोड करू या."

*(लेखक प्रसिद्ध मनोविकास तज्ज्ञ आहेत.)*

# तरुणांच्या मानसिक आरोग्याच्या अडचणी : एक अभ्यास – महाविद्यालयीन जीवनातील वास्तव

डॉ. शियाली रामामृत रंगनाथन, ज्यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक मानले जाते, यांची जयंती दर वर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरी केली जाते. त्यांच्या योगदानाला आदराने गौरवण्यासाठी हा दिवस 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिन' (National Librarian's Day) म्हणून भारतात साजरा केला जातो. त्या निमित्ताने 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिना'निमित्त विशेष लेख...

**सागर काशिनाथ खोकले.**
संदीप इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस, महिरावणी, नाशिक.

महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचे वळण असते. बालपण आणि प्रौढ आयुष्य यामधील ही संक्रमणाची अवस्था असते, जिथे एकीकडे स्वातंत्र्याचे धडे घेताना, दुसरीकडे जबाबदाऱ्यांचे ओझेही वाढते.

नव्या शिक्षणपद्धती, स्पर्धा, करिअरची चिंता, सामाजिक दबाव आणि कौटुंबिक अपेक्षा या साऱ्यांमुळे आजच्या तरुणांच्या मानसिक आरोग्याला मोठे आव्हान निर्माण झाले आहे. या लेखात आपण कॉलेजमधील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या मानसिक अडचणींचा सखोल वेध घेणार आहोत, त्यांची कारणमीमांसा करणार आहोत आणि काही सकारात्मक उपाय योजनांचाही विचार करणार आहोत.

मानसिक आरोग्य म्हणजे नेमकं काय? मानसिक आरोग्य म्हणजे केवळ वेडेपणा नसणे इतकं मर्यादित नाही. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, मानसिक आरोग्य म्हणजे व्यक्तीची भावनिक, मानसिक आणि सामाजिक स्थिती. यात विचार करण्याची क्षमता, भावना नियंत्रित करणे, निर्णय घेणे आणि तणावांशी सामना करण्याची ताकद यांचा समावेश होतो.

## कॉलेज जीवनातील मानसिक अडचणींची कारणे

**(अ) शैक्षणिक दबाव**

- परीक्षेतील यश-अपयश.
- सततची तुलना : 'तो पहिल्या वर्गात पास झाला, तू का नाही?'
- अभ्यासक्रमातील गती समजून न येणे.

**(ब) करिअरबाबतची अनिश्चितता**

- 'पुढे काय करायचं?' या प्रश्नाचं उत्तर सापडत नाही.
- योग्य मार्गदर्शनाचा अभाव.

**(क) कौटुंबिक अपेक्षा आणि आर्थिक अडचणी**

- काही विद्यार्थी कुटुंबाचा आर्थिक भारही वाहत असतात.
- आई-वडिलांची मोठी स्वप्ने आणि त्यात फिट बसण्याची असहायता.

**(ड) सामाजिक दबाव**

- रिलेशनशिपचे ताण.
- मित्रांची संगत किंवा त्रास.
- मोबाइल आणि सोशल मीडियाचा अतिरेक.

**(इ) डिजिटल आक्रमण**

- सतत ऑनलाइन असण्याचा ताण.
- नीट झोप न लागणे, लक्ष न लागणे, चिडचिड.

## मानसिक आरोग्याची लक्षणे – दुर्लक्षित संकेत

- सतत उदास राहणे.
- एकटेपणा जाणवणे.
- अभ्यासात लक्ष न लागणे.
- चिडचिड, राग किंवा हळवेपणा.
- झोप न लागणे किंवा जास्त झोप.
- अन्नाबाबत गोंधळ: खूप खाणे किंवा उपाशी राहणे.
- आत्महत्येचे विचार.

दुर्दैवाने, आपल्या समाजात अजूनही मानसिक आजारांकडे मनाचा कमकुवतपणा म्हणून पाहिलं जातं. हे कलंकितकरण अधिक त्रासदायक ठरतं.

## कोविड-१९ चा परिणाम

कोरोना महामारीनंतर अनेक विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता, एकाकीपणा वाढले आहेत. ऑनलाइन शिक्षण, संवादाचा अभाव आणि भविष्यासंदर्भातली अनिश्चितता यामुळे मानसिक आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढले.



## ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांमध्ये फरक

**ग्रामीण भागातील विद्यार्थी :**

- इंग्रजी भाषा आणि शहरी स्पर्धा यामुळे आत्मविश्वास कमी होतो.
- संसाधनांचा अभाव (लायब्ररी, इंटरनेट, समुपदेशन)

**शहरी भागातील विद्यार्थी :**

- जास्तीच्या स्पर्धेमुळे नैराश्य.
- आधुनिक जीवनशैलीचा ताण.

## मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी उपाय

**(अ) समुपदेशन केंद्रांची गरज**

- महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित समुपदेशक (counselors) असावेत.
- गोपनीयतेची हमी असावी.

**(ब) शिक्षकांचे प्रशिक्षण**

- शिक्षकांनी मानसिक आरोग्याची प्राथमिक लक्षणे ओळखणे आवश्यक.
- विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची पद्धत सुस्पष्ट असावी.

**(क) Peer Support Groups**

- विद्यार्थ्यांनी एकमेकांना समजून घ्यावं.
- मार्गदर्शक विद्यार्थी (student mentors) नेमावेत

**(ड) योग, ध्यान व जीवनकौशल्ये**

- योग आणि ध्यानाचे वर्ग.
- Life Skills कार्यशाळा — स्वसंवाद, निर्णयक्षमता, तणाव व्यवस्थापन.

**(इ) खुला संवाद – "मुक्त मनाने बोलू या"**

- महिन्यातून एकदा चर्चासत्र.
- विद्यार्थ्यांनी मन मोकळं करण्यासाठी सुरक्षित व्यासपीठ.

## महाविद्यालयातील उपक्रम –

दर महिन्याला समुपदेशन सत्रे

- 'Feel Free to Talk' वॉल – जिथे विद्यार्थी आपले अनुभव लिहू शकतात.
- 'Stress-Free Week' – परीक्षेपूर्वी तणावमुक्तीचे सत्र.

यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आधार मिळेल. आत्महत्येच्या विचारांमधून स्वतःला बाहेर काढायला मदत होईल.

## पालकांचं योगदान

- संवाद वाढवावा : 'आज कॉलेजमध्ये काय झालं?' हा साधा प्रश्न खूप काही उलगडतो.
- मुलांच्या भावना समजून घ्याव्यात. सतत निकालावर लक्ष केंद्रित न करता प्रक्रियेवर भर द्यावा.

## शासनाची जबाबदारी

**राज्य शासनाने पुढाकार घेऊन:**

- प्रत्येक जिल्हा स्तरावर विद्यार्थी मानसिक आरोग्य केंद्र उभारावं.
- महाविद्यालयांमध्ये मानसिक आरोग्यावर अभ्यासक्रम समाविष्ट करावा.
- शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात मानसिक आरोग्य विषय अनिवार्य करावा.

## निष्कर्ष

महाविद्यालयीन जीवन हे केवळ शिक्षणाचे भांडार नव्हे, तर स्वतःला शोधण्याचा टप्पा आहे. जर या प्रवासात विद्यार्थी मानसिकदृष्ट्या सक्षम असतील, तर ते केवळ उत्तम पदवीधर नव्हे, तर सुजाण नागरिकही बनतील. मानसिक आरोग्य हा आपल्या शिक्षणव्यवस्थेचा अविभाज्य भाग बनला पाहिजे. शेवटी एवढंच म्हणावं वाटतं, शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर मनाचा विकास आहे. आणि मन जर सशक्त नसेल, तर कोणतंही शिक्षण अपूर्णच!













राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे २१ व्या शतकातील विकसित भारताच्या गरजा पूर्ण करणारे असून भारताला जागतिक ज्ञानसंपन्न ज्ञान केंद्र बनवेल

**श्री. नरेंद्र मोदी**
मा. पंतप्रधान



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० भारताच्या शिक्षण व्यवस्थेचे भारतीयकरण आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे शिक्षण प्रणालीला भारतीय मूल्ये आणि परंपरांशी जुळवून घेण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



उच्च व तंत्र शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणे आणि त्याची गुणवत्ता वाढवणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था अधिक प्रगतीशील होईल.

**श्री. चंद्रकांतदादा पाटील**
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य



विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून बहुविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सदैव प्रयत्नशील आहे.

**श्री. इंद्रनील नाईक**
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य**